साप्ताहिक

१० मे ८६/२ रूपये

# माणूस

# 21 वे शतक कसे असेल?

आल्विन टॉफलर

अमेरिकेतलं एक

## 'धार्मिक बेट'

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे

अंक : पन्नासावा

१० मे १९८६

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ—श्याम देशपांडे



## मुंबापुरी

### ☐ पंतप्रधान : खर्जातला सूर

मुंबई गेली दोन दिवस चैतन्याने सळसळत होती. राजीव गांधी मुंबईत होते ना!

सगळ्यांच्याच देहात जणू चैतन्याची लहर खेळत होती. पोलीस चैतन्यमय, काँग्रेस (आय) कार्यकर्ते चैतन्यमय, आम्हीही चैतन्यमय.

एरवी काँग्रेस कार्यकर्ते एम. पी. सी. सी. च्या बाजूला कुठे दिसणारही नाहीत; पण दोन दिवस प्रत्येक जण कडक खादी सफारीत मिरवत होता. अन् चेहऱ्यावर शालीन, सेवाशील हास्य न जाणो एकदम कुठून राजीव गांधी हजर झाले तर!

राजीव गांधींची ही भेट एकूण सुटसुटीत अन् चांगली झाली. नाहीतर पोलीस तर पंतप्रधान भेटीला जीव असा हैराण करून टाकतात की 'पंतप्रधान नको, पोलीस आवर' अशी गत होते. मजकूर लिहिण्यासाठी खिशातनं साधं पेन काढलं तरी सबमशीन गन काढली की काय या शंकेने पोलीस कासावीस होतात. फोटोग्राफर्स आणि पोलीस यांचा कुस्तीचा पंचरंगी सामनाच तेवढा व्हायचा राहतो; पण सुदैवानं (कोणाच्या?) काल दोन दिवस पोलीस नीट माणसासारखे वागले.

इंदिरा गांधी काय अन राजीव काय— दोघेही सुमार दर्जाचे वक्ते. इंदिराजी तर एकच मुद्दा इतका घोळून घोळून चावत बसत की जीव उडून जायचा. राजीवही थोडाफार तसाच. 'दळू ग बाई दळू गऽऽऽ'

पण मे–दिनाचं भाषण ऐकून एका गोष्टीची जाणीव झाली. ती ही की, राजीव इज बोथ ग्रोइंग अँड मॅच्युअरिंग. डिसेंबर चौऱ्याऐंशीला मुंबईत राजीवने निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. त्यावेळचं त्यांचं भाषण आठवा. कोपरखळ्या, कानपिचक्या सगळ ठीक वाटलं तेव्हा. सभोवतालच्या दाहक परिस्थितीची जाणीव झाल्यानंतर नेत्याचा जो चढा सूर असतो तो आपसूकच बदलतो. राजीवने खर्जातला सूर घेतलाय असं वाटतंय. बघू या. मैफलीची आता अडीच–तीन वर्षे बाकी आहेत.

### ☐ अरुणाचलमसुद्धा??

Truth never comes in black and white, it comes in shades of gray. असे नेमके कोणी म्हटले आहे हे आम्हाला आता आठवत नाही. सर्व चांगली वचने आपणच लिहिली आहेत असा आम्हाला आपला कायम भास होत राहातो. असो. लेखाच्या सुरुवातीस किंवा शेवटी इंग्रजी अथवा उर्दू भाषेतील सुविचार लिहिल्यास लेखकाच्या विद्वत्तेबद्दल वाचकांच्या मनात संशयाला जागा राहात नाही असे म्हणतात. परंतु आम्हाला खरोखरच ह्या वाक्याची आठवण झाली ती मुंबई विद्यापिठाचे परीक्षा अधिकारी अरुणाचलम् ह्यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे.

परीक्षा विभागाचे प्रमुख म्हणून नेमले जाण्यापूर्वी अरूणाचलम हे कालिना येथे विद्यापिठाच्या भूगोल विभागाचे प्रमुख होते. चंद्रकला डावले प्रकरणात त्यांनी विद्यापिठाचे जे प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर केले, त्यामुळेच शिवाजीराव पाटलांना अखेर जावे लागले. हे प्रतिज्ञापत्र मागे घेण्यासाठी किंवा बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला गेला असे म्हटले जाते. ह्या सर्व घटनांमुळे अरूणाचलम ह्यांची रामशास्त्री बाण्याचा अधिकारी अशी प्रतिमा निर्माण झाली.

खरे पहाता डी. टी. जोसेफ ह्यांच्या काळात विद्यापिठाच्या परीक्षा विभागात जेवढी सुधारणा झाली, तेवढी अरूणाचलम ह्यांच्या काळात झाली नाही. एम. डी. परीक्षेच्या सर्व घोळानंतर विद्यापिठाच्या कार्य-

कारिणीने ऑक्टोबर ८५ चे सर्व निकाल काळजीपूर्वक तपासून पाहिले तेव्हा त्यात परीक्षा विभागानेही बराच गोंधळ केलेला त्याच्या नजरेस आला. आता ह्यासर्व प्रकाराची विद्यापिठाने चौकशी सुरू केल्याने अरूणाचलम ह्यानी राजीनामा दिला आहे असे म्हटले जाते मुंबापुरीतील एका प्रख्यात नेत्रतज्ज्ञाच्या मुलाला एमबीबीएस् च्या परीक्षेत आणि एका मुलीला बी. कॉम् च्या परीक्षेत पास होण्यासाठी अरूणाचलम ह्यानी आपल्या अधिकाराबाहेर जाऊन प्रयत्न केले असाही त्यांच्यावर आरोप केला जातो.

चद्रकला डावलेची केस कोर्टात चालू असताना एक बातमी मत्रालयाच्या वार्ताहर दालनात विशेष जोमाने चर्चिली जात होती. तिच्या खरेखोटेपणाबद्दल आम्हाला छातीठोकपणे सागता येणार नाही. ती बातमी अशी की विद्यापिठाचे प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर होण्यापूर्वी सुशीलकुमार शिदे ह्याचे स्वीय सचीव अरूणाचलम आणि डॉक्टर गोसावी हे चर्चगेट येथील गेलॉर्ड ह्या हॉटेलमध्ये भेटले आणि येथेच त्यांनी अरूणाचलम ह्याना डावले प्रकरणातील सपूर्ण माहिती पुरवायची विनंती केली. डॉक्टर गोसावी याच्या प्रतिज्ञापत्रातील माहिती अरूणाचलम ह्याच्या मदतीखेरीज येणे शक्यच नव्हते. शिवाजीराव पाटलाच्या राजीनाम्यानतर मुख्यमत्रीपदाच्या स्पर्धेत सुशीलकुमार शिदे याचा बराच वरचा नबर हाता.

प्रश्न असा आहे की अरूणाचलम ह्यानी ही मदत दुष्टाचे निर्दालन करण्याच्या प्रामाणिक हेतूने दिली की त्यामागे राजकीय प्रेरणा होती ? कोणत्याही व्यक्तीच्या कृती मागील निश्चित हेतू ओळखणे ही नेहमीच अतिशय अवघड गोष्ट होऊन बसते. पारदर्शक सत्य हा केवळ पुस्तकात आढळणारा प्रकार आहे

*तात्पर्य काय तर* ' Even Arunachalam can make mistakes ' असे एका चिनी तत्ववेत्त्याने म्हटले आहे तेच खरे

### ☐ ते काय पक्ष बांधणार !

जनता पार्टीचे अध्यक्ष चद्रशेखर ह्यानी राजीनामा देण्याची घोषणा केली तेव्हाच ते नव्याने अध्यक्ष होणार ह्याची आम्हाला खात्री पटली. चंद्रशेखर ह्यानी अखेर हेगडे तत्राचाच वापर केला. परंतु हेगडयाच्या कृतीमध्ये थोडी फार तरी विश्वासार्हता होती. ज्या पक्षाला साधी निवडणूक घेऊन नवा अध्यक्ष निवडता येत नाही, त्याने कोठल्या तोडाने कॉंग्रेस आयवर टीका करावी ?

एकमताचा सर्वोदयी घोळ घालता घालता जनता पक्षाला अखेर निवडणूक घ्यावी लागलीच. मग अशा वेळी चद्रशेखराविरुद्ध एकच उमेदवार ठेवण्याऐवजी इतर पाच जणानाही रिंगणात उतरू द्यायला काहीच हरकत नव्हती निदान जॉर्ज फर्नांडिस पडल्याचे समाधान तरी आम्हाला लाभले असते.

निवडून आल्यावर चद्रशेखर ह्यानी जे वक्तव्य केले त्यावरून पक्षाचे कोणतेही निश्चित ध्येय धोरण ठरवायची त्यांची तयारी दिसत नाही. ज्या वैचारिक गोंधळात पक्षाने राज्य गमावले तोच अजूनही पुढे चालू आहे. विरोधी पक्षनेते देशद्रोही आहेत असे एका भाषणात राजीव गाधी ह्यानी सूचित केले होते. यासाठी त्याच्याविषयी अजूनही चद्रशेखर अढी धरून आहेत. विरोधी पक्ष नेत्याविषयी प्रतप्रधानानी अशा स्वरूपाचे उद्‌गार काढणे हा कदाचित त्याच्या राजकीय अपरिपक्वतेचा भाग असेल; पण त्याचबरोबर कोणत्याही राष्ट्रीय प्रश्नावर बोलताना ह्या व जुन्या उद्‌गाराची उजळणी करीत बसणे हेही राष्ट्रीय नेत्याच्या पोरकट प्रगल्भतेचे लक्षण आहे.

खलिस्तानच्या घोषणेनतर सुवर्ण मदिरात पोलीस शिरले ह्याविषयी बोलताना चद्रशेखर म्हणाले, ' सरकारने जनतेला विश्वासात घ्यायला हवे होते. ' म्हणजे नेमके काय करायला हवे होते ? मोरारजी देसाई नॅशनल कौन्सिलच्या सभेला का आले नाहीत असे विचारल्यावर ते म्हणाले की, मोरारजी काही माझे मित्र नाहीत. परंदवाडीची बैठक ही जनता पार्टीच्या सभासदाची होती की चद्रशेखर ह्यांच्या मित्राची ?

शहाबुद्दीन प्रकरणाचाही ह्या बैठकीच्या निमित्ताने पक्षाला सोक्षमोक्ष लावता आला असता. शहाबुद्दीन ह्यानी ऑस्ट्रेलियन टी. व्ही. ला दिलेल्या मुलाखतीत भारतीय लष्कराला पजाबचा प्रश्न हाताळताना नाकी नऊ आले आहेत, उद्या जर सर्व देशातील मुस्लिम तरुण रस्त्यावर आले तर लष्कर ह्याना तोंड देऊ शकेल काय, अशी धमकी दिली आहे. नव्या मुस्लिम बिलाबद्दल पक्षाचे धोरण स्पष्ट करण्याऐवजी गुळमुळीत उत्तरे देऊन चंद्रशेखर गप्प बसले.

' खरे पाहता गेल्या लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर चंद्रशेखर ह्याना वैफल्याने ग्रासलेले दिसत आहे जनता पक्षातील राष्ट्रीय पातळीवरील नेते म्हणावे असे रामकृष्ण हेगडे, मधु दडवते ह्या सारख्याशीही त्याचे फारसे पटत नाही राष्ट्रीय पक्षाचे नेतृत्व करणाऱ्याने आपली वैचारिक बैठक स्पष्टपणे लोकांपुढे माडली पाहिजे. स्थानिक पातळीच्या नेत्याप्रमाणे वैयक्तिक हेव्रेदाव्यातून राष्ट्रीय प्रश्नावरचे विचार माडता कामा नये.

पक्षाचे अध्यक्ष म्हणून चद्रशेखर ह्याच्या नावावर कोणतीही भरीव कामगिरी नाही. अशा परिस्थितीत ते अध्यक्ष झाल्यावर काय नव्याने पक्ष बाधणार ? समाजवादी लोकाना बरोबर घेऊन पक्ष चालवणे ही काही सोपी गोष्ट नव्हे.

तेव्हा ह्या तीन दिवसाच्या बैठकीचे फलित म्हणजे पत्रकाराना कार्ला लेणी पहायचा मिळालेला योग एवढेच म्हणायला हवे.

—विष्णु जयदेव

---

## पुणे वार्ता

---

### ☐ पंजाब प्रश्नाचे विषबीज

गेल्या काही दिवसात पजाब प्रश्नाने पुन्हा एकदा उग्र स्वरूप धारण केले आहे. नुकतीच एका गटाने तथाकथित खलिस्तान स्थापनेची घोषणा केली आणि पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण देशात पसरले आहे. गेल्या वर्षी झालेल्या पंजाब कराराची विफलता पुन्हा एकवार स्पष्ट झाली आहे स्वातत्र्यानतर पजाब समस्या दरवेळेस नवे प्रश्न घेऊन उभी राहिली. आणि कोणत्याही वरवरच्या उपायानी ती दूर होऊ शकली नाही आमचे राज्यकर्ते केवळ ' इलेक्शन टू इलेक्शन ' विचार करत असल्याने नैमित्तिक राजकीय तोडगे या समस्येवर लागू पडत नाहीत

कारण मुळातच ही समस्या राजकीय नाही ती मानसिक आहे.

रा. स्व. सघाचे बौद्धिक प्रमुख सुदर्शनजी पजाब प्रश्नावर आपले विचार व्यक्त करत होते. वसंत व्याख्यानमालेत एक मे रोजी आपल्या तासाहून अधिक वेळाच्या भाषणात त्यानी अत्यत समर्पकपणे पजाब प्रश्नाची पूर्वपिठीका विषद केली. या प्रश्नाची विषबीजे शोधायचा प्रयत्न केला आणि उपायाची दिशाही सागितली.

सुदर्शनजीच्या मते या समस्येचे मूळ शोधण्यासाठी आपल्याला दीडशे वर्षे मागे जावे लागेल. पजाबचा इतिहास तपासावा लागेल. शीखधर्म हा मुळात हिंदू धर्मापासून वेगळा होता की हिंदूचाच एक पथ होता हेही तपासावे लागेल. शीख पथ हा हिंदूधर्मापासून वेगळा नव्हता किंबहुना शीखही तसे मानत नव्हते. गुरू नानकापासून गुरू गोविंदसिंहापर्यंतचा इतिहास हेच सागतो. हिंदू आणि शीख हा भेदाभेद ब्रिटिशानी बुद्धिपुरस्सर निर्माण केला आणि पजाबात विषबीजे पेरली. १८५७ चे बड मोडून काढण्यासाठी ब्रिटिशानी शिखाचा उपयोग करून घेतला. गुरू तेजसिंग आणि गोविंदसिंगाच्या खोट्या भविष्यवाण्या प्रसृत केल्या व शिखाना हिंदू आणि मुसलमानाविरुद्ध चिथावले.

१८५७ नंतर झालेल्या जनगणनामध्ये शिखाचा वेगळा उल्लेख त्यानी केला. पंजाबातील उच्च वर्गाला ब्रिटिश हुकमतीत सामावून घेण्यात आले. शीख धर्मगुरूना हाताशी धरून सारे आतविरोध मोडून काढले. सिंगसभाना प्रोत्साहन दिले. खालसा विद्यालय आणि गुरुमुखी भाषेचाही उपयोग केला गेला. गुरूग्रंथसाहेबाचे सोयिस्कर अन्वयार्थ लावून शीख हा वेगळा धर्म असल्याचे जाणीवपूर्वक रुजवण्यात आले. आर्यसमाजाच्या तत्कालिन वर्तणुकीतूनही या वातावरणास खतपाणी मिळाले आणि हे विषबीज पक्के पेरले गेले. शीख हिंदूपासून वेगळे आहेत हे पक्के बिंबविण्याचा प्रयत्न झाला.

शीख हे हिंदूपासून वेगळे आहेत या विचारातच फार मोठी गल्लत आहे असे सुदर्शनजीना वाटते. स्वतत्र भारतात शिखाना आपण हिंदूचे गुलाम आहोत असे वाटणे हेच मानसिक कारण आहे. गुरूग्रथसाहेबात हिंदू धर्माचे सारे सार आहे हे सुदर्शनजी दाखल्यासहित स्पष्ट करतात. त्याच्या मते तो भारतीय तत्त्वज्ञानाचा अमरकोष आहे. वेद, पुराणे, श्रुती, स्मृती याचे उल्लेख ग्रथसाहेबात आहेत. रामनामाचे उल्लेख आहेत. निराकार, निर्गुण आणि मधुराभक्तीचा पुरस्कार त्यात आढळतो. गुरू ग्रंथसाहेबाचे हे स्वरूप स्पष्ट व्हावे असे त्याना वाटते.

पजाबची समस्या या अर्थाने त्याना मानसिक वाटते. हा भ्रम दूर झाल्यास ही समस्या सोपी होईल. गुरू गोविंदसिंहाना शिखाचे गुरू म्हणून बदिस्त करण्यात आले आहे. खरे तर ते साऱ्या भारताचेच गुरू आहेत. आपण पुढाकार घेऊन गुरूग्रथसाहेबाला आपले म्हणायला हवे. गुरुद्वाराना आपले म्हणायला हवे म्हणजे हा गड दूर होईल असे त्यांना वाटते.

सुदर्शनजीनी आपले विचार नेमकेपणाने मांडले. दीडशे वर्षांची ही गुतागुत त्यानी अधिकाधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. विरोध–आतरविरोधाची प्रक्रिया माडली. या समस्येच्या मुळातील एक नेमका आणि पटणारा दृष्टीकोन त्यानी श्रोत्यासमोर ठेवला.

## □ गोंधळलेले चंद्रशेखर !

परंदवडीच्या चतुर्थ अधिवेशनाच्या अनुषगाने जनता पक्षाध्यक्ष चद्रशेखर पुण्यात आले होते. परदवडीत काय घडले याचा बराच उहापोह झाला आहे. चद्रशेखर या अधिवेशनाला अध्यक्ष म्हणून आले आणि अध्यक्ष म्हणूनच राहिले एवढीच फलश्रुती. असो. परंदवडीच्या खोलात शिरायचे कारण नाही.

चद्रशेखराच्या दोन सभा पुण्यात झाल्या. एक शनवारवाड्यासमोर जाहीर सभेत आणि दुसरी दगडूशेठ हलवाई ट्रस्टने चालविलेल्या व्याख्यानमालेत. चद्रशेखर शनवारवाड्यासमोर जे बोलले तेच त्यानी व्याख्यानमालेत गिरविले. शनवारवाड्यासमोरचे ठीक होते पक्षाच्या व्यासपीठावरून पक्षाध्यक्ष या नात्याने ते बोलत होते. तेव्हा ते जे बोलले त्यावर आमचे काही म्हणणे नाही; पण एका वेगळ्या व्यासपीठावर त्यानी थोडे वेगळे आणि सखोल बोलायला हवे होते असे आम्हाला वाटते.

शिवजयती व्याख्यानमालेत बोलताना चद्रशेखरानी उपदेशाचे अनेक डोस पाजायचा प्रयत्न केला. गरीबी, बेकारी, दुष्काळ, पाणी आणि कॉम्प्युटर ही टेप पुन्हा रिवाइन्ड करून ऐकवली. वर दुसऱ्याची पीडा समजून घेण्याचा प्रयत्न करा असा थड सदेशही दिला. जाता जाता सत्तारूढ नेतृत्वाची दिवाळखोरी जाहीर करण्याचा प्रयत्नही केला. चद्रशेखरानी दोन पदयात्रा केल्या आहेत दक्षिण उत्तर आणि पश्चिम पूर्व. एवढ्या भ्रमतीतून चद्रशेखरजी फक्त एवढेच सार काढू शकले ? एवढेच विचारमथन त्यानी केले ?

चद्रशेखर समस्याचे मोठे डोंगर उभे करतात. समाजातल्या विद्वानाना आवाहन करतात. त्याची टीका रास्तही असेल कदाचित; पण त्यांच्या स्वत.कडे कोठलीही ठाम योजना नाही त्याबद्दल ते बोलत नाहीत खरं तर चद्रशेखर गोंधळलेले वाटतात. राजकीय आणि सामाजिक विचाराचो ते मोठी गल्लत करताना आढळतात परदवडीत अध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर त्याची भूमिका ते निश्चितपणे माडू शकले नाहीत.

पुण्याच्या चार दिवसांच्या वास्तव्यात चद्रशेखरजी एक गोंधळलेले, दिशाहीन व्यक्तीमत्त्व म्हणूनच सामोरे आले.

## □ तोरडमल – दिलखुलास गप्पा

पुण्यात वसत व्याख्यानमालेपाठोपाठ मॅजेस्टिक गप्पा सुरू झाल्या आहेत. दोन मे रोजी सध्याकाळी मधुकर तोरडमलाशी बातचीत होती. हा या सप्ताहातील कार्यक्रमाचा ' लाइट ' भाग. मधुकर तोरडमलानी 'लाईट' आणि ' लाईव्ह ' गप्पा मारल्या. ते इतके दिलखुलास बोलले की काही वेळा त्याच्याबरोबर गप्पा मारणाऱ्या वि. भा. देशपांडे, सुभाष भेंडे आणि सरिता पदकी याचीच पचाईत झाली.

प्रा. तोरडमलानी नुकतेच त्याचे आत्मचरित्र प्रसिद्ध केले आहे ' तिसरी घटा ' हे त्याचे नाव त्याच हे पुस्तक या गप्पाच्या केंद्रस्थानी व्हाव हे स्वाभाविकच होतं. पण तोरडमलानी पुस्तकाबाहेरच्याही बऱ्याच आठवणी सांगितल्या. त्याचा नगर ते मुंबई यावरोबरच हौशी ते व्यावसायिक रगभूमी हा प्रवास सविस्तर सांगितला.

आपल्या प्रेमप्रकरणानी आपण कसे फसलो आणि पडलो हे त्यानी मनमुराद हसत सांगितले. लग्नानंतर नाटयव्यवसायात घडणाऱ्या 'त्या' घटनांविषयी आपल्या पत्नीचे आपण कसे 'ओरिएन्टेशन' केले वगैरे त्यांनी मिश्किलपणे सांगितले. नट, दिग्दर्शक आणि लेखक या आपल्या तीनही भूमिकात आपल्यातल्या लेखकावर नट आणि दिग्दर्शक आक्रमण करतो आणि म्हणूनच आपण लेखक म्हणून तोकडे पडतो अशी स्पष्ट कबुली त्यांनी दिली. अरुण सरनाईकांच्या आकस्मिक निधनाच्या धक्क्यानतर आणि रंगभूमीवर आलेल्या काही विस्मृतीच्या झटक्यामुळे आपण आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त झालो असे ते म्हणाले.

तोरडमलांनी एकूणच गप्पामध्ये रंग भरला त्या खेळकर केल्या आणि उपस्थितांचे मस्त मनोरजन झाले.

— मनोहर सोनवणे

## सांस्कृतिक नागपूर

### ☐ जेठमलानींचे चौकार

गेल्या २६ एप्रिल १९८६ रोजी नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवाला मोठ्या थाटामाटात प्रारभ झाला. उद्घाटनाचा सोहळा येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात साजरा झाला. त्यावेळी स्टेजवरील आणि आवारातील एकूणच दृश्य मोठे नेत्रदीपक आणि विलोभनीय होते. स्टेजवर कोण कोण असतील अशी तुमची कल्पना आहे? भारताचे उपाध्यक्ष श्री. आर. व्यकटरमण, उर्जामंत्री श्री. वसंतराव साठे, कायदामंत्री श्री. अशोक सेन, मुबई हायकोर्टाचे प्रमुख न्यायाधीश श्री. एम. एच. कनिया, महाराष्ट्र राज्याचे गव्हर्नर डॉ. शकर दयाल शर्मा, मद्रास हायकोर्टाचे प्रमुख न्यायाधीश श्री. एम एन. चादूरकर, महाराष्ट्राचे वनमत्री श्री. शिवाजीराव मोघे, अॅड्व्होकेट वाय. बी. फडणीस, उपाध्यक्ष अॅड पी. एन. चादूरकर, बार कौन्सिलचे अध्यक्ष अॅड. चद्रशेखर माडखोलकर इत्यादी इत्यादी. ह्याशिवाय उपस्थितीत श्रोतृवृदात सुप्रीम कोर्टाचे भूतपूर्व न्यायाधीश श्री. वाय. व्ही. चद्रचूड, न्यायाधीश तुळजापूरकर, न्यायाधीश श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी. एवढी नावे जरी वाचली तरी समारभ किती नेत्रदीपक झाला असेल याची आपण कल्पना करू शकाल. नागपूर हायकोर्ट बार कौन्सिलच्या परंपरेला साजेल असाच कार्यक्रम झाला असे नमूद केले पाहिजे. परतु त्याच दिवशी संध्याकाळी न्यायमूर्ती तुळजापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'विकसनशील समाजात बार असोसिएशनची कामगिरी' ह्या विषयावर जो परिसंवाद झाला त्याने खरी मजा आणली. परिसवादात श्री. राम जेठमलानी, कायदामत्री श्री. अशोक सेन, दिल्ली हायकोर्टाचे प्रधान न्यायाधीश न्यायमूर्ती श्री. देशपांडे आणि तुळजापूरकर यानी भाग घेतला. या सपूर्ण परिसवादात वक्त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि आपली बाजू कळकळीने मांडण्याची जिद्द जागोजागी दिसून आली. ह्या परिसंवादात प्रसिद्ध विधिज्ञ श्री. राम जेठमलानी यांनी बोलताना किती चौकार मारले असतील याची गणतीच नाही. काही मासले पहा : 'तुम्ही आजचे कायदेमंत्री श्री, अशोक सेन हे नागपूर बार कौन्सिलचे ब्रिलियट 'प्रॉडक्ट' आहेत असे वर्णन करता. 'किस्सा कुर्सी का' ह्या केसमध्ये सजय गाधी आणि त्यांच्या अनुयायांनी भर सुप्रीम कोर्टात अशोक सेन ह्याना गालीप्रदान केले त्यावेळी तुमचे बार कौन्सिल कुठे होते? निषेधाचा ठराव बार कौन्सिलने त्यावेळी का पास केला नाही?' 'नुकतेच एक सर्वसाधारण डेप्युटी स्टेट राज्यमंत्र्याने पार्लमेन्टमध्ये श्री. अशोक सेन ह्याच्यावर उघड उघड चिखलफेक केली. निंदानालस्ती केली. तुमच्या बार कौन्सिलने निषेधाचा ठराव का केला नाही?' 'जस्टीस चंद्रचूड याच्याबद्दलही तुम्ही अतिशय आदराने बोललात. शहाबानो केसमध्ये मुबईच्या रस्त्यावर त्याचा पुतळा जाळला जात होता त्यावेळी तुम्ही निषेधाचा ठराव पास केलांत का?' परिसवादात अशा प्रकारच्या फुलझड्या उडत असल्याने परिसंवाद मोठा रंगत गेला.

### ☐ बुलढाण्याचे 'थंड' संमेलन

विदर्भ साहित्य सघाने आपले ३८ वे साहित्य समेलन ज्यावेळी बुलढाणा ह्या ठिकाणी आयोजित केले त्यावेळी आम्ही मोठ्या आशा बाळगून होतो. कारण ह्या संमेलनाचे अध्यक्ष होते सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी तर उद्घाटक होते सुप्रसिद्ध दलित कवी डॉ. यशवंत मनोहर. बुलढाणेकरांनी मुद्दामहून अशी योजना केली अशा सर्वत्र अफवा होत्या. आणि त्यामुळे ही निकाली कुस्ती पहाण्याकरिता नागपूर–विदर्भातील समस्त जनताही उत्सुक होती. जवळच चिखलीला आठवडी बाजार होता: तेथल्या पागोटेवाल्या मडळीनी कुस्तीची वार्ता ऐकताच बाजार बंद करून बुलढाण्याला एकच गर्दी केली असेही दिसत. होते. बरे, दोघेही नागपूर विद्यापीठाच्या एकाच विभागात असल्याने कुस्तीला चांगलीच ईर्षा चढणार असे जाणकार मडळी सांगत होती. त्यादृष्टीने डॉ. यशवंत मनोहर यानी सुरवातही छान केली होती. आपल्या उद्घाटनपर भाषणाच्या प्रारंभी ते म्हणाले', विदर्भ हा चिरेबंद शनवारवाड्यासारखा आहे. (अरेरे! यशवंत मनोहराना प्रतिगामी शनिवारवाड्याचीच आठवण यावी ना?) येथील साहित्यावर गुगीदार शब्दांच्या प्रतिगामी जीवनवादाचा मोठा प्रभाव पडलेला आहे येथील साहित्यातील कारभारी मंडळी परपरावादी आहेत. नव्याचा सन्मान ती करीत नाहीत. शारदोत्सव, भजन, किर्तने यांच्या तुलनेत विदर्भात साहित्याला काहीही स्थान नाही.' यशवत मनोहरानी शड्डू तर मस्त ठोकले! पुढे ते म्हणाले, 'कलावताला, समीक्षकाला जीवन कळावे लागते आणि जीवन ज्याला कळले, त्याने फार गंभीर, उग्र असावे लागते; पण आपणाकडे गौरविले जाते पाढरपेशे लाडिकपण, आत्मगौरवी वृत्ती.' वारे मेरे पठ्ठे! अब मजा आयेगा! द. भि. आता कोणता पेच मारतात ह्याकडे सर्वांचेच लक्ष लागले। आपल्या भिडूला प्रोत्साहन मिळावे म्हणून काही पागोटेवाली मंडळी द. भि. भोवती गोळा झाल्यासारखे आम्हाला वाटले. त्यातल्या एका पागोट्यावाल्याचा चेहरा राम शेवाळकरांसारखा तर दुसरा मनोहर म्हैसाळकरासारखा वाटला. पण कसचे काय आणि फडक्यात पाय। डॉ. द. भि.

पृष्ठ ३२ वर

# 'माध्यम' नियतकालिक आणि इतर घडामोडी

जुन्या डोंबिवलीत वाचक, लेखक आणि कलावत होते. आज आहेतही; पण खास डोंबिवलीत प्रसिद्ध होणारी नियतकालिके नव्हती. जसजसा डोंबिवलीचा विकास होऊ लागला तसतसा अनेक उपक्रमाना बहर आला. आपली नियतकालिके हवीशी वाटू लागली आणि त्यातून अनेक साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अक निर्मिती होऊ लागली. अर्थात् दैनिक काढण्याचे धाडस कोणी करेल असे वाटत नाही काही नियतकालिके जन्माला आली आणि अस्तगत झाली. काही कशीबशी तग धरून आहेत तर काहीना नाऊमेद व्हावेसे वाटत नाही. ही नियतकालिके अनेक हेतू मनात ठेवून काढली जातात. त्यात पैसा, प्रसिद्धी, राजकारण, सत्तेशी, सत्ताधाऱ्याशी, पोलिसाशी जवळीक साधणे इ. अनेक हेतू असतात. त्याचप्रमाणे काही प्रश्नाचा गंभीरपणे विचार करण्यासाठी, आपल्या कल्पना, विचार साकार करण्यासाठी पैसा वा प्रसिद्धी ह्याचा विचार न करता काही नियतकालिके जन्माला येतात. त्याचा उत्साह असेपर्यंत ती टिकतात आणि मग अस्तगत होतात.

आजमितीस डोंबिवलीतून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकात अकुशसारखे साप्ताहिक आहे, त्याचप्रमाणे हेमागीसारखे विविध विशेषाक प्रसिद्ध करणारे नियतकालिक आहे. साहित्य जागर, बागलकर, ऐसी अक्षरे, संवाद इ. सारखी केवळ दिवाळी अकापुरती नियतकालिके आहेत. श्री. कमलाकर राऊत ह्यानी नुकतेच 'चैत्रबन' नावाचे त्रैमासिक सुरू केले आहे सुप्रसिद्ध कथाकार सौ विनिता ऐनापुरे हृयानी आपल्या 'क्षितिज' हृया मासिकाची घोषणा केली आहे. 'शोध' नावाचे केवळ विज्ञानाला वाहिलेले मासिक मोठ्या उत्साहाने सुरू झाले आणि न परवडल्यामुळे बदही करावे लागले. हृया साऱ्या नियतकालिकाच्या यशापयशाचा इथे विचार करावयाचा नाही किंवा मराठी वाचकाच्या मराठी वाचनाबद्दलच्या उपेक्षेचा, उदासिनतेचाही विचार करावयाचा नाही. सर्वच गोष्टी प्रतिकूल असताना दूरदर्शन आणि ग्रथप्रसार हृया विषयाचा गभीरपणे विचार करण्यासाठी मोठ्या उत्साहाने जन्माला आलेल्या 'माध्यम' नावाच्या एका द्वैमासिकाचा विचार करावयाचा आहे. कथा, कादबरी इ. ललित वाङ्मयप्रकाराचा समावेश न करता सुरू झालेल्या हृया नियतकालिकाने आपली तीन वर्षे पूर्ण केली. त्याची दखल घेण्यासाठी, दाद देण्यासाठी हा प्रपंच आहे.

श्री. वि. रा. फडके आणि श्री. शरद जोशी (एकाडे ग्रथप्रसारक) हृयानी जानेवारी १९८३ मध्ये दूरदर्शन आणि ग्रंथप्रसार हृया विषयाना वाहिलेले, टकलिखित असणारे, दर दोन महिन्यानी प्रसिद्ध होणारे 'माध्यम' नावाचे नियतकालिक सुरू केले सुरुवातीचे दहा अक टकलिखित होते गडकरी जन्मशताब्दी विशेषाक (२६ मे १९८४) मुद्रित स्वरूपात काढला आणि तेव्हापासून हा अक मुद्रित स्वरूपातच निघत आहे. दृक्-श्राव्य माध्यमावर लक्ष केंद्रित केले असले तरी सामाजिक जाणीव जागती असल्यामुळे अनेक विषय हाताळावे लागले त्यातून जन्माला आले इतर विशेषाक सप्टेंबर १९८४ आरोग्य विशेषाक; सगणक विशेषाक मार्च–एप्रिल १९८५, महाराष्ट्र राज्य स्थापना रौप्य महोत्सवी वर्ष विशेषाक मे–जून १९८५. कल्याण येथील वनवासी आश्रम केन्द्राच्या सहाय्याने त्याच्या कार्याची माहिती करून देण्यासाठी जुलै–ऑगस्ट १९८५ मध्ये 'वनवासी विशेषाक' काढला. पारनेरकर महाराजाचे पूर्णवादाचे तत्त्वज्ञान सागण्यासाठी, डोंबिवलीच्या जीवनकला मडळाच्या सहाय्याने आकाराला आला 'पूर्णवाद विशेषाक' मार्च–एप्रिल १९८६ मध्ये त्याचप्रमाणे इ. स. १९८३, इ स. १९८४ आणि इ. स १९८५ चे दिवाळी अकही प्रसिद्ध केले. हृया साऱ्या अकाची, विशेषाकाची दखल अनेक जाणकारानी घेतली. तशीच अनेक नियतकालिकानीही घेतली अनेक वाचकानी पत्रे पाठवून आपली पसती कळविली

अशा तऱ्हेच्या नियतकालिकांना आर्थिक यश कधीच मिळत नसे. तोटा होत असतो आणि तो होणार हे अशा मडळीना पक्के ठावे असते. सामान्य वाचकाकडून भरघोस प्रतिसाद मिळत नसतो. अशा ह्या नियतकालिकाचे आणि त्याच्या सपादकाचे यश असते विषय निवडण्यात, त्या विषयाना न्याय देणाऱ्या लेखकाचा पाठपुरावा करून ते लेख मिळविण्यात. आलेल्या आयत्या हस्तलिखितातून मासिक निर्मिती करण्याचे सपादकाचे भाग्य (आणि वाचकाचे दुर्भाग्य) ह्या मडळीना लाभत नसते ही विषयाची आणि लेखकाची निवड योग्य होती, आहे ह्याचा पुरावा कोणता ? जेव्हा अशा लेखाचे पुनर्मुद्रण अन्य नियतकालिके करतात तेव्हाच ते ठरते 'माध्यम'च्या सपादकाच्या पाठीवर अशी कौतुकाची थाप अनेक वेळा पडली आहे. श्री. श्री बा जोशी (कलकत्ता) ह्यानी लिहिलेला 'माध्यम माणसासाठी' हा दूरदर्शनवरील लेख दै. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, वीरवाणी (पाक्षिक) इ. ठिकाणीही प्रसिद्ध झाला. सौ सुनीता नागपूरकराच 'गडकरी वाङ्मय – एक दृष्टिक्षेप', 'पुस्तक पढरी' मध्ये तर चद्रशेखर राजे ह्याचा 'टीकाकाराच्या दृष्टिकोणातून गडकरी' हा लेख (दोन्ही लेख 'गडकरी विशेषाक'मधील) नाशिक येथील 'दै. देशदूत'ने छापला. 'ज्ञानदीप आणि मी' हा श्री. प्रभाकर पडित ह्याचा लेख 'महाराष्ट्र टाइम्स'ने छापला. ह्या साऱ्या नियतकालिकानी ही दिलेली दाद सपादकाना उत्साहवर्धक वाटली नसती तरच नवल? त्याचप्रमाणे वेळोवेळी दै. नवशक्ती, मुबई सकाळ, म. टा, लोकसत्ता ह्यानी विविध प्रकारे दखल घेतली. त्या नियतकालिकाच्या सपादकमडळातील सर्वश्री चद्रशेखर वाघ, कमलाकर नाडकर्णी, दिनकर गागल, श्रीराम सिधये, परेन जाभळे इ. मडळीनी अनेक भेटीत मोलाच्या सूचना केल्या, मार्गदर्शन केले. सा. माणूसचे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर ह्यानी सुचविलेली 'Script Bank' ची (विविध विषय सुचवून लेख मागवून ते अनेक नियतकालिकाना देणे) योजना फक्त माध्यमपुरतीच रावली जाते इतर नियत-

पृष्ठ ३२ वर

अहो, येता–जाता

# सायनपासून दादरपर्यंत

फिरोझ रानडे

मोक्ष उर्फ मुक्ति मिळवण्याचे विविध मार्ग आहेत. प्रत्येकाने आपल्या श्रद्धेप्रमाणे व परवडेल तो मार्ग निवडावा हे जसे आहे तसेच पुण्याहून मुंबईला वा मुंबईहून पुण्याला जाण्याच्या बाबतीत आहे. मी गेली चार–पाच वर्षे सगळे मार्ग चोखाळतो आहे आणि सगळ्यात मला एस्. टी. मार्ग चविष्ट वाटला आहे.

पूर्वी सरकारी नोकरीत होतो त्यावेळी अर्थातच पहिल्या वर्गाने वा टॅक्सीने जात–येत असे. खाजगी कंपनीत असताना तर कंपनीची गाडीच होती. दोन्ही नोकऱ्यात कोणीतरी सहाय्यक बरोबर असे. तेव्हा त्याला शहाणपणाचे सल्ले देण्यात प्रवास सहज संपून जात असे. ज्यावेळी साहेब बरोबर असत त्यावेळी ह्याच्या उलट होत असे. पण वेळ जायचा तो जायचाच.

पण आता निवृत्तीनंतर परिस्थिती थोडी बदलली होती. आता रेल्वेचा दुसरा वर्ग, आशियाड व एस. टी. हेच मार्ग राहिले होते. मला पुण्याला रेल्वेने दुसऱ्या वर्गाने जायला बिलकुल आवडत नाही. एकतर तीन जणांच्या जागेवर चार जण बसतात. त्यामुळे प्रवासाची मजा जाते आणि दुसरं म्हणजे गप्पा मारण्याच्या मूडमध्ये कोणी नसते. गप्पा नाहीत मग प्रवास कसला ?

आशियाड दिड–पटीहून महाग पडते. ते माझ्या 'स्थ' पणाला न परवडणारे. आणखी दुसरं म्हणजे आशियाडमध्ये नाही म्हटल तरी थोडा उच्चभ्रू वर्ग असतो. कोणाशी बोलायच म्हणजे 'एस्क्युज मी' म्हणून सुरवात करायला लागते. आता गप्पाना 'एस्क्यूज मी' म्हणून कशी सुरवात करणार ?

तेव्हा राहता राहिली ती आम जनतेची एस्. टी. ह्यात निचभ्रू लोक प्रवासी असले तरी मला ते आवडते. अगदी खाजगी विषयापासून तो सामाजिक विषयापर्यंत कोणताही विषय तबाखू बरोबर चघळता येतो. मधून मधून शिव्याची पिंक पण टाकता येते. एस. मध्ये सगळया जातीचे, सगळया जमातीचे, सगळ्या थरातले लोक भेटतात.

पण आज जे गृहस्थ भेटले होते तसे कधी कुणी भेटेल असे वाटले नव्हते. सातान्याहून की कोल्हापूराहून मुंबईला जाणाऱ्या बसमध्ये मी पुण्याला चढलो. प्रवाश्याच्या भाषेत सागायचं म्हणजे गाडी अगदी 'पॅक बद' होती. सगळया सिटा तर फुल होत्याच पण काही लोक उभे होते. तेवढ्यात अगदी मागल्या लांबड्या सीटवर बसणाऱ्या गृहस्थाने तेथे एक सिट खाली आहे म्हणून खूण, केली. मी लबालबा तेथे जाऊन बसलो.

गाडी सुरू झाली तशा आमच्या गप्पा सुरू झाल्या. गाडीनं वेग घेताच तसा आमच्या गप्पानीही घेतला. ते गृहस्थ म्हणजे कोणा 'भारतीय' कामगार संघटनेचे उपाध्यक्ष होते. आता त्यांच्या सस्थेच्या नावापुढे 'भारतीय' होते म्हणजे त्यांची सस्था कोणत्या राजकीय विचार–जातीची असेल ह्याची कल्पना यावी.

ते गृहस्थ काही नुसते उपरे उपाध्यक्ष नव्हते तर स्वतः रेल्वेत एक कामगार होते. त्याना स्वतःची बायको, तीन पोरं असा संसार होता. पण त्यानी आपला संसार त्या चार लोकांच्यापुरता मर्यादित ठेवला नव्हता

गृहस्थ आपल्या कामाविषयी फार तळमळीन बोलत होता. त्यानी ह्या चळवळीकरता किती हालअपेष्टा सहन केल्या होत्या, ह्या कामामुळे त्याची वरची जागा किती वेळा हुकली होती. अगदी सरळ. पण कोणत्याही तऱ्हेचा पश्चात्ताप नाही. उलट थोडस अभिमानानं सांगत होता तो.

मला आधीच खोदायची हौस. त्यातून अशी सज्जन व मऊ जमीन मिळाल्यावर मग काय विचारता ? मी अगदी खोदून खोदून त्याच्या चळवळीविषयी, त्याच्या कामाविषयी विचारू लागलो. हेतू हा की कम्युनिस्ट कामगार चळवळ व ही भारतीय कामगार चळवळ ह्यात काय फरक आहे, काय साम्य आहे ते कळावे.

पण तो गृहस्थ काही मुद्द्याचे सांगेचना. त्याच्या सगळ्या गोष्टी संघटनेच्या अध्यक्षाबद्दलच्या होत्या. त्या अध्यक्षाच्या व्यक्तिमत्त्वाने तो इतका भारावून गेला होता की त्याला दुसर काही सुचतच नव्हत.

'आता तुम्ही इतके दिवस म्हणजे जवळ जवळ पचवीस वर्ष कामगारात काम करता हात तर कामगार चळवळीवर तुमचा प्रभाव कसा काही नाही. निदान जनतेला तरी तसं जाणवत नाही. हे कस ?'

'जाणवेल, जाणवेल, काही दिवसानी जाणवेल. आमचे अध्यक्ष म्हणतात एक दिवस असा येईल की सगळे आमच्याकडे येतील.' तो मोठा खूष होऊन सागत होता.

आता ह्या श्रद्धेला काय म्हणावे ? बरं 'काय म्हणून लोक तुमच्या मागे येतील ?' विचारल तर उत्तर अस की तुम्ही स्वतःच बघाल ते 'हे'

माणूस इतका तळमळीचा, खरा कार्य करणारा व त्याला आपल्या अध्यक्षाविषयी इतका आदर वाटत होता की त्याला काही कडवट बोलणंही अवघड होऊन बसलं.

त्याची काही तरी दुसरे दिवशी रेल्वेच्या ऑफिसात मिटिंग होती. पण रात्री तो बहिणीकडे सायनला रहाणार होता. सायन आलं तस तो उठला. ह्रातात हात मिळवला व 'ओळख ठेवा' वगैरे म्हणून उतरून गेला मी पुढे दादरला जाणार होतो.

'हा गृहस्थ इतका भारला गेलाय त्या अर्थी ह्याचे अध्यक्ष सद्गुणी असणारच. पण नुसत्या सद्गुणाने कामगार चळवळ पुढे नेता येईल ? माझ्या मनात विचार येत होते. गेली पन्नास–साठ वर्ष 'लाल बावटा'चे काम करणारे आता कुठे आहेत ?

'पूर्वी काही तत्वाकरता व अन्यायाविरुद्ध कामगार लढे होत असत आताचे लढे फक्त जास्त पगाराकरता होत आहेत. जो पुढारी जास्त पैसे मिळवण्याच आश्वासन देईल, त्याच्या मागे कामगार जात आहेत. त्याचे अध्यक्ष हे सगळे प्रश्न कसे सोडवणार आहेत, हाच प्रश्न माझ्या मनात आला.

दादर आल पण माझ्या प्रश्नाच उत्तर मिळालं नव्हत. कदाचित माझा जगप्रवास सुद्धा संपला असता तरी मला उत्तर मिळालं नसत.

□

## वेशीबाहेरचे एक पान

धनगराचं ढोल घुमाय लागलं तसं सारी जत्रा हालली. पुनः एकदा देवाच्या नावानं 'चांगभलं' झालं. घोंगडी झाडत धनगर उठलं. आयाबायांनी काखत मापट मारल्यासारखं पोरास्नी मारलं. सारी देवळाकडं निघाली. ढोलाच्या तालावर धनगरांनी फेर धरला. हातात रुमाल बांधल्यालं, डोस्कीपासनं तळव्यापतूर सारी भंडाऱ्यानं माखल्याली. माणसं नाचाय लागली.

पुजाऱ्याचं तरणंबांड पोर घंटा वाजवत देवळात शिरलं. त्यो देवाची पूजा करू लागला. देवळातल्या घंटा वाजू लागल्या तसं कोकरयात्रेची गर्दी मुंग्यासारखी देवळाला डसली. पूजा झाली. ज्याला देवळात शिरायला मिळालं तो देवळात घुसला. ज्याला तसं करता आलं नाही, तो देवळाबाहेर आला. शिखराकडं बघून माणसं नारळं फेकाय लागली. देवळाला नारळ फडाफड् लागूनं खाली पडाय लागली. पडल्याली भकलं गोळा करायला दाटण झाली.

मग पुजाऱ्याचं पोर शिखरावर चढाय लागलं. शिखर तीस–बत्तीस हात उंचीवर. शिखराजवळ एक चौकोनी कट्टा. तिथं पुजारी उभा राहतोय. नवसाची पोरं शिखराजवळच्या कट्ट्यावरनं खाली फेकतोय. खाली काही धनगर घोंगडयाची झोळी करून वरनं पडल्याल्या पोराला झेलत्यात.

बा म्हातारा झाल्यानं त्याचं पोर पुजारी झालेलं. अंग धनगरकाठीचं. काळं–सावळं. शिवाजीसारखी दाढी राखल्याली. देवावर श्रद्धा मायंदाळ.

पुजाऱ्यानं शिखराची पूजा केली. कट्ट्याला भंडारा लावला. कळसाला आणि कट्ट्याला नमस्कार करून तो पायरीवरनं कट्ट्यावर चढला. वरडला. 'अंगूळ झाल्याली पोरं वर आणा.' खाली तीस–पस्तीस प्वारं वल्या कापडावर बसल्यालं आणि एकादं प्वार अंगूळ करून येत्यालं.

ही नवसाची पोरं. देवाकडनं भगतानी मागून घेतल्याली. पोरं वरीस–दोन वरसापासनं सात–आठ वरसापतूर कवा तरी एकदा शिखरावरनं खाली टाकायचं. दर सालाला हे नवसाचं काम चालू असतंय. दर सालाला जत्रेला यायचं. दोन दिस देवाच्या दारात राहायचं. गोडा-खारा निवद करायचा. जत्रा उलगली की जायचं.

एकेक पोराला त्याचा बाप वर घेऊन जायला लागला. बाई माणसानं शिखरावर जायचं नाही. पोर कट्ट्याजवळ ठेवायचं. पुजारी काखतल्या पिशवीत हात घालायचा. समोरच्या पोराला भंडारा फासायचा. त्याला दोनी हातात आडवं धरायचं. शिखराकडं तोंड करून पोराला ववाळल्यासारखं करायचं आणि मग खाली टाकून द्यायचं.

पोर वरनं झोळीत पडताना मूठ आवळायचं, डोळं गच् बंद करायचं. काही पोरं तशी करायची नाहीत. डोळं उघडं ठेवायची. हसत हसत झोळीकडं यायची. झोळीतनं उडी मारून पळत देवळात घुसायची.

मसाळची तारा धनगरीन आपल्या वल्या पोराला उराशी धरून बसल्याली होती. तिचं हे नवसाचं एकूलतं एक पोर. पोरगं झाल्यावर बा कैलासपती झाल्याला. एका पोरासाठी ती जगत होती. होतं नव्हतं ते सारं पोरासाठी. शिखराची उंची बघून तिचं मन भ्यायला लागलं. मेंढरागत चरायला लागलं. झोळी फाटली तर ... बरूबर झेलला नाही तर ... चरता चरता मन पोराच्या मरणाकडं गेलं.

सगळी पोरं झाली. आता हिचं एकच पोर. पोराला सोडायला ती तयार होईना. लोकांनी पोराला हिसकावून घेतलं. एकटा माणस पोराला घेऊन शिखराकडं निघाला. पोराची आई वीज बडवल्यागत गप गार शिखराकडं बघत राहिली. तिला उठावं वाटलं पण उठणं झालं नाही. वरडावं वाटलं पण तोंड दाबल्यासारखं झालं. बळकं पडल्याल्या घागरीसारखं तिचं डोळं गळाय लागलं. 'चांग भलं' ऐकू आलं तसं तारी कोसळली.

पोरगं हसत हसत झोळीत पडलं होतं. झोळीतनं ते देवळात पळत गेलं. मग धनगरांनी पुजाऱ्यासाठी झोळी धरली. भगतानी 'चांग भलंची' गर्जना केली. पुजाऱ्यानं स्वतःलाही शिखरावरनं झोकून दिलं. घोंगडयाच्या झोळीतनं खाली उतरला. तारीकडं गेला. तारीच्या कपाळाला भंडारा फासला. तशी तारी हुडबडून उठली. देवळात पळत गेली. जत्रा संपली होती. लोक गावाकडं परतत होते.

तारा गावच्या वेशीजवळ आली. पोरावरनं दोन लिंबं उतरून टाकली.

—बापू जाधव
किर्लोस्करवाडी

# गडकरी शताब्दी

## दिवंगत साहित्यिकात घबराट

प्रि. खं. कुलकर्णी

' Life levels all men, Death reveals the great '

—बर्नार्ड शॉ

दिवंगत साहित्यिकात घबराट ही बातमी जरा चमत्कारिक वाटेल. भगवान व्यास यासारख्या पौराणिक व्यक्तीचा आत्मा हवे त्या वेळी हुकमी बोलाविता येतो हे पुणेकरांना नवीन नाही. जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटून मोक्ष मिळायला व्यासांना काय अडचण पडली असे कोणी विचारले आहे का? तेव्हा सर्व दिवंगत लेखकांचे आत्मे शाबूत असून बांद्र्यासारखी त्यांची परलोकात वसाहत आहे हे मानायला अडचण पडू नये. तेव्हा वरील बातमीचा 'सोर्स' वाचकांनी मागू नये. असे संरक्षण, हा बातमीदाराचा जन्मसिद्ध हक्क आहे असे कोर्टाचे 'रुलिंग' आहे.

'गडकरी शताब्दी' आली आणि त्याची पूर्वतयारी महाराष्ट्रात सुरू झाली. रॉयल्टीचा प्रश्न नसल्यामुळे प्रकाशकांनी आणि महाराष्ट्र शासनानेसुद्धा 'समग्र गडकरी' वाङ्मय छापले नाटकवाल्यांनी 'एकच

प्याला, पुण्यप्रभाव' असे प्रयोग पुन: लावले. शाळा–कॉलेजमध्ये गडकरी वाङ्मयाच्या विविध पैलूंवर चर्चा व स्पर्धा झाल्या. मातबर साहित्यिकांनी गडकऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. या सर्व बातम्या थोड्या उशिरा का होईना, परलोकातील वसाहतीत पोहोचतात. यामुळे गडकऱ्यांच्या आत्म्याला परम संतोष झाला. साहित्यिक जिवंत असताना त्याची आर्थिक हलाखी दूर करायला गरीब महाराष्ट्र असमर्थ ठरला, अथवा जिवंत असताना कौतुकाचे शब्द मोजून मापून लिहिणे हा पिंडस्वभाव असला तरी शंभर वर्षांनंतर का होईना, महाराष्ट्र गुणग्राहकतेत मागे पडत नाही या विचाराने गडकऱ्यांचे अंत:करण भरून आले. यानंतर जन्मशताब्दी कोणाची ही चर्चा हळूहळू साहित्यिक वसाहतीत सुरू झाली व अनेक दिवंगत साहित्यिक आपली शताब्दी कशी साजरी होईल याची चित्रे मनोमन रंगवू लागले. असे आनंदाचे वातावरण असताना दिवंगत साहित्यिकांत एकदम घबराट का उडाली! तेच सांगतो.

साहित्यिक आणि टीकाकार हे नाते सासू–सून, नणंद–भावजय यासारखे थोडेसे विरोधीच असते,हे प्रत्येकाला माहीत आहेच. परखड टीका म्हणजे सासूची सुनेबद्दल टीकाटिप्पणी. यात चांगला शब्द अर्थातच नसणार. गुणग्राही टीका म्हणजे नणंदेने भावजयीविषयी बोललेला एखादा चांगला शब्द. पण त्यातसुद्धा खोडसाळ शब्द पेरूनच. पोटदुखीतून, अथवा 'बोद्धारो मत्सरग्रस्त:' या वृत्तीतून झालेली टीका किंवा आचार्य अत्रे यांचा 'येरू' म्हणतो–

'येरू बोले टीकाच लिहिन आता
बडी झाली आहेत मस्त धेंडे
एक एकाची फोडतोच तोंडे'

¤

–अशी निव्वळ कुचाळकी हे सर्व प्रकार दिवंगत साहित्यिकांच्या परिचयाचे होते. अशा काही लिखाणामुळे घबराट होण्याइतपत कच्च्या दिलाचे कोणी नव्हते.

माझ्यासारख्या सामान्य माणसांना गडकरी कसे आठवतात? मी काही त्यांना पाहिलेले नाही. लहानपणी आम्ही त्यांची नाटके पाहिलेली. तळीराम, कामण्णा, कंकण यांच्या विनोदी संवादांनी आणि कोट्यांनी आमची भरपूर करमणूक झालेली. 'राजहंस माझा निजला' या गीताने चटका लावलेला. गडकरी हे नाव उच्चारले की हा अनुभव ताजा होतो आणि फोटोत पाहलेली, टोपी घातलेली मूर्ती डोळ्यासमोर येते. लिखाणाव्यतिरिक्त, गडकऱ्यांच्याविषयी आम्ही इतर काही ऐकले नव्हतेच असे नाही काही मंडळी बोलत, 'विस्कार पिऊन ते लिहायला बसायचे' इ. इ. सुधाकराचे 'या प्याल्यात काय आहे' हे प्रभावी स्वगत वाचून, दारूचा रंग रातब्याच्या पन्ह्यासारखा असावा अशी माफक कल्पना आमची दारूसंबंधी होती; पण मनावर नकळत असा संस्कार होता की, भाषाप्रभू गडकरी हे जीवन वेगळे आणि दारू पिणारे गडकरी वेगळे. गडकऱ्यांचे मूल्यमापन करायला त्यांनी जे लिखाण मागे ठेवले आहे तेवढे पुरे

पण हा आमचा विचार अपरिपक्व व भाबडेपणाचा होता हे नवीन टीका वाचून उमजायला लागले. हा नवीन प्रकार म्हणजे 'संशोधक टीकाकार'. मला वाटते हा प्रकार पी. एच. डी. ही उच्च पदवी घेण्यासाठी जी गरज असते त्यातून निर्माण झाला. जुन्या वाङ्मयाचे संशोधन तसे सोपे व निरुपद्रवी होते. महानुभाव पंथातील वाङ्मयाचा काळ कोणता? माहीत असलेल्या अभंगाखेरीज, तुकारामाचे इतर साहित्य आहे का? इ. इ. संशोधक टीकाकाराला अडचण पडते ती अलीकडच्या साहित्याबद्दल. लेखकाचे बहुतेक सर्व साहित्य छापलेले असतेच. जन्म, मृत्यू, केव्हा, कोठे हे पण निश्चित माहीत असते. सर्वसाधारण माणसाला कुतूहल असते तेवढी माहिती असतेच! पण त्यातून मूलग्राही नवीन संशोधन कसे निघणार! त्याला उपयोगी पडते ते फ्रॉईडचे अंतर्मनाच्या व्यापाराचे शास्त्र. संशोधक टीकाकाराला हे हत्यार एकदा गवसले की, साहित्याची प्रेरणा शोधून काढण्यासाठी, लेखकाच्या जीवनात कोठेही डोकावायला मुक्त परवानाच मिळतो. वाण्याच्या उधारीपासून तथाकथित प्रेमप्रकरणापर्यंत सर्व घटनांचा तपशिलवार मागोवा घेऊन त्याचा लेखकाच्या साहित्यावर कसा, कोठे, किती परिणाम झाला हे दाखवणे संशोधक टीकाकाराचे धर्मकार्यच ठरते.

परलोकातील साहित्य सहवासात घबराट उडाली त्याला निमित्त झाले ते महाराष्ट्रातील प्रत्येकाचे मित्र असलेल्या 'पत्रा'तील एका लेखाचे. (म. टा. ६ एप्रिल. ले. भीमराव कुलकर्णी) त्या भीमटोल्याने वर्मी घाव लागल्यासारख्या दुर्योधनाप्रमाणे गडकरी निपचिपच झाले. स्वत:च्या शताब्दीची सुखस्वप्ने पाहणारे इतर साहित्यिक आत्मे हादरून गेले. अनवधानाने आपण काही डायरीत लिहिले का? एखाद्या पत्रात नको तो उल्लेख तर झाला नाही ना? या पुराव्यावर संशोधक टीकाकार जनतेपुढे आपल्याला कोणत्या स्वरुपात उभे करतील कोणास ठाऊक! या विचाराने अनेकांची झोप उडाली. (वाच्यार्थाने आत्म्यांना झोप कोठली?) वेद अपौरुषेय का हे काही लेखकांना आता पटले.

भीमटोल्याने गडकरी निपचिप झाले तरी त्याच्या मनात ज्या खेदाच्या लाटा निर्माण झाल्या त्या व्यक्त करण्यासाठी त्याचा आत्मा तडफडत होता. ही फ्रीक्वेन्सी परलोकाशी संबंध राखणाऱ्या आमच्या 'मिडिअमला' बरोबर लागली. गडकऱ्यांनी पात्राची मनोगते दाखविण्यासाठी लांबलचक स्वगत भाषणे वापरली आहेत. हे त्यांचे स्वत:चे स्वगत, जगाच्या रंगभूमीवरील, असे म्हणायला हरकत नाही.

'अरे, एक माणूस म्हणून दैवाने दिलेले माझे आयुष्य किती थिटे होते हे मला दुसऱ्या कोणी सांगायला पाहिजे काय? पण परमेश्वराने मला एकच देणगी दिली होती· ती म्हणजे शब्दांतून कल्पनाविश्व निर्माण करण्याची. जे आयुष्यात मी करू शकत नव्हतो ते तिथे घडत असे. प्रत्यक्ष जीवन मनुष्याला सतत खाली ओढत असते. त्यातूनच मनुष्य एखादा उच्च क्षण गाठण्याची धडपड करत असतो. निर्वाणीच्या क्षणी, रणांगणावर प्राणाची बाजी लावणारा सैनिक, जन्मभर तसाच वागू शकेल काय? हसत फासावर जाणाऱ्या क्रांतिकारकाच्या आयुष्यात कधीच काही क्षुद्र घडले नसेल? मनुष्याचे मन किती सहज खाली उतरते ते एकच प्याल्यातील रामलालच्या तोंडून वदवले आहे– ती माझीच व्यथा. मी शब्दांतून रंगविलेले पराकोटीचा त्याग करणारे प्रेम, स्वार्थनिरपेक्ष दया आणि ते पाहून

पृष्ठ २८ वर

# लिबिया : रेगन आणि गोर्बाच्योव

**दो**न–तीन महिन्यापासून ज्याची तयारी सुरू होती, तो लिबियावरचा अमेरिकेचा हल्ला अखेर १४ एप्रिलला झाला. लिबियाच्या दहशती कृत्यांमुळे अमेरिकेच्या सुरक्षिततेला बाध येतो, अमेरिकन नागरिकांचे जीवित, युरोप व जगातली इतरत्रची अमेरिकन मालमत्ता धोक्यात आहे हा अमेरिकेचा दावा. लिबिया त्याहीपेक्षा जागतिक राजकारणातलं व्रात्य मूल समजले जाणाऱ्या कर्नल मुहम्मर गडाफींना धडा शिकविण्यासाठी ही कारवाई केली असा रेगन साहेबांचा दावा होता. पुढे जाऊन आवश्यक असेल तर आणखीही हल्ले आपण करू अशी भाषा त्यांनी वापरली. गेल्याच आठवड्यात त्यांनी पुन्हा एक बपर घोषणा केली. दहशतवादाला खतपाणी घालतात असा निर्विवाद पुरावा मिळाला तर इराण व सीरीयावर कारवाई करायलाही आपण डरणार नाही असं ते म्हणाले. एकंदरच अध्यक्ष रेगन यांचा मूड खराबच झालेला दिसतो. तशी सगळ्याच अमेरिकेची मनःस्थिती आहे. जगातल्या कोणत्याही राष्ट्रांना आपल्या इच्छेनुसार धडे शिकवायचा रेगन यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना विशेष राग गडाफींचा आहे.

मात्र लिबियावरचा हल्ला काही दहशतवाद खतम करण्यासाठीच होता, असं कुणीच मान्य करत नाही. उलट त्यामुळं गडाफींना आता जास्तच चेव आला असून जगभरातील अमेरिकन ब्रिटनच्या लक्ष्यांवर हल्ले करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. यामुळे दोन्ही देशांचं धाबंच दणाणलं.

मग हा हल्ला कशासाठी होता ?

एक तर अमेरिकेत गडाफी आवडत नाहीत हे विधान आहे तसेच घ्यायचे. गडाफी विषयी अगदी व्यक्तिगत तिरस्कार, गडाफी ज्या उचापती करत असतात त्याचा त्रास, ते ज्या तऱ्हेने वागतात, बोलतात, राज्य करतात त्याबद्दल घृणा अशा सर्व भावना अमेरिकन हल्ल्यात एकत्र आहेत. एखादा वात्रट मुलगा जसा भल्या भल्या पैलवानाला किंवा गंभीर विद्वानाला चिरडीला आणतो तसे गडाफी–अमेरिका संबंध आहेत. खेरीज गडाफींच्या सरधोपट धोरणानुसार जे जे म्हणून अमेरिकेविरुद्ध असेल त्या सर्वांना त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. १९६९ मध्ये ते लष्करी बंड करून सत्तेवर आले. इजिप्तचे अध्यक्ष नासर याच्या अमेरिकाविरोधी धोरणाचा वारसा त्यांनी उचलला. नासरला गुरू मानून त्यांनी सळसळत्या रक्ताच्या उत्साहाने नव्या–नव्या कल्पना 'लढवायला' सुरुवात केली. आल्या–आल्याच त्यांनी सर्व अरब राष्ट्रांना आपल्या नेतृत्वाखाली आणण्याचा प्रयत्न सुरू केला. अनेक अरब देशात अमेरिकेच्या आशीर्वादानं बिचारे राजे–रजवाडे नादत आहेत. त्यांनी म्हणे अमेरिकेच्या जोखडातून मुक्त व्हावं आणि स्वतंत्र अरब–अस्मिता जागवावी. यासाठी जनाब गडाफी अरब राष्ट्रातल्या जनतेशीच डायरेक्टली बोलतात, थेट त्यांनाच आवाहन करतात. या राष्ट्रांना त्याचाच त्रास. अरबांच्या कल्याणासाठी, इस्लामच्या प्रसारासाठी अरब देशात काही तरी कुरापती, क्रांत्या, बंड, उठाव घडवून आणण्याच्या गडाफींच्या सततच्या प्रयत्नांमुळे अरबी शेख वैतागले आहेत. बर अमेरिकाविरोधी कुरापती करायला गडाफींजवळ लिबियाच्या तेलातल्या पैशाचे भक्कम पाठबळ, जनतेतली लोकप्रियता आहे. त्याच्या आधारावर त्यांनी पॅलेस्टिनी मुक्ती संघटनेच्या कडव्या गटांना उदार आश्रय, मदत देणं सुरू केलं. १९७४ नंतर तर अरबी अर्थव्यवहाराचा गाभा असलेल्या 'ऑर्गनायझेशन ऑव्ह पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज' (ओपेक) या संघटनेत महत्त्वाची भूमिका त्यांच्याकडे आली.

लिबियातल्या तीस लाख जनतेचं जीवनमान आता फार चांगले आहे. गडाफींनी त्यानंतर आपला तेलपैसा 'स्वान्तसुखाय' म्हणावं अशा सत्कारणी लावायला सुरुवात केली. या सगळ्या भानगडी अमेरिका विरोधीच किंवा पश्चिम युरोप अमेरिकेतील हितसंबंधांच्या विरोधी होत्या. उदाहरणार्थ, पॅलेस्टिनी गनिमांना मदत, निकाराग्वेतील सॅंडीनिस्ट सरकारला मदत, एल. साल्वादोर व फिलिपीन्सच्या डाव्यांना मदत, अगदी आयरिश गनिमांनाही ते मदत करतात. याखेरीज इथिओपिया, घाना या अमेरिका-धार्जिण्या आफ्रिकी देशांतही तेथील डाव्यांना मदत ते करतात.

गडाफींसारख्या नेतृत्वाची आपल्याकडे अजून फारशी चिकित्सा झाली नाही. मात्र अविकसित राजकीय संस्कृती असलेल्या देशात कडवा डावा कार्यक्रम त्याचबरोबर धर्माच्या आवाहनाने राष्ट्रीयत्व जागे ठेवण्याच्या ज्या प्रक्रिया घडत असतात त्याचाच अतिशयोक्त आविष्कार म्हणजे गडाफी आहेत. इराण, इराक, पाकिस्तान, अफगाणिस्तान, काही प्रमाणात भारत, इस्रायल किंवा नवस्वतंत्र आफ्रिकी राष्ट्रात अशा राजकीय नेतृत्वाची गरज असते. डावा समतावादी कार्यक्रम, मात्र राष्ट्रवादासाठी धर्माच्या सोप्या मार्गाचा अवलंब करणे, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात स्वतंत्र आणि डावीकडे झुकलेली प्रतिमा निर्माण करणं, ही प्रवृत्ती सार्वत्रिक आहे. अमेरिका किंवा पश्चिम युरोपातील विकसित राष्ट्रे नेमकी या प्रवृत्तीविरुद्ध आहेत. या बांधिलकी स्वीकारलेल्या धोरणामुळे त्यांच्या प्रस्थापित (चांगल्या अर्थाने) आंतरराष्ट्रीय संबंध, अर्थकारण यांना बाधा येते. नेहमीच्या नैसर्गिक नॉर्मल चक्रापेक्षा नवोदित कडव्या राष्ट्रांच्या राजकारणामुळे नवेच घटक या चक्रात उपटतात आणि गोंधळ माजवतात. प्रस्थापित राष्ट्रांचा या Disruption ला विरोध असतो. गडाफी या प्रवृत्तीचं व्रात्य, टोकाला गेलेलं उदाहरण आहे. त्यामुळं गडाफीवर अमेरिका हल्ला करत असेल, पण त्याचबरोबर भारताशीही तणावाचे संबंध आहेत, याचा अर्थ काय होतो ; वर सांगितलेल्या या वेगळ्या प्रवृत्तीला दिलेल्या प्रतिसादाच्या तीव्रतेतलाच हा फरक आहे.

## हा कसला उपाय ?

मात्र अमेरिकेने, विशेषतः रेगनसाहेबांनी यावर उपाय म्हणून जो काही मार्ग घेतला आहे, तो खुद्द त्यांच्याच अंगलट येणार आहे. लिबियासारख्या राष्ट्राचा दहशतवाद कमी

होण्याच्याऐवजी आता वाढणारच आहे. बरं, इतर युरोपीय व अरब राष्ट्रांनाही गडाफी नको आहेत. पण गडाफीविरुद्ध काही बोललं तर आपल्याच घरात उद्या बाँबस्फोट व्हायला लागले तर काय घ्या ह्या भीतीनं त्यांनी अमेरिकेचा निषेध केला किंवा अमेरिकेशी असहकार केला. युरोपीय ( नाटो ) राष्ट्रांना जागतिक दहशतवाद, लोकशाही, मानववाद इत्यादींपेक्षा आपल्या भूमीची काळजी आहे. अमेरिका आहे सातासमुद्रापल्याड. गडाफी काय किंवा रशिया काय, यांचा प्रत्यक्ष सासुरवास सहन करावा लागतो तो युरोपच्या देशांना. म्हणून त्यांनी ( विशेषतः युरोपीय आर्थिक समुदाय ) आपलं बरोबर धोरण ठेवलं. अरब व युरोपीय देशातलं आतापर्यंतचं गडाफीविरुद्ध असलेलं जनमत या हल्ल्यामुळं निवळत आहे. विशेषतः अरब राष्ट्रांमध्ये तर गडाफी हिरो होत आहेत. अशा Populist नेतृत्वाचं फार आकर्षण असतं. अरब व युरोपीय देशात, तात्पुरतं का होईना रेगन एकटे पडतायत.

दुसरीकडं गडाफींनी अमेरिकेला सरळ धमकीच दिली आहे– रशियाला सामील व्हायची. रशियाला लिबियाच्या सागरी हद्दीत लष्करी तळ द्यायची गडाफींनी तयारी दाखवली. त्याचबरोबर रशियाच्या आधिपत्याखालच्या वॉर्सा करार राष्ट्रांच्या संघटनेत सामील होण्यासाठी गुप्त चर्चा सुरू केली अशा निदान वातम्या तरी पसरवल्या जात आहेत. अर्थात याला कितपत यश येईल हे सांगणं कठिणच. कारण खुद्द रशियालाच गडाफीबाबांचा धसका आहे. आज आमच्याकडं आला. उद्या हा इस्लामच्या नावानं आम्हालाच धक्क्याला लावेल अशी रास्त भीती मॉस्कोत आहे. त्यामुळं वॉर्सा करारावद्दल वाटाघाटीतही रशियाने काही स्पष्ट अटी टाकल्याचं समजतं. लष्करी तळाबाबतही रशिया फारसा उत्सुक नाही. लिबियात रशियाचे सात हजार लष्करी सल्लागार असले तरी लिबियाबरोबर अजूनही मैत्रीचा करार रशियाने केला नाही. त्यामुळं हल्ला केल्याबद्दल रशिया अमेरिकेवर टीका करत असेलही. मात्र महायुद्ध व्हावं अशा कोणत्याच हालचाली रशिया करत नाही. अमेरिकेचं आरमार निघून गेल्यावर रशियानं आपलं आरमार भूमध्य समुद्रात पाठवलं याला काय म्हणावं ?

## प्रतिस्पर्धी वेगळाच


म्हणून रशिया–लिबिया अशी मोर्चेबंदी होते का, हा प्रश्न फार जुजबी आहे. तशी ती होईल किंवा होणार नाही. मुद्दा वेगळाच आहे. गेल्या वर्षभरापास्नं मॉस्कोत अतिशय धूर्त, हुशार, राजकारणी नेता बसलेला आहे. सोविएत रशियाला असा राजकारणी नेता यापूर्वी लेलीनच्या रूपानंच मिळाला होता. मिखाईल गोर्बाच्योव हा रशियाचा नेता ज्या सावधगिरीनं, समजदारीनं राजकारण करत आहे, ज्या सूक्ष्मतेनं राजकीय ताणेबाणे विणत आहे, ती पद्धत, प्रक्रिया खरंच पाहत राहण्यासारखी आहे. हा माणूस डोक्यानं राजकारण करणारा आहे. मठ्ठ, धसमुसळा, क्रूर, ताठर ( ब्रेझनेव, चेर्नेको, ग्रोमिको ) असा नाही. सत्तेवर आल्यापासून गोर्बाच्योव यांनी मुत्सद्देगिरीनं पश्चिम युरोप, अमेरिका यांच्याशी बुद्धिबळ खेळणं सुरू केलं, प्रत्येक वेळी प्रतिपक्षाला बचावात्मक पवित्र्यात ठेवलं. रशियासारख्या महासत्तेतल्या या नव्या माणसाला प्रतिशह देणारा प्रतिस्पर्धी तेवढाच कावेवाज, सूक्ष्म, दूरदर्शी असावा लागतो. लिबिया प्रकरणी रशिया महायुद्ध पेटवणारच नाही. कारण जिथं लढाई सुरू होते तिथं रा जकारण संपतं, हे मुत्सद्देगिरीतलं तत्त्व गोर्बाच्योव यांनी आत्मसात केल्याचं दिसतं. लिबिया प्रकरणाचा भांडवल म्हणून अनेक वर्षं, अनेक प्रकारांनी उपयोग करून घेण्याचा त्याचा प्रयत्न आहे. युद्ध सुरू झालं की प्रतिपक्षाची कोंडी करायला इतर फारसा वाव नसतो. गोर्बाच्योव अमेरिकेविरुद्ध केसच करायला बसले. त्यांनी मांडलेली शांतता निःशस्त्रीकरण प्रस्तावाची भेंडोळी, पश्चिम युरोपला अमेरिकेपासून फोडण्याचे प्रयत्न, शिखर चर्चेसंबंधी त्यांच्या कृती, स्टार–वॉर्स इ. इ. प्रकरणी गोर्बाच्योव अमेरिकेची राजकीय कोंडी करण्याच्या तयारीत आहेत. लिबिया प्रकरण ते इतक्या लवकर संपवणार नाहीत. लिबियाशी तह केला किंवा त्याच्या बाजूनं युद्ध करणं म्हणजे मामलाच खतम. गोर्बाच्योव या प्रकरणाचा वेगळ्या स्तरावर वापर करतील.

रेगन त्यांच्यासमोर एकदम धसमुसळेच वाटतात. गोर्बाच्योवसारख्या हिशोबी, कसलेल्या मुत्सद्याला तोंड द्यायला किसिंजर–उलेस सारखाच बुद्धिबळपटू लागत असतो. रेगन, त्यांचे संरक्षणमंत्री वेनबर्गर, परराष्ट्रमंत्री शुल्झ हे अही–मट्टी याबाबत फारच थिटे पडत आहेत.

आपलेच पाय आपल्या गळ्यात पडल्याचे बघण्याची अमेरिकेला आता सवय आहे. राजकारण करताना सहनशीलता, सूक्ष्मता आणि बुद्धी यांची आवश्यकता असते. त्याला एक जागतिक दर्शन ( Vision ) लागते. तरच ते यशस्वी होतं. एके काळी चीन, आग्नेय आशिया, ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंड, मध्य–पश्चिम आशिया, सुवेझ पट्टा, अरब–आफ्रिकी राष्ट्रं, पश्चिम युरोप या सर्वांची फळी उभी करण्याचं काम झालं होतं. किसिंजर यांनी या कामी बहुमोल कामगिरी बजावली. कार्टर यांच्या कारकिर्दीत अलिप्त, गरीब राष्ट्रांचा अमेरिकाविरोध, वैचारिक संघर्ष निवळत होता. रेगनसाहेबांना ही उत्तम पार्श्वभूमी मिळाली होती. मात्र त्यांच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या टप्प्यात या जमून आलेल्या डावाचा विचकाच होत असल्याचं दिसत आहे. लिबिया प्रकरण हे त्याचं ताजं उदाहरण.

अमेरिकन पब्लिकला खूष करण्यासाठी रेगन असल्या 'रॅम्बो' चाली खेळतात असं म्हणतात. अमेरिकन जनतेचा मूडच 'रॅम्बो' सारखा झाला, म्हणूनच रेगन सतत निवडून आले व अजूनही लोकप्रिय आहेत. मात्र या वृत्तीमुळं आपल्याच राजकारणाचं नुकसान होतं, हे त्यांना लिबिया प्रकरणीच्या विचक्यानंतरही जनतेत दिसत नाही.

–संजय संगवई



# शाहबानो निर्णयाचा पक्ष राजकारणावर झालेला परिणाम

प्रा. बी. वाय. कुलकर्णी, जालना

७३ वर्षांच्या शहाबानोला तिचे पती अहमदखान यांनी विवाहानंतर ४३ वर्षांनी मुस्लिम परंपरागत पद्धतीने तलाख दिला. शहाबानोला हा अन्याय वाटला व तिने न्यायालयाकडे धाव घेतली एप्रिल ८५ मध्ये या खटल्याचा निकाल लागला. सर्वोच्च न्यायालयाने शाहबानोचा पोटगीचा हक्क मान्य केला. शाहबानो खटला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या खटल्याने मुस्लिम समाजात प्रचंड खळबळ निर्माण केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरूद्ध देशाच्या सर्व भागातून त्या समाजाने कोणत्या ना कोणत्या स्वरूपात विरोध नोंदवला या निर्णयाचे स्वागत करणाराही एक सुधारकाचा आवाज होता; पण तो फारच क्षीण होता.

१८५७ मध्ये काडतुसाला लावलेल्या चरबीनंतर मुस्लिमांची अराजकीय स्वरूपाची ही मोठी प्रतिक्रिया होती. या निकालामुळे उठलेल्या वादळाचा पहिला परिणाम म्हणजे 'प्रत्येक लहान व मोठ्या शहरात मौलानाकडे समाजाचे नेतृत्व गेले' नई दुनियाचे संपादक शाहीद सिद्दीकीच्या मते 'जर शहाबानो निकालामुळे निर्माण झालेली परिस्थिती बदलली नाही तर हे मौलवी समाजाला तीन शतके मागे घेऊन जातील'; पण या निर्णयाला विरोध करणाऱ्यांच्या मते 'हा आमचा धार्मिक लढा नाही, तर आमची स्वतंत्र ओळख मिटवण्याचा व आम्हाला गिळंकृत करण्याच्या विरुद्धचा लढा आहे व तो आम्ही वाट्टेल ती किंमत देऊन लढणार आहोत.'

शहाबानो निकालाच्या संदर्भात सुरुवातीला सरकारची भूमिका निर्णयाच्या बाजूने होती. केंद्रीय मंत्री अरिफ मोहम्मद यांनी पंतप्रधानांच्या संमतीने सर्वोच्च न्यायालयाचे समर्थन करावयास सुरुवातही केली होती. पण सरकारला अरिफांची भूमिका मुस्लिम मतासाठी परवडणारी नव्हती आणि म्हणूनच पंतप्रधानांच्या संमतीने त्यांच्याच मंत्रीमंडळातील मंत्री झेड. अन्सारींनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर तोफ डागली, न्या. चंद्रचूडांवर तोंडसुख घेतले. सरकारने मते मिळविण्यासाठी निर्णयाच्या विरूद्ध भूमिका घेतली व सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करण्यासाठी व तशा प्रकारचा निर्णय न्यायालयाला पुन्हा देता येऊ नये म्हणून २५ फेब्रुवारी ८६ ला, मुस्लिम स्त्रियांना तलाखच्या संदर्भात न्यायालयात जाण्यासाठी मज्जाव करणारे 'Protection of Rights on Divorce' हे विधेयक संसदेत मांडण्यात आले. हे विधेयक धर्मनिरपेक्ष स्वरुपाचे आहे असे त्याचे समर्थन करून पंतप्रधानांनी धर्मनिरपेक्षतेची थट्टा केली, तर कायदा मंत्र्यांनी म्हटले की हे विधेयक आम्ही मुस्लिम नेतृत्वाचे मत लक्षात घेऊन मांडत आहोत, पण त्यांनी मुस्लिम नेतृत्वाचे म्हणजे कोणाचे मत हे स्पष्ट केले नाही. पण अशा प्रकारची मागणी प्रतिगामी, मूलतत्ववादी मौलवींनी व तशाच प्रकारच्या काँग्रेस बाहेरील, मुस्लिम लीगसारख्या प्रतिगामी पक्षांनी केली होती. म्हणजे काँग्रेस बाहेरील प्रतिगामी लोकांनाच फक्त मुस्लिमांच्या वतीने बोलण्याचा अधिकार आहे हे काँग्रेसने मान्य केले व काँग्रेसमधील मुस्लिम नेतृत्वाचा अनादर केला. एक प्रकारे काँग्रेस पक्षातील मुस्लिम, मुसलमानांच्या वतीने बोलू शकत नाही, त्यांना तो अधिकार नाही, असेच सरकारला म्हणावयाचे होते. सरकारची व काँग्रेसची मुस्लिम नेतृत्व निश्चित करण्याबाबतची ही भूमिका काँग्रेसने स्वातंत्र्य पूर्व काळात घेतलेल्या भूमिकेशी पूर्णत: विसंगत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात फक्त मुस्लिम लीगलाच मुस्लिमांच्या वतीने बोलण्याचा अधिकार आहे या मुस्लिम लीगच्या भूमिकेला काँग्रेसने विरोध केला होता व काँग्रेसमधील मुस्लिमांच्या मतांची योग्य दखल ब्रिटिशांनी घ्यावी असा आग्रह धरला होता. काँग्रेसने मुस्लिम लीग व द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतालाही विरोध केला होता. कारण त्यामुळे राष्ट्राची फाळणी होणार होती. आज त्याच काँग्रेसचे वारसदार मुस्लिम लीग, कट्टरपंथीयांना मुस्लिमांचे नेते मानू लागले आहेत. मुस्लिमांची मते मिळविण्यासाठी काँग्रेसने सुरू केलेला मुस्लिम अनुनय देशाच्या एकात्मतेला मारक ठरेल तर धर्मनिरपेक्षता पूर्णपणे संपवील.

## पराभवाचे धक्के

झेड. अन्सारींना समज न देऊन अरिफ मोहम्मद यांचा पाठिंबा काढून व त्यांचा राजीनामा स्वीकारून व मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात नवीन विधेयक मांडून काँग्रेसने मुस्लिम अनुनयाला सुरुवात केली. याचे प्रमुख कारण शाहबानो निकालानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचा झालेला पराभव. काँग्रेसला पराभवाचा पहिला धक्का बसला तो उत्तर बिहारमधील किसनगंज लोकसभा मतदारसंघात. या मतदारसंघातून जनता पक्षाचे सैय्यद शहाबुद्दीन यांनी स्थानिक उमेदवार मौलाना इसर उल हक यांना हरवले—जे काँग्रेसचे उमेदवार होते व असमचे कट्टरपंथी नेता मौलाना असन मदनी यांचे शिष्य होते शाहबानो निर्णयाच्या संदर्भात जनता व काँग्रेसच्या उमेदवारात काहीही मतभेद नव्हता. दोघेही निकालाच्या विरोधात होते असे असतानाही मतदारांनी विरोधी पक्षाच्या कट्टरपंथी उमेदवाराला विजयी केले वास्तविक ही जागा काँग्रेसने एक वर्षापूर्वी १ लाख ३ हजार मताधिक्याने जिंकली होती. या मतदार संघाचे वैशिष्ट्य म्हणजे या मतदार संघात मोठ्या प्रमाणात मुस्लिम आहेत. आणि म्हणूनच काँग्रेसने जमायते—उल—उलेमा—ए—हिंदच्या सचिवांना उमेदवारी दिली होती त्यांच्या प्रचारासाठी

पक्षाने २०० उलेमाना देशाच्या सर्व भागातून आणले होते. पण त्याचा काही फायदा झाला नाही कित्येक ठिकाणी त्याना सभाही घेता आल्या नाही. शहाबुद्दीन यांच्या विजयाबद्दल बोलताना अंजूमन तराकी-ऐ उर्दू बिहारचे अध्यक्ष डॉ. अब्दूल मोघानी म्हणाले की 'मुस्लिमाची मते शहाबुद्दीन याना पडली नाहीत तर ती शरीयतला पडली.' तर या विजयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना शहाबुद्दीन म्हणाले की, या विजयामुळे कॉंग्रेसने मुस्लिम मतबँक गमावली आहे हे स्पष्ट झाले आहे.

असममध्ये कॉंग्रेसची पूर्ण वाताहत झाली. तेथे नव्याने निर्माण झालेल्या युनायटेड मायनॉरिटिज फ्रंट (यु. एम. एफ.) या अल्पसंख्याकाच्या पक्षाने असम विधान सभेच्या १८ जागा जिंकल्या. या अठरा मतदारसंघात मुस्लिम मतदार बहुसंख्य होते. युएमएफनी असम विधानसभेच्या निवडणूक प्रचारात फक्त दोनच मुद्द्याना महत्त्व दिले. एक शहाबानो निकालामुळे त्यांच्या धर्मात झालेला हस्तक्षेप व असम करारामुळे परकीय मुस्लिम घुसखोरावर झालेला आघात.

काही ठिकाणी तर प्रचारात असेही म्हटले गेले, की, शाहबानोला काही हितसबंधी हिंदुनीच न्यायालयात जाण्यास प्रवृत्त केले. म्हणजे असममध्ये मुस्लिम मते पूर्णत असम गणसग्राम परिषदेबरोबरच कॉंग्रेसच्याही विरोधात होती.

गुजरायमध्ये, बडोद्यातील सयाजीगज विधानसभा मतदार सघातून कॉंग्रेसच्या उमेदवाराचा ८३६५ मतानी पराभव झाला. या पराभवाबद्दल बोलताना मुख्यमत्री चौधरीनी म्हटले आहे की, कॉंग्रेसचा पराभव मोठ्या प्रमाणात मुस्लिमांची मते विरोधात गेल्यामुळे झाला.

बिजनोर मतदार संघात कॉंग्रेसच्या उमेदवार मीराकुमारी यशस्वी झाल्या. पण तेथेही पक्षाला मुस्लिमांची मते मिळाली नाहीत असा निरीक्षकाचा अंदाज आहे. कारण त्याशिवाय लोकदलाचे उमेदवार रामबिलास शर्मा याना १ लाख २२ हजार मते पडलीच नसती.

ओरिसाचे मुख्यमत्री पटनाइक यानी कबूल केले आहे की, कॉंग्रेसला मिळणारी मुस्लिमाची मते आता पडली नाहीत म्हणूनच केंद्रापारा मतदार सघात पक्षाच्या उमेदवाराचा जास्त मतानी पराभव झाला. तर पश्चिम बगालमध्ये कॉंग्रेसच्या उमेदवाराचा पराभव झाला. याबद्दल प्रियरंजनदास मुन्शि म्हणाले की, सिद्धार्थ शकर रें चा ४० हजारानी पराभव झाला, कारण डिसेंबर ८४ मध्ये या मतदार सघात कॉंग्रेसला जितकी मुस्लिम मते पडली तितकीही मते यावेळी पडली नाहीत नुकत्याच झालेल्या हैद्राबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुस्लिम मते जी कॉंग्रेसला पडत होती ती एका मुस्लिम (MIM) सघटनेला पडली.

मुंबईतील कॉंग्रेस शताब्दी समारोहप्रसगी जम्मू-कश्मीर कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख मुफ्ती मोहम्मद सैय्यद यांनी श्रेष्ठीजवळ तक्रार केली होती की, त्याना लोक सरळ-सरळ म्हणत आहेत की, 'कॉंग्रेस पक्ष उत्तर हिंदुस्थानातील हिंदुचा पक्ष झालेला आहे.' याव्यतिरिक्त वेगवेगळ्या प्रातातील मुस्लिम नेत्यानी उलेमाची ताकद पतप्रधानांच्या नजरेस आणून दिली. भारतभर असलेल्या उलेमानी जवळपास असेच सूचित केले होते की, जर त्यानी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करणारे विधेयक माडले नाही व संमत केले नाही तर ते कॉंग्रेस पक्षाला ७७ प्रमाणे विरोध करतील.

कॉंग्रेसला ७ ३ कोटी मुस्लिमांच्या एकगठ्ठा मताची जाणीव आहे. आणि हे खरे आहे की, केवळ मुस्लिम मताच्या जोरावर जवळपास ५० लोकसभेच्या जागा जिंकता येतात. तर त्याची एकगठ्ठा मते १०० लोकसभेच्या जागेच्या निकालात बदल करू शकतात. या व्यतिरिक्त जम्मू-कश्मीर, बिहार, उत्तरप्रदेश, प. बंगाल व असम या पाच राज्यात तर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला मुस्लिमांची बहुसख्य मते पडल्याशिवाय सत्ता हस्तगत करताच येत नाही. आणि म्हणूनच कॉंग्रेसला मुस्लिम अनुनय करण्याशिवाय पर्यायच उरलेला नाही. त्यातच असम धर्तीवर युएमएफसारखा राष्ट्रीय पक्ष तयार झाला किंवा बहुगुणाची मुस्लिमाचा हितचिंतक ही प्रतिमा व मुस्लिमाचा हितचिंतक ही शहाबुद्दीन यांची निर्माण झालेली प्रतिमा घेऊन जनता-लोकदल एकत्र आले तर कॉंग्रेसला उत्तरेत यश मिळणे कठीण होईल. आणि हे लक्षात घेऊनच अन्सारीना बोलण्याची समती देण्यात आली होती तर अरिफ याना दिलेला पाठिंबा काढून घेण्यात आला. कारण अरिफ मोहम्मद यांच्या पुरोगामी भूमिकेमुळे व त्यानी नवीन विधेयकाला केलेल्या विरोधामुळे पक्षाची मुस्लिम मते जाणार होती. कारण मुस्लिम कट्टरपथीयानी अरिफाच्या विरुद्ध असा प्रचार सुरू केला होता की, त्यानी जर मुस्लिम मतदार जास्त असलेल्या मतदार सघातून निवडणूक लढवली तर त्याची अनामत जप्त होईल. अरिफ मोहम्मद यांच्या विरुद्धची ही प्रचार मोहीम कॉंग्रेस श्रेष्ठीना मुस्लिम मतदाराचा कौल दाखवून देण्यासाठी होती व त्यात ते यशस्वी झाले. परिणामतः भारताला २१ व्या शतकाकडे नेण्याची सतत भाषा करणाऱ्या पतप्रधानानी मुस्लिम समाजाला व प्रामुख्याने स्त्रियांना १५ व्या शतकात नेणारे विधेयक संसदेत मांडले. या विधेयकाला विरोध करणाऱ्या व मुस्लिम समाजालाही २१ व्या शतकात नेण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अरिफ मोहम्मद याचा राजीनामा पंतप्रधानानी नि:सकोचपणे स्वीकारला.

## शहाबुद्दीन कॉंग्रेसमध्ये?

शाहबानो निर्णयामुळे कॉंग्रेस पक्षातील मुस्लिम नेतृत्वावर आणखी एक गडातर येऊ घातले आहे आणि ते म्हणजे जनता पक्षातील सैय्यद शहाबुद्दीन यांचा कॉंग्रेस प्रवेश. राजकीय वर्तुळात अशी जोरदार चर्चा सुरू आहे की, जनता खासदार शहाबुद्दीन कॉंग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत आणि असे झाले तर कॉंग्रेस पक्षातील मुस्लिम नेत्याचा भाव एकदम कमी होईल दिल्लीतील राजकीय निरीक्षकाच्या मते शहाबुद्दीन निवेदन देण्याच्या निमित्ताने दोनदा पंतप्रधानाना भेटले आहेत. विशेष म्हणजे शहाबुद्दीन याचीदेखील कॉंग्रेसला गरज आहे. कारण आज कॉंग्रेसजवळ राष्ट्रीय पातळीवर मुस्लिमाना आवाहन करू शकणारा एकही नेता नाही मुस्लिम प्रातिक नेतृत्व कॉंग्रेसला मते मिळवून देईल अशी आज खात्री देता येत नाही. याचा पुरावा म्हणजे आसाममध्ये गनी खानचा झालेला पराभव. तेथे मुस्लिम मते कॉंग्रेसला नाही तर युनायटेट मायनॉरिटिज फ्रटला मिळाली. बिहारमध्ये माजी मुख्यमंत्री अब्दुल गफूर

याची लोकप्रियता मुस्लिमात संपलेली आहे. गुजराथमध्ये अहमद पटेलाची भूमिका एका विभागापुरती ठीक आहे, पूर्ण राज्यातील मुस्लिमाना ते आवाहन करू शकत नाहीत. महाराष्ट्रात अतुले बरेच लोकप्रिय होते, काँग्रेस पक्षातून बाहेर पडल्यावरही मते मिळण्याच्या संदर्भात त्याचा उपयोग होऊ शकतो पण त्याची प्रतिमा 'मिस्टर क्लीन'शी जुळत नसल्यामुळे ते शहाबुद्दीनाना पर्याय होऊ शकत नाहीत.

काँग्रेसजवळ आज फक्त काँग्रेस सेवादल अध्यक्ष तारीक अन्वरची चागली प्रतिमा आहे; पण त्याचा राजकीय अनुभव पुरेसा नाही त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर काँग्रेसमध्ये मुस्लिम नेतृत्वाची निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी ते पर्याय होऊ शकत नाहीत.

अशा स्थितीत आज काँग्रेसला नाराज झालेल्या मुस्लिमाना आवाहन करणाऱ्या मुस्लिम नेतृत्वाची गरज आहे आणि म्हणूनच सैय्यद शहाबुद्दीनांचा काँग्रेस प्रवेश नाकारता येत नाही. यामुळेच काँग्रेसमधील नेते चिंताग्रस्त झालेले आहेत. कारण शहाबुद्दीन काँग्रेस पक्षात येतील ते पक्षातील (काँग्रेस) मुस्लिम नेतृत्वाच्या छातीवर पाय ठेऊन! त्याचे नेतृत्व दुय्यम स्वरूपाचे करून! शहाबुद्दीन अतिशय महत्त्वाकांक्षी आहेत. त्यानी किसनगंजची निवडणूक स्वबलावर जिंकलेली आहे. राजकारणात त्यानी प्रवेश विदेशातील चागली नोकरी सोडून केलेला आहे राजकारणात प्रवेश केल्यापासून ते सतत मुस्लिमाच्या हितसंबंधाच्या संदर्भात बोलत आहेत. त्याच्या विचाराना कोणत्याही चाकोरीत बसवता येत नाही. पण त्याचे विचार मुस्लिमाना मात्र आवडतात. आज त्याची उंची मुस्लिम लीगच्या नेत्यापेक्षा जास्त आहे आणि म्हणूनच त्याना आज 'जनता पक्षाचे जीना' म्हटले जाते.

काँग्रेसला मतासाठी शहाबुद्दीनाची गरज आहे तर शहाबुद्दीनाना देखील त्यानी शहाबानो निकालावर घेतलेल्या भूमिकेमुळे जनता पक्षात राहणे कठीण झाले आहे. मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात बदल करू नये या त्याच्या मतामुळे जनता पक्षांतर्गत त्यांच्यावर टीका होऊ लागलेली आहे. जनता पक्षात उपहासाने त्यांचा 'कायदे आझम' असा उल्लेख होतो आहे तर बिहारातून राज्यसभेसाठी ते उमेदवार असताना त्याना पाडण्याचा प्रयत्न जनतापक्ष नेत्यानी केला होता. जनतापक्षाच्या बालीया अधिवेशनात त्याना भाषण करण्याकरिता पत्रके वाटण्याचा आधार घ्यावा लागला होता किसनगज निवडणुकीत पक्षाने त्याना फारशी मदत केली नव्हती. अशा स्थितीत त्यानी जनता पक्ष सोडला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही फक्त त्यासाठी राजीव–शहाबुद्दीन याच्यात व्यवहार्य वाटाघाटी होणे आवश्यक आहे

शहाबानो निर्णयावर काय भूमिका घ्यावी यावरून जवळपास सर्वच राजकीय पक्षात सुदोपसुदी सुरू झालेली आहे. त्याला अपवाद आहे (मार्क्सवादी) साम्यवादी पक्ष या पक्षाने निःसदिग्धपणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला पाठिंबा दिलेला आहे.

भारतीय जनता पक्षाला सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्पष्ट भूमिका घेताना बरीच किंमत मोजावी लागली असे दिसते. पक्षाच्या चंदीगड अधिवेशनात सर्वोच्च न्यायालय निकालाला पाठिंबा देणारा ठराव पक्षाने संमत केला. पण त्याला पक्षातील व पक्षाबाहेरील मुस्लिमांनी विरोध केला हा ठराव होणार म्हणून अधिवेशनाला सिकंदर बख्त अनुपस्थित राहिले तर आरिफ बेग यानी या ठरावाला विरोध केला. काही मुस्लिम पक्ष कार्यकर्त्यांनी या ठरावाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली व भाजपने नवीन माडलेल्या विधेयकाला पाठिंबा द्यावा असे मत माडले. बाजपेयींनी त्याला विरोध केला ते काहीही असो, शाहबानोमुळे या पक्षाला देखील मतभेदाना तोड द्यावे लागत आहे.

थोडक्यात शाहबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला पाठिंबा दिला तर मुस्लिम मते जातात, म्हणून २१ व्या शतकाची भाषा करणारे पतप्रधान १५ व्या शतकाकडे वाटचाल करीत आहत, तर बाकी राजकीय पक्षाना कोणती भूमिका घ्यावी हेच कळेनासे झाले आहे सध्या कोणतीही महत्त्वाची निवडणूक नसल्यामुळे सर्वच पक्ष फक्त मुस्लिम मनाचा व हिंदू व इतर मताचा कानोसा घेण्यात वेळ घालवत आहेत. □

## जवण आरोग्यकेंद्रासाठी डॉक्टरची गरज

पुणे जिल्ह्यातील पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात 'जीवन' संस्था काम करीत आहे.

पवनेचा जलाशय व सभोवार पसरलेले तुंग–तिकोना–लोहगड–विसापूर किल्ले यामुळे हा परिसर नितांत रमणीय दिसत असला तरी धरणामुळे 'कोंडल्या' गेलेल्या गावातील लोकजीवन अतिशय खडतर आहे. विशेषतः धरणग्रस्त पंचक्रोशीत एकही दवाखाना नसल्याने अडल्या–नडल्या रोग्याचे फार हाल होतात. पुण्यासारखे आधुनिक शहर केवळ साठ किलो मिटर्सवर असतानाही या भागात वाळतिणीची 'सुटका' गवत कापायच्या विळयाने होते या एकाच गोष्टीवरून एकूण परिस्थितीची कल्पना येईल.

अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी संस्थेने 'जवण' या गावी बांधलेल्या आरोग्य केंद्रासाठी एक पूर्ण वेळ / अर्धवेळ डॉक्टरची गरज आहे. जवण गावी राहाण्याची तयारी असलेल्या व आरोग्य–शिक्षणाची दृष्टी असलेल्या डॉक्टरांना प्राधान्य दिले जाईल. पुणे–जवण एस. टी. प्रवास दोन तासाचा आहे.

सामाजिक कामाची जाण व आवड असलेल्या डॉक्टरानी कृपया शिक्षण–अनुभव–मानधन व इतर अपेक्षासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

जगदीश गोडबोले सचिव : 'जीवन' संस्था, सीमा ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४.

# मॉर्मन लोकांच्या जगात....

श्रीकांत करमरकर, लोगन

It's a mad mad mad America !

अमेरिका बघून, अमेरिकेत निवास करून परतलेल्या अनेकाकडून हा सावधगिरीचा सल्ला घेतला आणि ५ महिन्यापूर्वी पी. एच. डी करण्यासाठी युटाह्‌ स्टेट युनिव्हर्सिटी, लोगन येथे आलो अमेरिकेच्या उत्तर पश्चिमेला 'वासाच् डोंगराच्या' कुशीत युटाह्‌ स्टेट वसलेले आहे. विद्यापीठ, सॉल्ट लेक सिटी ( शब्दश. खारवट तलावाच्या काठावरील शहर, युटाह्‌ स्टेटची राजधानी ) च्या उत्तरेला आहे. हे विद्यापीठ खर तर आतरविश्व विद्यापीठासारखे आहे. सुमारे ९० देशातून १२०० विद्यार्थी विविध अभ्यासक्रमाकरिता येथे आलेले आहेत जपान, तैवान, चीन, भारत यासारख्या पूर्वेकडील देशातून, तसेच सोमलिया, नायजेरिया या सारख्या आफ्रिका खडातील देशातून येथे विद्यार्थी आलेले आहेत. इराक–इराण या दोन्ही देशातून, तसेच इजिप्त, इस्रायल या देशातूनही. लॅटिन अमेरिकेतून तसेच इग्लड, फ्रान्समधूनही. विविध सस्कृतीतून हे विद्यार्थी आलेले असल्याने, सांस्कृतिकदृष्टचा हे विद्यापीठ विलक्षण समृद्ध झालेले आहे. 'सलाम वालेकुम' कधी ऐकायला मिळते तर कधी 'मूछस ग्राशीयस्'! चिनी भाषेतील पुस्तके बघायला मिळतात तसेच 'नमस्ते !' सुद्धा ऐकायला मिळते.

आल्यानतर बँकेत खाते उघडायला गेलो. बँक मॅनेजरच्या समोर कॉम्प्युटर होता नाव पत्ता यापाठोपाठ माझ्या आईचे नाव विचारले ! बँकेतून बाहेर आल्यानतर मित्राने स्पष्टीकरण दिले– 'Mother is the fact, father is the fiction' ही येथील विचारसरणी आहे हळूहळू अशारीतीने आंतरराष्ट्रीय संस्कृतीच्या दर्शनाबरोबर अमेरिकन चालीरिती रिवाज अगवळणी पडत गेले.

युटाह्‌ स्टेटमधील हा समाज 'मॉर्मन ख्रिश्चन' या नावाने ओळखला जातो. पश्चिमी संस्कृतीत आलो आणि येथे अनेक मॉर्मन बघायला मिळाले, की जे सिगरेट–तबाखू काय, चहा कॉफी सुद्धा घेत नाहीत; मद्यप्राशन दूरच राहिले ! अमेरिकेतील ही लोक कोकाकोला घेत नाहीत, कारण त्यात कॅफेन असते ! 'दो या तीन बस्स् !' हे आधुनिक, प्रगत कुटुबाचे लक्षण अनेक प्रचार माध्यमातून ताबी प्रचारासाठी संपूर्ण बस रगवण्याच्या अतिरेकापर्यंत जाऊन ठसविण्याचा भारतात प्रयत्न होतो · अनेक मॉर्मन कुटुबात विविध कारणासाठी गेलो आणि अवाकच झालो. अनेक कुटुबात ७–८ मुले सरासरी आहेत. अशा दापत्याचे 'नरकाचे दु:ख सोसतानाची' चित्रे भारतात दाखविली जातात. येथे ही कुटुबे सुखाने नादताना बघायला मिळाली. एका अमॉर्मन मित्राची ओळख झाली. वय वर्ष २५. ७–८ वर्षे लग्नाला झालीत. 'मला मुले झालेली आवडत नाहीत. अजून ८–१० वर्षांनी आवडेल !' या मित्राचे हे उदाहरण मात्र कल्पनेतील अमेरिकन् समाजाचे प्रतिनिधित्व करत होते. अजून एका अमॉर्मन मित्राचा परिचय झाला. 'आमचे विवाहबधन निराळचा प्रकारचे आहे माझा स्वयपाक मी करतो, बायको स्वत:साठी अन्नपदार्थ करते !' भारतीय परंपरेत वाढलो, असल्याने हे चित्र डोळचापुढेच येईना ! या मॉर्मन समाजात मात्र धर्माचरण म्हणून 'मूल आणि चूल' करायला तयार झालेल्या गृहिणी बघायला मिळाल्या. वयात आलेली तरुण मॉर्मन मुले–मुली आपल्या पालकासमवेत राहतात हे आश्चर्यकारक वाटले मॉर्मन चर्चतर्फे सॉल्ट लेक सिटीच्या दक्षिणेला 'प्रोव्हो' येथे ब्रीगहॅम यग युनिव्हर्सिटी (Brigham Young University BYU) आहे. २६,००० विद्यार्थ्यांचे हे विद्यापीठ फुटबॉल ( अमेरिकन फुटबॉल ) बास्केटबॉल यासारख्या खेळात अमेरिकेत पहिल्या ५ क्रमाकामध्ये आहे १९८४ ऑलिंपिकमध्ये २४ सुवर्णपदके मिळविणारा पीटर व्हिड्मार या विद्यापीठाचा विद्यार्थी. शार्लीन वेल्स ही गतवर्षीची मिस अमेरिका याच विद्यापीठाची विद्यार्थिनी.

अशा विलक्षण निराळेपण असणाऱ्या मॉर्मन समाजाची सखोल माहिती घ्यायला हवी हे सतत जाणवत होते. पीएच. डी. अभ्यासक्रमातून फुरसत मिळत नव्हती एक क्वार्टर सपले आणि ख्रिसमस ब्रेकमध्ये सधी मिळाली. लोगन येथील अनेक प्राध्यापक, विविध वयोगटातील मॉर्मन–अमॉर्मन विद्यार्थी मित्र, मॉर्मन चर्चमधील बिशप, परदेशात मॉर्मन होऊन येथे आलेले विद्यार्थी मित्र, सॉल्ट लेक सिटी येथील मॉर्मन मध्यवर्ती केंद्रातील जनसपर्काधिकारी याच्या मुलाखती घेऊन झाल्या. अनेक पुस्तकाचे, माहिती पत्रकाचे वाचन केले आणि सूत्र उलगडत गेले. कोणा बाबा हरिदासच्या प्रभावामुळे हिंदू धर्माचा स्वीकार करून 'श्रीराम जय राम जयजयराम' हा जप मनोभावे करणारे येथे एक कुटुब आहे पण ५८ लाख मॉर्मन सभासदाना सत्प्रेरणेचा स्त्रोत ठरणारा हा विचारप्रवाह विलक्षण आहे दैवी चमत्कारावरील श्रद्धा या इतिहासात आहे, कोणा जोसेफ स्मिथ नावाच्या महात्म्याची तळमळ आहे, प्रचलित समाजाने केलेला छळवाद आहे. धर्मांतरासाठी प्रचार करणारे मिशनरीही या इतिहासात आहेत

## इतिहआस...

Religion that is to be practised everyday.–' Morman Christan ' असा हा मॉर्मन ख्रिश्चन धर्म समजवून घेण्यासाठी इतिहासाची पाने सुमारे १८० वर्षे मागे न्यायला हवीत. व्हर्मांट स्टेटमधील शेरॉन गावात 'जोसेफ'चा स्मिथ कुटुबात १३ डिसेंबर १८०५ रोजी जन्म झाला. १४–१५ वर्षाचा झाल्यावर अनेक महात्म्याप्रमाणे मूलभूत प्रश्न त्याला सतावू लागले: भारतीयाना 'चिंता करितो विश्वाची' म्हणणारे स्वामी विवेकानद यासारखे महात्मे ज्ञात आहेत. या जोसेफला प्रश्न पडला होता 'मी कोणती विचारसरणी स्वीकारू ? कॅथॉलिक की प्रोटेस्टट ? बाप्टिस्ट, मेथॉडिस्ट का ल्यूथरन ? Epistrl of James

वाचताना ' If any of you lack wisdom let him ask of God ' हे वाक्य अशा सभ्रमावस्थेत त्याच्या मनावर विशेष बिबले. परमेश्वराची ध्यानधारणा सुरू केली आणि १८२० च्या वसत ऋतूत परमेश्वराने त्याला दर्शन दिले. प्रखर प्रकाशझोतात दोन देवदूत त्याला दिसले. एका दूताने दुसऱ्या दूताकडे बोट दर्शवून म्हटले– ' This is my beloved Son, Hear Him ' आकाशातील परमेश्वर आणि त्याचा सुपुत्र ख्रिस्त असे त्याचे वर्णन नतर जोसेफने केले आहे. ' कोणताच पथ माझ्या कल्पनाचे खरे प्रतिनिधित्व करत नाही हे सर्व पथ भ्रष्टाचरण करत आहेत तू कोणत्याच पथाचा स्वीकार करू नकोस. ' या देवदूताने जोसेफला सागितले

या दर्शनानतर २॥–३ वर्षे कोणती दैवी घटना घडली नाही. सहानुभूत असणाऱ्या-समवेत जोसेफ चर्चा करीत असे. २१ सप्टेंबर १८२३ या दिवशी चिंतन करत असताना परमेश्वराने परत एक देवदूत पाठवला. यावेळच्या दर्शनातील आशय अधिक स्पष्ट होता या देवदूताने स्वत चे नाव ' मोरोनी ' सागितले व त्याने जोसेफलाही नावाने हाक मारली. मोरोनीने जोसेफला सागितले. ' देवलोकासमान सस्कृतीचे वर्णन सुवर्णपत्रावरील एका पुस्तकात केलेले आहे. या पुस्तकासमवेत युरिम व थुमिम हे दोन पवित्र दगड आहेत पुस्तकाच्या वाचनासाठी हे सीरस्टोन उपयुक्त आहेत.' प्रचलित बायबलमधील अनेक वचने त्याने उद्धृत केली. ' For behold the day cometh that shall burn as oven and all the proud yea and all that do wickedly shall burn as stubble. ' सवाद चालू असताना सुवर्णपत्राचे पुस्तक ठेवलेली जागा देवदूताने दाखवली. ते चित्र विलक्षण स्पष्ट होते. ' कुमारोह ' टेकडी (न्यूयॉर्कजवळ) चा परिसर जोसेफला सहज ओळखू आला. देवदूत अतर्धान पावला. अत्यत आतुरतेने दुसऱ्याच दिवशी जोसेफ कुमारोह टेकडीवर शोधासाठी गेला. तथापि त्या जागेवर खणायला प्रारभ करणार तोच विजेसमान झटका त्याला बसला. देवदूताने जोसेफला दर्शन दिले आणि सांगितले, ' मन अधिक शुद्ध व्हायला हवे, मोह दूर सारायला हवेत.' सुवर्णपत्रावरील मजकुराऐवजी १८ वर्षाच्या तरुण जोसेफच्या मनात नकळत सुवर्णाचा मोह झाला होता. आर्थिक विवचना सोसत सोसत, मन शुद्धी करून त्या टेकडीवर ३॥ वर्षात तो परत तीन वेळा गेला. पण अनुभवाची पुनरावृत्ती व पदरी निराशा येत होती. या दरम्यान इ स. १८२७ मध्ये त्याचा विवाह झाला २२ सप्टेंबर १८२७ या दिवशी त्याचे प्रयत्न सफल झाले, ते सुवर्णपत्रावरील पुस्तक त्याला हस्तगत झाले. पुस्तकातील मजकूर सुधारित इजिप्शियन भाषेत होता. काही तज्ज्ञाच्या मदतीने, मित्राच्या आर्थिक सहाय्यामुळे आणि युरिम–थुमिम या सीर स्टोनच्या साहाय्याने जोसेफने या पुस्तकाचे भाषातर पूर्ण केले.

## बुक ऑफ मॉर्मन

जोसेफने भाषातरीत केलेल्या पुस्तकाला ' Book of Morman ' असे म्हटले जाते. या पुस्तकात एका सस्कृतीचे, त्या सस्कृतीच्या चालीरीतीचे वर्णन आहे. कथानकाचा प्रारभ होतो इ. स ५०० च्या सुमारास. जेरुसलेम इस्त्रायल येथील एका समाजाला ' झेडेकिट्टा ' नावाच्या राजाच्या काळात, ' जेरुसलेम नष्ट पावणार ' असा ईश्वरी सदेश मिळाला. या समाजाने जेरुसलेम सोडले व पश्चिमेकडे समुद्रातून प्रवास करत करत अमेरिका खंडात या समाजाने वसाहत माडली. या सस्कृतीचे अवशेष ग्वत्तमाला, युकेतान या लॅटिन अमेरिकेच्या दोन देशात सापडतात. कापडविणकाम, चलनाकरिता नाण्यांचा वापर, जहाजबाधणी, स्थापत्यशास्त्र इ ठळक वैशिष्ठ्ये या सस्कृतीची सापडतात. इ स पहिल्या शतकात ख्रिस्ताचे क्रूसीफिकेशन झाल्यानतर त्याने या समाजात पुनरावतार घेतला.

या ठिकाणी हे कथानक ' पुराणातील कहाण्या वाती वळत वळत कीर्तनकाराकडून ऐकण्यासारखे ' आहे असे मला जाणवले मॉर्मनांची अर्थातच यावर विलक्षण श्रद्धा आहे बायबलमधील ' And other sheep ( John 10–16 ) I have, which are not of this fold, them also I must bring & they shall hear my voice and there shall be one fold lone shephard ' या वचनाचा आधार त्याला दिला जातो. ख्रिस्ताने या समाजाची पुनर्बांधणी केली. १२ शिष्य निवडले आणि मग ख्रिस्त अतर्धान पावला. मॉर्मन नावाच्या महात्म्याने या समाजातील धर्मविषयक कल्पना ग्रंथित केल्या. त्याचा मुलगा ' मोरोनी ' याने या कल्पना सुवर्णपत्रावर लिहून गुप्त जागी सुरक्षित नेऊन ठेवल्या हीच सुवर्णपत्रे जोसेफच्या हाती आली आणि त्यातून ' मॉर्मन ख्रिश्चन धर्माचा ' उदय झाला.

इस्त्राइलमधील समाजातून अमेरिकेतील रेड इडियन्सचा उदय, पुस्तकाच्या ईश्वरकृपेने ( Through the power of God and Translated by the gift of God) भाषातर, इ. अनेक मुद्दे वादग्रस्त होते. अद्यापही आहेत मॉर्मनाच्या या धर्मग्रथात भूगोल सदर्भात फारसे स्पष्टीकरण नाही.

प्रचलित विचारसरणीवर या मॉर्मन विचारानी जोरदार आघात केला. ' Christ re-establishes his church upon Earth ! ' कॅथॉलिक, प्रोटेस्टट, बाप्टीस्ट इ. सर्वच पथाकडून सलग १०–१५ वर्षे छळ, जोसेफ स्मिथची इ. स १८४४ मध्ये या प्रकरणात झालेली हत्या, मिझरी, इलीनॉअिस इ. राज्यातून स्थलातर करत करत बर्फाळ, निर्गम अशा उत्तर पश्चिमेकडील ' युटाह स्टेटच्या ' परिसरात स्थिरीकरण असा सर्व इ स. १८३० ते इ. स. १८४७ या काळाचा इतिहास आहे

या सर्व स्थित्यतरातून मॉर्मन ख्रिश्चनाची Church of Jezus, Christ of Later Day Saints (LDS) ची इ. स १८३० पासून इ स १८४४ पर्यंतच्या ५८ लाख सभासदापर्यंत झालेली वाढ या सर्व कथानकावर दृढ श्रद्धा ठेवून झालेली दिसते

## धर्म व जीवनविषयक कल्पना

मॉर्मन ख्रिश्चन ओल्ड व न्यू टेस्टामेंटवर विश्वास ठेवतात मॉर्मन पवित्र ग्रथावरही ते विश्वास ठेवतात जीवनविषयक कल्पना, धर्मरचना, आचारसहिता या मान्याची माडणी जोसेफ स्मिथने Book af Morman वाचनानतर केली. ( इ. स. १८३० ) वस्तूमात्र, चैतन्य, व बुद्धी अविनाशी आहेत. मानव पृथ्वीवरील जीवनापूर्वी अस्तित्वात

होतो. मृत्यूनंतरही तो त्या स्वत्वासहित जिवंत असतो. मृत्यूनंतर विशिष्ट काळाने त्याला मुक्ति मिळते. आत्मा व शरीर एकरूप पावतात व अमर्त्य अवस्था त्याला मिळते. तारणकर्त्याशी तो थोडक्यात एकरूप पावतो.

जीवनविषयक कल्पनेनंतर आचार सहितेची माडणी आढळते. 'कोणाला मॉर्मन म्हणायचे का ?' किंवा कोणाला Latter Day Saints ( LDS ) म्हणायचे ? यासबंधी ही माडणी विचार सागते.

(१) 13 articles of faith (१३ श्रद्धास्थाने) जोसेफने मांडली आहेत. आकाशातील परमेश्वर, त्याचा सुपुत्र व महात्मा ( Holy Ghost ) यावर श्रद्धा, पापांमुळे शिक्षा होते, विश्वाचा तारणकर्ता ख्रिस्त आहे, पापाचे प्रायश्चित्त पवित्र पाण्यात स्नान करून घेणे, चर्च व धर्मगुरूवर श्रद्धा, बायबल व मॉर्मन धर्मग्रथावर श्रद्धा, इतर धर्ममार्गावर श्रद्धा याचबरोबर इस्रायलमधील दहा टोळ्यासहित इस्रायलची पुनर्स्थापना, 'Zion' ( पवित्र स्थान )ची माडणी अमेरिका खडात होईल यावरही या धर्माचा प्रखर विश्वास आहे

(२) Word of wisdom – आहारविहार नियमनावर विशेष भर या धर्मात आढळतो चहा, कॉफी यासारखी उत्तेजक पेये, सिगरेट–तबाखू, मद्यप्राशन वर्ज्य करावे असे हे तत्त्वज्ञान सागते. विचारशुद्धी हवी हे केंद्रस्थानी मांडलेले आहे विवाहापूर्वी लैंगिक शुद्धता हवी यावरही यात भर दिलेला आहे.

(३) उत्पन्नाचा दशमाश भाग चर्चला द्यावा असे हा धर्म सागतो. (Tithing).

अशा रीतीने या सर्व आचरणाचे पालन करणारा, बुद्धिपूर्वक श्रद्धा ठेवणारा वयाच्या ८ व्या वर्षी मॉर्मन टेंपलमध्ये अधिकृत गुरूकडून मॉर्मन होतो. या सर्व आचरणाचे पालन करणारा सभासद चर्चच्या सर्व उपक्रमात सहभागी होतो. शब्दशः पालन करणाऱ्या पवित्र सभासदालाच मॉर्मन टेंपलमध्ये जाण्याचा परवाना मिळतो. दर वर्षी या परवान्याचे 'बिशप' नूतनीकरण करतो.

मॉर्मन टेंपलमध्ये जाण्याची अनुमती मिळालेल्या वधूवराचा विवाह सर्वात पवित्र समजला जातो. स्वर्गीय विवाह अशी त्याला सज्ञा दिली जाते. मृत्यूनंतरही हे दापत्य सहजीवन जगते. ऐहिक विवाह टेंपलमध्ये होत नाही स्वर्गीय विवाहापेक्षा हा विवाह कमी प्रतीचा मानला जातो.

प्रेसिडेंट ते बिशप व विविध उपाध्याय ( Priesthood ) अशी धर्माची माडणी या लोकात आढळते. प्रेसिडेंट हे पद सर्वोच्च मानले जाते पुष्कळच केंद्रीकरण त्यामुळे झाले आहे. उपाध्याय होण्याचा अधिकार केवळ पुरुषापुरता मर्यादित केलेला आहे, स्त्रीला हा अधिकार नाही.

कृष्णवर्णीय निग्रोबाबतचा दृष्टिकोण, वस्तुस्थिती या साऱ्याचा मुद्दाम अभ्यास केला. 'धारणात् धर्मं इत्याहुः। धर्मो धारयते प्रजा।' असे भारतात म्हटले जाते. प्रजेची धारणा, लोकाची परस्परसबधातील माडणी याचा विचार धर्मात व्हावा, पारमार्थिक व ऐहिक अशा दोन्ही आयुष्याचा विचार धर्मात व्हावा असा अर्थ मला या वचनात आढळतो.

## चांगले चित्र

इ. स १८३० च्या चर्च स्थापनेनंतर २ वर्षांनी Evening & Morning Star या साप्ताहिकाचे प्रकाशन सुरू झाले. इ स. १८३२ सालच्या पहिल्याच अंकात निग्रोचा स्वीकार करण्याचे या साप्ताहिकाने जाहीररीत्या माडले. त्या काळातील मिसोरी राज्यातील मॉर्मनाकडे निग्रो गुलाम म्हणून नव्हते. मॉर्मनाच्या छळाचे हे कारण दिले जाते; 'उपाध्यायपदाचा अधिकार वश रग यावर अवलबून नाही' असे जाहीर करायला मात्र तब्बल १५० वर्षे लागली व इ स. १९७८ मध्ये मॉर्मन चर्च प्रेसिडेंट किम्बॉलनी हे जाहीररीत्या माडले.

मॉर्मन लोकसख्येच्या अभ्यासातून काही महत्त्वाचे निष्कर्ष मिळतात. इ स. १९८४ मधील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे

एकूण मॉर्मन.. ... ५८ लाख (सपूर्ण जगात मिळून)

अमेरिका......... ३० लाख
मेक्सिको......... ३ लाख
दक्षिण अमेरिका... ६ लाख
अमेरिकेच्या लोकसख्येच्या १ २%
अमेरिकेत... युटाहू स्टेटमध्ये ६७% मॉर्मन
(भारतात ३९२ मॉर्मन आहेत !)

शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक परिणामही, साख्यिक अभ्यासातून सापडतात. word of wisdom चे बहुसख्य मॉर्मन चागल्या रीतीने पालन करतात. निर्व्यसनी वृत्तीमुळे त्यामुळे आरोग्यविषयक चागले परिणाम मला बघायला मिळाले हृदय सदर्भातील विविध आजारात युटाहू स्टेटचा ४७ वा क्रमाक आहे. (मॉर्मन लोकसख्या या स्टेटमध्ये सुमारे ७० % आहे.) कॅन्सरचा आजार दर १ लाख लोकसख्येत केवळ ९३ लोकाना होतो, हे प्रमाण अमेरिकेचा विचार करता खूप कमी आहे, अमेरिकेत त्यामुळे कॅन्सर आजाराबाबत युटाहूचा ४९ वा क्रमाक आहे. मृत्यू प्रमाणाबाबत युटाहूचा ४८ वा क्रमाक आहे ५–८ मुलाचे सरासरी कुटुब असल्याने, १७ वर्षाखालील लोकसख्येचा विचार करता युटाहू, अमेरिकेत प्रथम क्रमाकावर आहे गर्भपाताबाबत युटाहू स्टेटचा अमेरिकेत शेवटचा क्रमाक आहे. जन्माचे प्रमाण युटाहू स्टेटमध्ये २७.३ ( दर हजारी ) आहे. अमेरिकेत अर्थातच युटाहू स्टेटचा त्याबाततीत प्रथम क्रमाक आहे.

लौकिक शिक्षणाच्या या धर्मात विशेष आग्रह धरला जातो. माध्यमिक शिक्षणात या राज्याचा अमेरिकेत प्रथम क्रमाक आहे, तर महाविद्यालयीन शिक्षणात द्वितीय क्रमाक आहे. जीवनाकडे बघण्याचा या लोकाचा पुष्कळच आशावादी दृष्टिकोन आहे. पश्चिमी सस्कृती व क्षणभगुर वृत्ती, उपभोगवृत्ती यावर भारतात खूप ऐकायला मिळते. पश्चिमी सस्कृतीचे आक्रमण भारतात अनेक ठिकाणी चर्चिले जाते, येथे मात्र अशा रीतीने शिक्षण, आरोग्य, कुटुबप्रधान समाज याचा विचार करता पुष्कळच चागले चित्र आहे.

'स्त्री मुक्ती आदोलन' हा विचार अनेक देशात माडला जातो. मॉर्मन सस्कृतीमध्ये त्याही बाबतीत निराळा दृष्टिकोन, क्वचित एकांगी वाटणारा, बघायला मिळाला. इ. स. १८९० पर्यंत युटाहू स्टेटमध्ये बहुपत्नीत्वाची चाल प्रचलित होती व त्याला धार्मिक मान्यतासुद्धा होती इ स. १८९० मध्ये मॉर्मन चर्चने त्यात बदल केला. अमेरिकेच्या गणराज्यात त्यानतरच युटाहू स्टेटचा समावेश झाला. उपाध्यक्षपदाचा अधिकार स्त्रीला नाही हे यापूर्वी लिहिले आहे. कुटुबामध्ये स्त्रीचे क्षेत्र 'कुटुब व्यवस्थापन चूल व मूल' असे या धर्मात आग्रहाने माडले जाते. इ. स.

१८४४ मध्ये एमा स्मिथने ( जोसेफची पत्नी ) Relief Society ची स्थापना केली. चर्च रचनेत या Relief Society ला महत्त्वाचे स्थान आहे. विविध कल्याणदायी कार्यक्रम या सोसायटीमार्फत आखले जातात. महिन्यातील कोणत्याही एका सोयीस्कर दिवशी मॉर्मन ख्रिश्चन कडक उपवास करतात. या उपवासामुळे वाचलेला अन्नावरील खर्च, ते चर्चला दान करतात. ही रक्कम गरजू लोकाना वाटली जाते. गतवर्षी इथिओपियात प्रचंड दुष्काळ पडला होता. मॉर्मन चर्चतर्फे या गरजू लोकाना ४॥ लाख डॉलर्स मदत पुरवली गेली. Relief Society ने यात महत्त्वाची कामगिरी बजावली.

युटाहू व आयडाहो या दोन अमेरिकन राज्यात मॉर्मन बहुसंख्येने आहेत. या दोन्ही राज्याच्या राजकारणावर त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. युटाहू स्टेटचे आजपर्यंतचे अनेक गव्हर्नर ( आपल्याकडील मुख्यमंत्री समान पद ) मॉर्मन होते. ब्रीगहॅमयग युटाहू स्टेटचा गव्हर्नर व चर्चचा प्रेसिडेंट अशी दोन्ही पदे १८५० ते १८७० अशी वीस वर्षे भूषवित होता Conservative विचारसरणीचा प्रभाव असल्याने येथे रिपब्लिकन पक्षाचे प्राबल्य आहे. युटाहू स्टेटचे लेजिस्लेटिव्ह व सिनेट मेंबर्स प्रामुख्याने LDS म्हणजेच मॉर्मन असतात युटाहू स्टेटमध्ये केंद्र सरकारने ( Federal Government) क्षेपणास्त्र साठा करणारे केंद्र काढायचे ठरवले. त्या काळात चर्चच्या प्रेसिडेंटने धर्मकारणातून राजकारणाबाबत विचार माडले. मॉर्मन लोकाचे येथे प्राबल्य आहे. भविष्यकाळात महायुद्ध झालेच तर येथे क्षेपणास्त्राचा साठा असल्याने शत्रूकडून हल्ला होईल व मॉर्मन समाजाचे हे केंद्र उध्वस्त होईल असा हा बचावात्मक पवित्रा होता अमेरिकन सरकारला माघार घ्यायला लागली.

धर्मप्रचार हे महत्त्वाचे अग चर्चच्या रचनेत आढळते. प्रेसिडेंट, बिशप हे सर्व निर्वेतन काम करतात. हिंदूधर्मरचनेत सन्यास, त्याग याला विशेष महत्त्व आहे. सर्वसगपरित्याग करून ईशसेवा, समाजसेवा करणारे अनेक योगी, महात्मे भारतात बघायला मिळतात. 'मॉर्मन धर्ममार्तंड मात्र विवाहीत असतात. जीवनाच्या विविध कार्यक्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत असतात व त्याबरोबरच धर्म-कार्य करतात सध्याचे मॉर्मनचर्च प्रेसिडेंट श्री. बेन्सन, आयसेनहॉवरच्या काळात Secretary of Agriculture म्हणून काम करत होते. विविध प्रातात, परदेशात, मिशनरी काम करायला जाणारे धर्मप्रचारक मात्र पूर्ण वेळ तेच काम करतात. स्वखर्चाने साधारण वय वर्षे १८ ते २० असा दोन वर्षाचा काळ, धर्मप्रचाराला देणारे असंख्य तरुण बघायला मिळतात जपानमध्ये जाऊन धर्मप्रचार करणाऱ्या एका तरुणाचे अनुभव कथन ऐकायला रविवारी एका चर्चमध्ये गेलो होतो. २ वर्षाच्या जपानमधील वास्तव्यासाठी व प्रवासखर्चाकरिता साधारण ५००० डॉलर्सची आवश्यकता होती. स्वत.ची कार विकून हा तरुण जपानमध्ये जायला तयार झाला. मित्र व नातेवाईकानी त्याच्याकरिता काही रक्कम उभी केली. लोकाकडून येणारा तिरस्कार स्वीकारून, जपानमध्ये कारऐवजी, सायकलवरून प्रवास करत त्याने दोन वर्षे धर्मप्रचाराचे कार्य केले. तारुण्यातील उमेदीची दोन वर्षे, पदवी,धन यापैकी कोणत्याच लौकिक प्राप्तीची अपेक्षा न ठेवता व लोकाकडून हेटाळणी स्वीकारत धर्मकार्य करणाऱ्या अशा धर्मप्रचारकाची साखळी येथे बघायला मिळते. सुस्थिर कुटुबव्यवस्था, निर्व्यसनेचा आग्रह याबरोबर निस्वार्थी धर्मप्रचारकाच्या परपरेमुळे या धर्माबाबत माझ्या मनात विशेष आकर्षण निर्माण झाले आहे.

३० हून अधिक देशात मॉर्मन धर्माच्या प्रचाराचे काम चालते मॉर्मन धर्मग्रथाचे ९० भाषामध्ये भाषातर झालेले आहे दक्षिण अमेरिका, मध्यपूर्व आशिया, पूर्व आशिया, युरोप या खडातील विविध देशात हे कार्य चालू आहे. मॉर्मन टेंपल्स सपत्तीने समृद्ध आहेत. वॉशिंग्टन येथील मॉर्मन टेंपल सपूर्ण सगमरवरी आहे या मॉर्मन चर्चतर्फे सॉल्टलेकसिटीजवळील प्रोव्हो येथे Brigham young University चालविली जाते. या विद्यापिठात २६०६० विद्यार्थी आहेत, या सख्येवरून चर्चकडील सपत्तीची कल्पना यावी ! प्रत्येक मॉर्मन आपल्या उत्पन्नाच्या १०% भाग चर्चला देतो वॉशिंग्टन डी. सी. येथील सपूर्ण सगमरवरी मदिर हे एश्वर्याचे अजून एक उदाहरण !

तर असा मॉर्मन समाज आहे ! काही दिवसांपूर्वी लोगनमध्ये अल्पसख्य असणाऱ्या कॅथॉलिक ख्रिश्चन लोकाच्या गटाशी, हिंदू धर्माबाबत बोलायला जाण्याची सधी मिळाली होती. धर्मप्रचाराच्या उत्साहामुळे मॉर्मन लोकामध्ये आलेल्या अभिनिवेशाबाबत या लोकाकडून ऐकायला मिळाले. ख्रिसमस सणाला परस्पराना भेटवस्तू देण्याची येथे प्रथा आहे. या कॅथॉलिक तरुणीला तिच्या मॉर्मन मित्राने Book of Morman भेट दिले ! तथापि मॉर्मनाचे सद्वर्तन, कुटुबव्यवस्था याबाबत मात्र या गटाचे दुमत नव्हते व्यक्तिगतदृष्ट्या, प्रलोभनापासून पुष्कळ दूर असणाऱ्या, mad mad America तील या मॉर्मन समाजात आल्याचे मला समाधान आहे. जुगार, वेश्या इ साठी प्रसिद्ध असणारे लास वेगास येथून केवळ ४०० मैलावर आहे Las Vegas never sleeps ! असे या शहराबाबत म्हटले जाते. AIDS ची भीती वाढत असलेला अमेरिकन समाज सर्वत्र आहे. दर दीड तासाला १७ ते २० वयोगटातील एकजण आत्महत्या करणाऱ्या तरुण–तरुणीचा हा अमेरिकन समाज आहे. अतराळ, अणु, सगणक, जीवशास्त्र इ. शास्त्रात अत्युच्च शिखर गाठलेला हा अमेरिकन समाज आहे आणि या समाजात विविध पटणाऱ्या, न पटणाऱ्या वैशिष्ट्यासहित हा मॉर्मन समाज आहे निर्व्यसनतेच आग्रह धरणारा, विलक्षण conservative सांख्यिकदृष्ट्या पसरत जाणारा, वैशिष्ट्यामुळे चटकन ओळखू येणारा !

पुस्तके

# रॉय किणीकर आणि त्यांची 'उत्तररात्र'

स. ह. देशपांडे

एकोणिसशे एकूणपन्नास साली एम्. ए. करण्यासाठी मी पुण्याहून मुंबईस गेलो तेव्हा तिथं मला नोकरी हवी होती. शिक्षकाची किंवा फारतर एखाद्या वृत्तपत्रातली असावी एवढीच माझी नोकरीविषयक महत्त्वाकांक्षा होती. चित्रविचित्र माणसांशी ओळखीपाळखी असणारा मन्या देशपांडे नावाचा माझा एक मित्र पुण्याला होता. त्याची किणीकरांशी ओळख होती आणि किणीकरांबरोबर त्याला मी एकदोनदा पाहिलेलं होतं. मन्या मला म्हणाला की किणीकर मुंबईला असतात, ते तुला मदत करतील, मी चिठ्ठी देतो. मन्याची चिठ्ठी घेऊन मी दलालांच्या स्टुडिओत किणीकरांना भेटलो. किणीकरांनी नेमकं काही सांगितलं नाही पण 'येत जा' म्हणाले. विद्यापीठातले वर्ग संपल्यावर मी किणीकरांकडे जात असे. पुढचे आठ–दहा महिने तरी मी त्यांच्या अवतीभवती असे.

किणीकरांनी कितीतरी दिवस मला काम असं काही सांगितलंच नाही. पण मला पैसे मिळतील असं काही काम हवं हे त्यांना माहीत होतं. लेखनाची हौस होती हेही माहीत होतं. बऱ्याच दिवसांनी म्हणाले, रेडिओसाठी एक श्रुतिका लिहून द्या. विषय बाजीप्रभू. रेडिओ, त्याचे कार्यक्रम, वर्तमानपत्रातून होणारी प्रसिद्धी यांविषयी मला त्या काळी काही माहिती नव्हती, त्यामुळं त्या श्रुतिकेचं काय झालं हे मला बरेच दिवस कळलं नाही. मी थोरल्या भावाकडं राहात होतो. एक दिवस संध्याकाळी घरी आल्यावर सहज रेडिओ लावला तर 'आता माझे प्राण मी सुखानं सोडतो' असे (माझ्या) बाजीप्रभूचे शेवटचे शब्द मला ऐकायला मिळाले आणि श्रुतिका संपली. श्रुतिका रेडिओवर लागली याचा आनंद व ऐकायला मिळाली नाही किंवा मित्र–नातेवाइकांना सांगता आलं नाही याचं दुःख अशा परस्परविरोधी भावनांनी मला पुरतं बावळट करून टाकलं. श्रुतिकेच्या प्रसारणाची वेळ तुम्ही मला का सांगितली नाहीत असं मी किणीकरांना विचारलं तेव्हा मृदु हसून ते म्हणाले, 'अरे! असं झालं होय? मग आणखी लिहा की.' दुसरीही लिहून दिली. तीही प्रसारित झाली पण तिचे शेवटचे शब्दही ऐकायला मिळाले नाहीत. किणीकरांचा अंदाज मला हळूहळू यायला लागला होता म्हणून या वेळी मी त्यांना काहीच विचारलं नाही.

यांपैकी एक श्रुतिकेचे रुपये पंधरा मला रेडिओकडून मिळाले, एकीचे मिळाले नाहीत.

'दीपावली'च्या कामात किणीकरांनी मला गुंतवून घ्यावं अशी माझी अपेक्षा, पण तसं काही घडेना तुमची गरज नाही, असंही ते सांगेनात. शेवटी मी शाळेतली एक सकाळची नोकरी मिळवली. संध्याकाळी, कधी सुट्टीच्या दिवशी, किणीकरांकडं जाणं मात्र चालूच ठेवलं. पण काही दिवसांनी कंटाळलो. उगाच आपलं दलालांच्या स्टुडिओत जाऊन बसायचं, एखादी खुर्ची अडवायची, हा कोण श्रीखंडचा अशा नजरेनं इतरांनी माझ्याकडं पाहायच–असे दिवस चालले होते. शेवटी किणीकरांनी दोनचार पुस्तकं माझ्या पुढ्यात टाकली आणि म्हणाले, 'यांचे रिव्ह्यू करा' एक दिवाकर कृष्णांच्या लघुकथांचा संग्रह होता. दिवाकर कृष्णांविषयी मी संपूर्ण अज्ञानात होतो. त्यांच्या कथा मला दुःखानं निष्कारण लडबडलेल्या वाटल्या. आणि 'लेखकाला आपली पात्रं मारून टाकण्याची विकृत हौस आहे', असं काहीतरी लिहिलं. किणीकरांनी माझ्या लेखावरून नजर टाकून मृदु हास्य केलं, घाईतच काही इकडचं तिकडं केलं, दिवाकर कृष्णांच्या गौरवाची एकदोन वाक्यं लिहिली. ही उडाणटप्पू वाक्यं आणि माझी मूळ टीका यांचा नसा काही संबंध नव्हता. पण किणीकरांना त्याचं काय? असो. आनंदाची गोष्ट इतकीच की दीपावलीत माझी चार अक्षरं झळकली.

पण हाही आनंद निर्भेळ नव्हता. माझा एक लेख तुम्ही दीपावलीत छापाल का, असं मी किणीकरांना या अगोदरच विचारलं होतं. 'होय? मग लिहा की' असं ते म्हणाले होते. किणीकरांचं एक चांगलं असे. ते नाही कधी म्हणायचे नाहीत. माणसाला निदान तात्काळ निराश करणं त्यांना मंजूर नसे. लेख मी कसोशीनं लिहून दिला. पण त्यांनी तो छापलाच नाही आणि छापणार नाही असंही सांगितलं नाही. जे अभिप्राय लिहिले त्यांचंही मानधन (अर्थातच) मला मिळालं नाही.

किणीकरांच्या राहण्याच्या जागेत मी कधीकधी जात असे. तिथं दलालांचा चित्रसंग्रह होता आणि तिथंच ते पोर्ट्रेट्स काढीत. या काळातला लाभ इतकाच की दलालांची खूप चित्रं पाहिली आणि चित्रं काढण्याची त्यांची प्रक्रियाही डोळे भरून निरखली. या प्रसिद्ध चित्रकाराची बुटकीशी मूर्ती आणि त्याचा उंच व किरटा आवाज यांचीही गंमत वाटे.

किणीकरांचं बोलणं हळुवार आणि प्रेमळ असे. ते लहान मुलासारखे आणि कधीकधी खट्याळपणे हसत. यामुळंच मी त्यांना चिकटून राहिलो असं वाटतं. शिवाय, पैसे मिळोत न मिळोत, आपल्याला किणीकरांच्या कृपेनं चार ओळी लिहून प्रसिद्ध करायला मिळाल्या तरी ठीक अशी आशा होतीच.

## प्रतिभेची जाणीव

एकदा मलाच म्हणाले, 'देशपांडे, कित्येक दिवसांत घरचं सुग्रास अन्न जेवायला मिळालं नाही. मला जेवायला बोलावता का?' मी राहात होतो भावाकडं. भावाची व किणीकरांची काही ओळखदेखील नव्हती. पण दोघं एकमेकांना माहीत होते. भावाला मी सांगितलं

आणि त्यानं किणीकरांना अगत्यानं जेवायला बोलावलं. किणीकर मनापासून जेवले आणि संतुष्ट झाले.


एकदा गिरगावात बसस्टॉपवर भेटले आणि म्हणाले, 'देशपांडे सव्वा रुपया उसना देता का?' मी दिला. ही त्यांची-माझी त्या दिवसांतली शेवटची भेट असावी. पुढं मी माहीमला, खारला असा राहायला गेलो. क्वचित कुठंतरी गाठ पडे. 'देशपांडे, हल्ली काय करता?' असं अगत्यानं विचारीत. कॉलेजात ट्यूटर, लेक्चरर असा काही आहे असं सांगताच आनंदानं 'वा!' म्हणत व प्रेमळ हास्य करीत. एकदा हिंदू कॉलनीत भेटले तेव्हा साईबाबांवरील सिनेमाचं त्यांचं काम चाललं होतं. त्यात खूप पैसा मिळणार असं त्यांनी सांगितलं. पण पुढं तो सिनेमा पडला हे ऐकून किणीकरांच्याविषयी मला वाईट वाटलं. पुढे फारशा भेटी झाल्याच नाहीत. माझ्या आयुष्यातलं हे छोटंसं किणीकर-पर्व मग जवळ-जवळ विस्मृतीत जमा झालं.

एखाद्या वेळी आठवण झाली तर एक गमतीचा विचार मनात येई. किणीकरांच्या सहवासातल्या वर्षभराचा ताळेबंद: (कमीत कमी) सव्वा रुपया किणीकरांकडून येणं आणि मी त्यांच्याकडे गेलो होतो अर्थार्जनासाठी!

या सर्व अवधीत लेखक म्हणून किणीकर मला माहीतच नव्हते. माझ्या लेखी फक्त दीपावलीचे संपादक एवढंच त्यांचं साहित्यिक कर्तृत्व होतं. पण आपल्या जबर लेखनशक्तीचा पुरावा त्यांनी एकदा मला दिला होता. 'देशपांडे माझ्याबरोबर जरा रेडिओत येता का?' असं विचारून ते मला घेऊन गेले. रेडिओ स्टेशन मी पाहिलेलं नसल्यामुळे मलाही कुतूहल होतंच. तिथं गेल्यावर एका हवाबंद खोलीत टेबलासमोर त्यांनी मला बसवलं आणि म्हणाले, 'तावडतोब एक कार्यक्रम प्रसारित करायचा आहे. हाताशी काही नाही. मी सांगतो ते झटझट लिहून घ्या. झाल्यावर लगेच ते मला माइकवर वाचायचं आहे.'

ती होती एक कथा. अगदी अनोखी. एक विरहतप्त घोड्याची. घोडा आणि त्याच्यापासून हिरावून नेलेली घोडी. तीत एका बाजूला तबेला, खोगीर, जीन, दाणा, खरारा असं घोड्याच्या परिसरातलं सूक्ष्म आणि थक्क करणारं वर्णन होतं की किणीकरांनी तबेल्यात घोड्यांची देखभाल करण्याचंच काम जन्मभर केलं असावं असं वाटावं. दुसऱ्या बाजूला घोड्याचं जीव तोडणारं मूक दुःख. घोड्यावर मानवी भावनांचा आरोप तर करायचा पण घोडा तो घोडाच शेवटपर्यंत वाटला पाहिजे हे कसब अजब होतं. शिवाय ते जे सरळ सांगत गेले ते न थांबता शेवटपर्यंत. लिहिताना मीच आतल्या आत गलबलून गेलो होतो. शेवटचं वाक्य लिहून झाल्यावर मी वर मान करून किणीकरांकडं आश्चर्यानं आणि आदरानं पाहिलं. ते गोडसे हसले आणि कथेवर फक्त एकदा नजर फिरवून आणि कसलीही खाडाखोड न करता कार्यक्रम 'प्रसारित' करायला घाईघाईनं निघून गेले. त्यांच्या प्रतिभेचं हे एकमेव स्फुरण माझ्या अनुभवाला आलं होतं. पण लक्षात रहावं असं होतं. पुढं मोकाशींची 'माजोर' ही एका मत्त रेड्यावरची ललितलेखवजा गोष्ट मी वाचली तेव्हा मला किणीकरांची आठवण झाली.

काही वर्षांपूर्वी किणीकर दिवंगत झाल्याचं कळलं. नंतर त्यांच्या



आजमितीस
(आणि निरंतर)
आपणाकडून
किणीकरांना देणं:
बरंच काही

□

कवितांचं पुस्तक प्रसिद्ध झाल्याचं वाचलं आणि या पुस्तकावरचे अभिप्राय वाचताना लेखकांनी उद्धृत केलेल्या सुट्या-सुट्याच ओळी मला इतक्या चटका लावून गेल्या की, 'अरेरे! हे किणीकर आपल्याला कधीच माहीत नव्हते' अशी चुटपुट मनाला लागली. केव्हातरी हे पुस्तक हस्तगत करायला पाहिजे असा विचार मनात यायला लागला.

## उत्तम काव्याची प्रचीती

आणि अचानक पुण्याला एका मित्राच्या घरी किणीकर नावाचे एक तरुण गृहस्थ भेटले. अमक्या-तमक्याचे तुम्ही कोण? असा गांवढळ प्रश्न खरं म्हणजे कुणाला विचारू नये. पण किणीकरांची आठवण मला स्वस्थ बसू देईना म्हणून मी तो विचारायचं धाडस केलंच आणि सुदैवानं ते रॉय किणीकरांचे चिरंजीवच निघाले. पुस्तकही तिथल्या तिथंच मित्राच्या घरी मिळालं.

□

किणीकरांच्या संसाराची परवड होती हे प्रस्तावनेवरून लक्षात येतंच. अशा स्थितीतही आपल्या वडिलांचा साहित्यिक मोठेपणा लक्षात घेऊन त्यांचं कृतज्ञता बुद्धीनं हे देखणं स्मारक त्यांच्या सुपुत्रानं तयार केलं आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पुस्तक मोठ्या कौतुकानं सजवलेलं आहे. सुभाष अवचटांनी काढलेल्या किणीकरांच्या अनेक रेखाचित्रांमधून मी पाहिलेले किणीकर मात्र मला शोधून काढावे लागले. याचं कारण असं असणार की मी किणीकरांना पाहिलं तेव्हा ते चाळिशीच्या आतबाहेर होते आणि अवचटांनी त्यांना अगदी अलीकडं अलीकडं पाहिलेलं आहे

पण किणीकर चित्रांत नीट भेटले नाहीत तरी कवितांतून भेटले. एका अर्थानं पुन्हा आणि एका अर्थानं पहिल्यांदाच.

या संग्रहाचं नाव 'उत्तररात्र' असं असलं तरी त्यात 'रात्र' आणि 'उत्तररात्र' असे दोन भाग आहेत. हे किणीकरांनी स्वतः

---

रॉय किणीकर, **उत्तररात्र**
संपादक: अनिल किणीकर
श्रीशब्द प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती: १९८५
मूल्य: रु. २५.००

केलेले की संपादकांनी हे कळत नाही. कविता लेखनाचा काळही कुठ दिलेला नाही. अनेक कवितांवरून पुन्हा एकदा हात फिरवायला किणीकरांना जमल तरी नाही किंवा त्याना तितकी आस्थाही कदाचित वाटली नसावी. पण अशा शिथिल रचनांवर संपादकांनी संस्कार करायला हरकत नव्हती. कारण ते काम अगदी सोप होत. 'रात्र' मधली एक कविता उत्तररात्रमध्ये पुनरावृत्त झाली आहे. 'उत्तररात्र' मध्येच एक कविता पुनरावृत्त झाली आहे. हे टाळता आल असतं.

संग्रहाचे दोन भाग असले तरी प्रत्येक भाग स्वतंत्र आणि सलग आहे असं नाही. एखादा विषय घेऊन तो विकसित केल्याचं दिसत नाही एखादा विषय साकार होतो आहे अस वाटत असतानाच दुसरा सुरू होतो खर म्हणजे जाणीव होते ती वेगवेगळ्या तुकड्याची. या सर्व 'कणिका'च म्हटल्या पाहिजेत. शिवाय अनेक कणिका स्पष्टार्थबोधक नाहीत हे वेगळच किणीकरांच स्वत.चं अव्यवस्थित लेखन आणि त्याच (केल असेल तर) अव्यवस्थित संपादन या दोन्ही गोष्टी मात्र किणीकरांच्या स्वभावाशी गमतीदारपणे सुसंगत आहेत

इतकं असूनही किणीकर उत्तम काव्याची प्रचीती देतात हे मात्र नक्की.

किणीकरांच या जगण्याविषयीच भावनिक आकलन त्यांच्या तुकड्या-तुकड्याच्या कवितामधून संगतवार संकलित करून पुढीलप्रमाणे सांगता येईल. हे जग नश्वर आहे हा किणीकरांच्या दृष्टिकोनाचा मूलाधार आहे.

> या पाणवठ्यावर आले किती घट गेले
> किती डुबडुबले अन् बुडले वाहुनि गेले
> किती पडुन राहिले तसेच घाटावरती
> किति येतिल अजुनी नाही त्याना गणती

किंवा वेगळ्या शब्दात—

> या इथून गेले यात्रिक अपरंपार
> पाठीवर ओझे—छोटासा संसार
> किति शिणले, दमले, म्हणता माझे माझे
> वाकले मोडले गेले टाकुनि ओझे

वेगवेगळ्या कणिकामधून वेगवेगळ्या प्रतिमानी हीच भावना अधिक सांद्र होत जाते.

या नश्वरतेशी सहचर म्हणून मृत्यूचे आणि और्ध्वदेहिकाच्या नकोशा वाटणाऱ्या तपशिलाचे उल्लेख किणीकरांच्या कवितामधून पुन पुन्हा येतात. तिरडी, सुतळी, खांदा देणे, घट फोडणे, राख, अस्थी, थडगे इत्यादी. जग नुसतं नश्वर नाही, ते विद्रूपतेकडे झुकणार आहे असच जणू काही किणीकरांना सुचवायच आहे.

या नश्वरतेत आपलं किंवा आपल्या प्रिय व्यक्तीच नाव चिरंतन रहावं अशी धडपड माणसं करीत असतात ती किती केविलवाणी आणि हास्यास्पद ठरते पहा.

> कोरून शिळेवर जन्ममृत्युची वार्ता
> जा ठेवा पणती त्या जागेवर आता
> वाचील कुणितरी होताना उत्खनन
> म्हणतील कोण हा, कशास याचे स्मरण

ही क्षणभंगुरता केवळ भौतिक विश्वाचीच नाही तर माणसानं घडविलेल्या नैतिक विश्वाचीही आहे तेही असच अस्थिर आणि चंचल आहे.

> ती माया, ममता, कृतज्ञता अन् प्रीती,
> बलिदान, समर्पण, श्रद्धा, निष्ठा, भक्ती
> चल विसर शब्द ते.:....

किंवा

> ही प्रीती नाही दगडावरची रेघ

इतकंच नव्हे तर जग ढोंगी आणि फसवं आहे.

> हा दिवस घेतो संताचा सन्मान
> अंधार उतरता होईल हा सैतान

किंवा

> नाचवी पताका काढुनि यात्रा-दिंड
> माउली होतसे यात्री रात्री राड

एवढच काय,

> स्वर्गास असे नरकाचे आतुन दार

इथले विरोधही जीवघेणे आहेत,

> वाटा हो साखर घरात आला एक
> वाढा हो भाकर दारी आला एक

एकूण जग हे निरर्थ आहे, किंवा अनाकलनीय तरी आहे.

> पाहिले परंतु ओळख पटली नाही
> ऐकले परंतु अर्थ न कळला काही

म्हणून इथलं अस्तित्व एक वेदना आहे.

> हे जीवन म्हणजे दीर्घ स्वप्न-सभोग
> हे जीवन म्हणजे मृगतृष्णेची आग

परिणामी कवी आपला विश्वासच हरवून बसला आहे. विश्वास एकाच गोष्टीवर उरला आहे. ती म्हणजे या सगळ्याचा विसर पाडणारी मदिरा. '... मद्य नव्हे हे, मंतरलेले पाणी.' ते पिऊन,

> मृद्गंध पाघरून घेऊ चंद्र उशाला.

खोल, काव्यात्म चिंतनाची ताकद किणीकरांमध्ये होती. याचा प्रत्यय मला आता येतो आहे,

## उमर खय्यामची आठवण

अंतरंगातले किणीकर मला माहीत नव्हते हे खर; पण त्यांनी मला चाहूल दिली होती हेही खर. आता आठवतं—त्यानी एक पुस्तक मला वाचायला दिलं होतं. म्हणाले, देशपांडे हे एका होबोचं आत्मचरित्र आहे. मी विचारले 'होबो' म्हणजे काय ? किणीकर म्हणाले, भणंग भटक्या माणसाला इंग्रजीत होबो म्हणतात

ते पुस्तक मी वाचायला घेतल आता नाव विसरलो, एका भटक्याचच ते आत्मचरित्र होतं पण हा भटक्या अशिक्षित असूनही प्रतिभाशाली कवी होता. त्या पुस्तकातल्या दोन गोष्टी मला आठवतात. एकदा प्रवासात आगगाडीच्या चाकाखाली याचा पाय गुडघ्यापर्यंत साफ तुटला होता. त्यावेळच्या स्थितीचं त्यानं वर्णन केल होत. 'काही काळ मला वेदनाच जाणवली नाही. गाडी निघून गेल्यावर मोकळ्या जागेत पडलेल्या माझ्याच तुटलेल्या अवयवाकडं त्रयस्थासारखा पहात मी बसून होतो. आजूबाजूचे लोक माझ्याकडे थक्क होऊन बघत होते आणि काय करावं हे मला सुचत नव्हत'

अटलांटिकवरून मेंढ्याचे कळप घेऊन जाणाऱ्या जहाजावर याला

एकदा काम मिळाल होत. या बोटीवर रात्रंदिवस केवळ मेंढयाचा बे–बें असा आवाज यायचा त्यान वेड लागायची पाळी यायची. जग म्हणजे केवळ मेंढयाच विश्वव्यापी बेबाटण. आणि अस आठव-डेच्या आठवडे. कवीला खर तर विश्वाच्या पोकळीतला रम्य अनाहृत नाद ऐकू यावा, त्याऐवजी हे बेसूर, कदाचित् कत्तलखान्याच्या मार्गावरच केविलवाण आणि भेसूर सगीत त्याच्या मानगुटीवर येऊन बसाव हा केवढा दैवदुर्विलास ! ह्या मन स्थितीवर लेखकान केलेली कविता या पुस्तकात एका पानावर समग्र दिली होती

ज्या अर्थी किणीकरानी हे पुस्तक मला मुद्दाम वाचायला सागितल होत त्याअर्थी त्याना ते प्रिय असलं पाहिजे आणि ते प्रिय असण्याचं कारण त्या अनिकेत प्रतिभावताशी ह्या घर असून नसलेल्या प्रतिभावताच काही आतरिक नातं जुळलेल असल पाहिजे. किणीकरानाही जीवनात काही सुस्वर ऐकू आल नाही हे खरच नव्हे का ?

जगाच्या अशाश्वततेतून येणार औदासीन्य आणि मद्यप्रीती हे त्याच्या काव्याचे घटक उमर खय्यामची आठवण करून देणारे आहेत. कवितेचा मूळभाव आणि छद या दोहोचही लागतं खय्यामशी आहे. काही प्रतिमाही त्याच्या प्रतिमाची पुसट आठवण करून देणाऱ्या आहेत. मात्र हे केवळ साम्य आहे. किणीकराची भावना स्वतत्र आणि सच्ची आहे तिच्यातली आर्तता अभिजात आहे. त्याचे शब्द सरळ, साधे पण समर्पकतेन एकदम मनाला भिडणारे आणि व्यापून व गुगवून टाकणारे आहेत. कविता सयमक असूनही तिचा सहज ओघ बाधित झालेला नाही, उलट सयमकतेमुळ तिला सागीतिक लय प्राप्त झालेली आहे.

किणीकर राख पेरीत गेले असले तरी मुळात त्याच्यामध्ये संयत आविष्कार करणारा एक रोमँटिक कवी आहे अस स्पष्टपणान जाणवत.

> वाकली जरा पिळताना ओला पदर
> आतून जरासे अर्धे हलले दार

किंवा

> पदरातुन फिरली एक तान्हुली मूठ

उजाड ससाराच विदारक चित्र ते कस काढतात पाहा.

> ना उबरठा ना भिंत इथे ना दार
> कधि चूल पेटली नाहि निघाला धूर
> या इथे उगवली नाही हिरवी काडी ..

तिरकस कल्पनाशक्तीचा हा आविष्कार बघा

> घाटावर होती वाळत छाटी भगवी ।
> दोरीवर होती वाळत साडी हिरवी
> हा चिलीम फुकित म्हणतो बघ सन्यासी
> देवाला देइन त्या दोरीवर फाशी

मात्र ही कल्पनाशक्ती एखाद्या वेळी जगड्व्याळ होऊन विलक्षण प्रभावीपणान मनावर असर करते

> हे शून्य भयकर ! घनता न दिसे त्याची
> शन्याला भीती एकच – अस्तित्वाची
> प्रलयकर शून्ये फिरती विश्वाभवती
> आकर्षुनि गिळती विश्वा (मधली) वसती

येथपर्यंत पोचलेले किणीकर मला माहीत नव्हते. तरारलेले अस्ताव्यस्त लाब केस, कृष्णवर्णी पण दिलखुलास चेहरा, एका पायावर धोतराची सोडलेली निरी, नेहरू सदऱ्यावर काळे जाकीट, हातात सिगारेट, असे गिरगावातल्या रस्त्यामधून वणवण करणारे किणीकर फक्त मी पाहिले होते. अतर्यामीचे किणीकर मला ठाऊक नव्हते. अत करणाची उलघाल करणारे आणि स्वत.चाच मृत्यूलेख वाटावा असे पुढील शब्द लिहिणारे अशरीरी किणीकर तर हृत्कोषात जपून ठेवावे अस वाटल.

अस म्हणतात की कोणत्याही कवीच्या समग्र लेखनातून चार ओळी अशा काढून देता येतात की त्याचं सगळ सामर्थ्य त्यात प्रकट झालेल असत. या चार ओळी मला तशाच वाटतात.

> पण लिहावयाचे लिहून झाले नाही
> पण सागावयाचे सागुन झाले नाही
> सपली कथा – जी कुणी ऐकिली नाही
> सपली रात्र, वेदना सपली नाही

आपल्या वेदनेच हे काव्यात्म धन किणीकरानी आता मला दिल आहे. म्हणून आताचा माझा ताळेबद वट्ट ऋणस्वरूपी आहे.

आजमितीस ( आणि निरतर) आपल्याकडून किणीकराना देण. बरच काही. ☐

---


## राजहंस प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दु ख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे.

खरं तर या दोन टोकामध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# दोन कायापालट : आल्विन टॉफलर : थर्ड वेव्ह

लेखक : विंग कमांडर जनार्दन वाटवे

२० वे शतक आणखी १४ वर्षात संपून २१ वे शतक सुरू होईल. या शतकात भारत एका नव्या कालखंडात प्रवेश करील. या येणाऱ्या कालखंडाचे स्वरूप पूर्वीच्या कालखंडापेक्षा फार निराळे राहील. रंगरूपातील हा फरक इतका तीव्र असेल की काही लोक या अपेक्षित कालखंडास नवे युग असे नामकरण करतात या अपेक्षित युगास COMPUTER युग, Electronic युग, Information युग अशी अनेक नावे दिली जातात. तथापी अपेक्षित युगातील फरक इतका सर्वंकष असेल की ही सर्व नावे तोटकी किंवा अपूर्ण वाटतील. सर्व राजकीय पक्षही या युगाच्या आगमनाची नादी मोठ्या आवाजात गात आहेत. ज्या युगाचा एवढा डांगोरा पिटला जात आहे, त्याचे रंगरूप काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे. त्यासाठी हा एक प्रयत्न.

येणाऱ्या युगाचे स्वरूप जाणण्यासाठी त्या आधी संपलेल्या कालखंडाचा थोडा अभ्यास करणे आवश्यक आहे कोणत्याही घटनेचे स्वरूप, त्या आधी झालेल्या घटनांचे संदर्भात तपासले तरच या घटनेचे सम्यक ज्ञान व तिच्या सर्व पैलूंचे आकलन होते. यासाठी आतापर्यंतच्या इतिहासावर दृष्टी टाकली तर ढोबळमानाने तीन कालखंड आपणास दिसतात

१) भटक्या जमातीचा कालखंड
२) शेतीप्रधान समाजाचा कालखंड
३) औद्योगिक क्रांतीनंतरचा औद्योगिक समाजाचा कालखंड

येणाऱ्या युगाच्या आकलनासाठी या तीनही कालखंडाची माहिती आवश्यक आहे. त्याची चर्चा पुढील काही परिच्छेदात केली आहे.

## (१) भटक्या जमातीचा कालखंड

या कालखंडामध्ये मानव छोट्या टोळ्यांच्या स्वरूपात रहात होता. या टोळ्या निरनिराळ्या जागी राहात असत. पुरुष जंगलात प्राण्यांची शिकार करीत, कंदमुळे गोळा करीत व त्यावर टोळीची उपजीविका होत असे. लहान मुलांचे पालनपोषण व राधणे स्त्रियांकडे असे. एक टोळी एका मोठ्या कुटुंबासारखी असे. रोजच्या उपजीविकेची गरज जेमतेम भागत असल्यामुळे शिल्लक काहीच नसे. त्यामुळे वैयक्तिक मालकी वा बाजारपेठ हा प्रकार अस्तित्वात नव्हता. जंगलाच्या काही भागावर टोळीची सामुदायिक मालकी असे. परंतु गरजेप्रमाणे सर्वच टोळ्या एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जात असल्यामुळे कुठल्याच प्रदेशाशी टोळीचे दृढ नाते नसे.

## (२) शेतीप्रधान समाजाचा कालखंड पहिली लाट, कायापालट

भटक्या टोळ्यांच्या लक्षात आले की जंगलात जाऊन फळे, कंदमुळे वा शिकार करण्यापेक्षा एका जागी राहून फळझाडे लावणे, गवताची कुरणे लावणे व गायी, मेंढ्या पाळून उपजीविका करणे सोपे आहे. लवकरच गवताऐवजी धान्य पिकविणे जास्त फायद्याचे असल्याची जाणीव झाली. हा शेतीप्रधान कालखंड ढोबळमानाने ख्रिस्तपूर्व ८००० वर्षे ते ख्रिस्तानंतर १७०० वर्षे असा ९००० ते १०,००० वर्षांचा आहे. इतिहासातील हा फार मोठा कालखंड आहे. इ सन १७००-१७५० नंतर युरोपात औद्योगिक क्रांतीस सुरुवात झाली व नव्या औद्योगिक कालखंडाचा उदय झाला भारत व आशियातील इतर देशात, जपान सोडून, काही मोठी शहरे सोडली तर अद्यापही शेतीप्रधान समाजव्यवस्था अस्तित्वात आहे व औद्योगीकरणाचा संघर्ष संपलेला नाही. या कालखंडाचे वैशिष्टय म्हणजे भटकणाऱ्या टोळ्या एका जागी स्थिर झाल्या व त्यांचे जमिनीशी विशेष दृढ नाते जमले. जमिनीशी नाते तुटले की हा कालखंड संपला असे समजण्यास हरकत नाही

या कालखंडाची महत्त्वाची लक्षणे तपासणे आवश्यक आहे.

### (१) जमिनीशी अतूट नाते

या कालात जमिनीवर कुटुंबाची वैयक्तिक मालकी प्रस्थापित झाली त्या कालातील समाजधुरीणांनी, राजेरजवाड्यांनी जमिनीचे मालकीहक्क दाखल करणाऱ्या पद्धती ऐतिहासिक गरज म्हणून अमलात आणल्या. यात सनदा, ताम्रपत्रे, शिलालेख वगैरेंचा समावेश असे. माणसाची समाजातील प्रतिष्ठा जमिनीच्या मालकीवर अवलंबून असे. व्यापारात मिळालेला पैसा वापरून त्या काळातील व्यापारी जमीनमालक होण्याचा प्रयत्न प्रतिष्ठेसाठी करत असत, आपल्याकडे बरीच आडनावे, ज्या गावात त्या माणसाची मालकीची जमीन आहे त्या गावावरून असतात, हेही जमिनीशी असणारे दृढ नाते दाखवितात.

### (२) समाईक वा एकत्र कुटुंबपद्धती

या कालखंडात एकत्र कुटुंबपद्धती प्रचारात होती. एका कुटुंबात आई, वडील, मुले याखेरीज आजोबा, पणजोबा, काका व त्यांच्या स्त्रिया अशा अनेक पिढ्या एकत्र राहात असत. सर्व पुरुष एका रक्ताच्या नात्याचे असत व स्त्रिया बाहेरून आलेल्या असत. विवाहानंतर मुली दुसऱ्या कुटुंबात जात. मातृप्रधान कुटुंबपद्धतीही काही भागात प्रचलित होती तथापी तो अपवाद असे व पितृप्रधान एकत्र कुटुंबपद्धती हाच या कालखंडातील नियम होता. जमिनीची मालकी सर्व कुटुंबाची असे पुरुष जमिनीवर एकत्र राबत. राधणे व मुलांचे संगोपन स्त्रियांकडे असे. एकत्र कुटुंबामध्ये इतरही जबाबदाऱ्या असत. मुलांचे शिक्षण व त्यांच्यावर योग्य सामाजिक संस्कार करणे हे कुटुंबाचे काम असे. मूल जन्मत. असंस्कृत असते. त्याच्यावर योग्य संस्कार करून त्यास सुसंस्कृत करणे हे मोठे काम असे. या संस्कारात

कुटुंबाविषयी अभिमान निर्माण करणे, त्या कालास अनुरूप अशा जीवनश्रद्धा देणे याचा अतर्भाव असे. आजारीपणात शुश्रूषा करणे, अपग, अध व वृद्ध अशा कुटुबातील परावलबी घटकाची देखभाल करणे या कुटुबाच्या जबाबदाऱ्या असत. असे हे काहीसे मोठे कुटुब स्थिर होते कारण त्याचे सर्व घटक एकाच जमिनीच्या तुकड्यावर काम करीत होते. जे एकत्र राबतात तेच सामान्यत: एकत्र राहू शकतात. अशी काही कुटुबे एकत्र येऊन लहान खेडी व खेड्याची सकुले अस्तित्वात आली. या कालखंडास अनुरूप अशीच ही कुटुब-व्यवस्था होती.

### ३. स्वावलंबी, अनेक खेड्यात विखुरलेला समाज

शेतीप्रधान कालखडात काही मोठी नगरे व बाजारपेठा अस्तित्वात होत्या. तथापि ९० टक्के समाज अगणित लहान खेड्यात विखुरलेला होता. प्रत्येक खेडे धान्य, वस्त्र, दुभदुभते या बाबतीत आत्मनिर्भर होते शेतीची औजारे, तेलाचे घाणे व इतर काही गरजा त्याच खेड्यात वा त्या खेड्याच्या सकुलात भागविल्या जात असत. एकदर उत्पादन मर्यादित असल्याने व जीवनावश्यक वस्तूत कुटुबे स्वावलबी असल्याने बाजारपेठाची फारशी गरज नसे. आठवड्यात वा महिन्यात एका दिवशी बाजार भरे व मोठा बाजार जत्रेच्या वेळी म्हणजे वर्षातून २–३ वेळा भरे. रोजच्या आयुष्यात रोख पैशाचा वा नाण्याचा सबध फारसा येत नसे. ऊन, पाऊस, रोगराई, अधश्रद्धा याचे प्राबल्य नेहमीच दिसत असल्यामुळे पैशाचे सामर्थ्य रोजच्या व्यवहारात क्षणोक्षणी दृष्टीस येत असे.

### ४. उत्पादक व उपभोक्ता यांचे अद्वैत

कुटुबातील व्यक्ती शेतात राबून जे धान्य पिकवीत असत ते प्राय. कुटुबाच्या उपयोगासाठी असे स्वतःचा व बलुतेदाराचा हिस्सा काढल्यावर थोडाच भाग शिल्लक असे तो स्थानिक बाजारात विक्रीसाठी जात असे. कुटुबातील व्यक्ती टकळीवर किंवा चरख्यावर सूत कातीत व स्वत पुरते कापड बनवीत. उत्पादक व उपभोक्ता एकच असत आणि केवेळ बाजारपेठेसाठी उत्पादन ही अवस्था आलेली नव्हती Alvin Tofler या कुटुबासाठी PRODUCER आणि CONSUMER या दोनीही शब्दाच्या जुळणीने केलेली PROSUMER अशी सज्ञा वापरतात

### ५. वर्णपद्धती

सर्व शेतीप्रधान समाजात वर्णपद्धती अमलात होती. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र अशा वर्णात समाज विभागला होता युरोपात Nobles, Priests आणि Traders असे वर्ण अस्तित्वात होते. १७ व्या शतकातील फ्रान्समधील राज्यक्राती हा मूलत राजेरजवाडे Nobles आणि व्यापारीवर्ग ( traders ) याच्यातील सघर्ष होता प्रत्येकाचा वर्ण त्याच्या जन्माने सिद्ध होत असे.

### ६. मित ऊर्जावापर

शेतीच्या कामासाठी बैल वा युरोपात घोडे वापरले जात. सवारासाठी बैलगाडी वा घोडागाडी असे इधनासाठी जंगलातली झाडे तोडली जात. स्वतची व प्राण्याची स्नायुशक्ती हाच समाजातील मोठा ऊर्जा आधार होता. तोडलेली झाडे परत वाढतात व खर्चिलेली स्नायूशक्ती परत येते उर्जेचा मित व काटकसरीने केलेला वापर व त्याचा Renewable Source हे या कालखडाचे महत्त्वाचे लक्षण होते.

शेतीप्रधान कालखडाची अनेक लक्षणे सागता येतील. तथापि वर उल्लेखिलेली सहा लक्षणे महत्त्वाची आहेत भटक्या टोळयाचा कालखड सपून शेतीप्रधान समाजाचा उदय झाला व हा बदल वेगाने सर्व जगभर पसरविला. या बदलास ALVIN TOFLER पहिली लाट First wave असे रूपक देतात. त्यानतर १८ व्या शतकात आलेल्या औद्योगिक क्रातीस Second wave– दुसरी लाट असे सबोधतात. तथापि बदलाचे सर्वलक्षी स्वरूप पाहिले तर पहिला कायापालट व दुसरा कायापालट या सज्ञा अधिक अर्थपूर्ण वाटतात, पण या आधी दुसरी लाट वा दुसरा कायापालट अद्याप नजरेखाली घालावयाचा आहे

## (३) औद्योगिक क्रांती – दुसरी लाट दुसरा कायापालट

१७ व्या शतकाचे अखेरीस ब्रिटनमधील जगले संपुष्टात आली व इधनाची कमतरता भासू लागली. त्यामुळे खाणीतील कोळसा हे मुख्य इधन झाले. कोळशाच्या खाणी खोल खोल गेल्या आणि त्यातील पाणी घोड्याने चालविलेल्या पपाने वर खेचणे कठीण झाले. याच सुमारास NEWCOMEN याने वाफेवर चालणारे इंजिन तयार केले. या इंजिनाचा उपयोग प्रथम खाणीतील पाणी खेचण्यासाठी केला गेला नतर बोटी व रेलगाडी चालविण्यासाठी वाफेच्या इजिनाचा उपयोग होऊ लागला. याच सुमारास युरोपात अनेक चात्या असलेले सूतकताई मशिन व कापड विणण्यासाठी यांत्रिक माग अस्तित्वात आले थोड्याच वर्षात कोळशाला पर्यायी असे खनिज-तेलही प्रसारात आले. या सर्व बदलामुळे व इतरही काही कारणामुळे औद्योगिक क्रातीची लाट आली. पुढील ३०० वर्षात ही लाट युरोपातील सर्व देशात व उत्तर अमेरिकेत पसरली व तिने बहुतेक सर्व समाजव्यवस्था ढवळून काढली. औद्योगिक क्रातीची एक अशी कारण-मीमासा नाही. अनेक लहानसहान बदलाचा एकत्रित परिणाम या क्रातीस कारणीभूत झाला. तथापि कारणाच्या चर्चेपेक्षा घडून आलेल्या बदलाच्या स्वरूपाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. त्याच बरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की हा बदल सुरळीतपणे वा सघर्षाशिवाय घडून आला नाही. शेतीप्रधान समाजव्यवस्था व औद्योगीकरणाची प्रक्रिया यात सघर्ष होणे सर्वच देशात अनिवार्य होते

१८ व्या शतकात अमेरिकेतील उत्तरेकडील राज्ये व दक्षिणेकडील राज्ये याच्यात यादवीयुद्ध झाले दक्षिणेकडील गुलामगिरीची पद्धत हे यादवीचे एक कारण होते असे मानले जाते तथापि तज्ज्ञाचे मते उत्तरेकडच्या राज्यातील औद्योगीकरण व दक्षिणेकडील राज्यातील शेतीप्रधान समाजव्यवस्था याच्यातील मूलभूत सघर्ष यादवीस कारणीभूत होता येथेही कृत्रिम धाग्याच्या कापडाची होळी, शेतमालाला आधारभावाची मागणी आणि शेतकरी सघटनेची चळवळ हाच

संघर्ष दाखवितात. शेतकऱ्यानी कितीही कापूस वा कादा पिकवावा व भाव नसल्यास सरकारने नुकसान सोसून तो विकत घ्यावा ही मागणी व त्याला होणारा विरोध हेही हाच मूलभूत झगडा दाखवितात.

दुसऱ्या लाटेने अस्तित्वात आलेल्या औद्योगिक समाजव्यवस्थेची लक्षणे तपासणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या लक्षणाची चर्चा पुढे केली आहे

## १. कारखानदारी

भौतिक शास्त्रातील प्रगतीमुळे शक्तिशाली यंत्रे बनविण्यात आली. यंत्र हे मूलत. स्नायुबल अनेकपटीने वाढविते शेकडो अश्वशक्तीच्या परिमाणात मोजता येईल अशी या यंत्राची ताकत असे सूतकताईसाठी वा कापड विणण्यासाठी अशा एका यंत्राचा वापर केला म्हणजे हजारो चारख्या किंवा शेकडो माग एकत्र एका छपराखाली आणणे आवश्यक बनते. एक यंत्र दुसऱ्या यंत्रावर अवलंबून असल्यामुळे यंत्राचे एकत्रीकरण व कारखान्याचा उदय झाला पहिल्या लाटेखालील समाजातही यंत्रे होती चरखा, माग ही यंत्रे घरोघरी असत. कुभाराचे चाक वा तेलाचा घाणा प्रत्येक खेड्यात असे. ही यंत्रे व ती चालविणारे स्नायुबल विखुरलेले होते तसेच या यंत्राची ताकत नवीन यंत्राचे तुलनेत नगण्य होती. नवीन शक्तिशाली यंत्राच्यामुळे उत्पादनक्षेत्र आता एका जागी–कारखान्यात केंद्रित झाले. कारखानदारी असलेल्या शहराचा उदय अनिवार्य होता. या कारखान्यात काम करण्यासाठी लोकाचे लोंढे खेड्यातून शहराकडे येऊ लागले. कारखान्यात काम करून उपजीविका करणारा एक नवीन वर्ग–कामगारवर्ग निर्माण झाला. मूळ शेतकरी असलेल्या या व्यक्तीचे जमिनीशी असणारे नाते तुटले.

## २. उत्पादक व उपभोक्ता यांच्यातील द्वैत

यंत्रे आल्यावर उत्पादनाचा वेग प्रचड प्रमाणावर वाढला. हे उत्पादन पूर्णपणे बाजारातील विक्रीसाठी होते केवळ विक्रीसाठी उत्पादन व उत्पादक व उपभोक्ता याच्यात निर्माण झालेली दरी हे औद्योगिक समाजाचे अत्यंत महत्त्वाचे लक्षण होय.

## ३. बाजारपेठेचा विकास व राष्ट्रभावनेचा उदय

वाढलेले उत्पादन व उपभोक्ता व उत्पादक याच्यातील दरी यामुळे उत्पादनाच्या विनिमयासाठी बाजारपेठ अस्तित्वात येणे आणि विकास पावणे अनिवार्य होते. फायद्यावर आधारित भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये बाजारपेठ विकास पावते असे नाही. जोपर्यंत उत्पादक व उपभोक्ता निरनिराळे आहेत तोपर्यंत वस्तूच्या विनिमयासाठी बाजाराच्या माध्यमाची गरज राहणारच. समाजवादी देशातही बाजारपेठेचा विकास झाला. या बाजारपेठेने औद्योगिक समाजाच्या सर्व स्तरावर अनेक परिणाम केले.

सुरवातीच्या काळात बाजारपेठ ही कारखान्याच्या शहरी अस्तित्वात आली; पण उत्पादनाचे प्रमाण वाढले तसे बाजारपेठेचा विस्तार करणे आवश्यक झाले याला एक अडथळा म्हणजे दळणवळणाची अपुरी साधने; पण त्यापेक्षा मोठा अडथळा म्हणजे विस्कळीत राजकीय सत्ता. औद्योगिक क्रांतीच्या सुरवातीचे काळात युरोपात अनेक लहान राज्ये, जहागिऱ्या अस्तित्वात होत्या. एकट्या जर्मन भाषेच्या प्रदेशात ३०० हून अधिक राज्ये वा जहागिऱ्या अस्तित्वात होत्या. या राज्याचे कायदे, करविषयक तरतुदी भिन्न असत. व्हॉल्टेअरने एका ठिकाणी लिहिले आहे की युरोपात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर जाताना जितक्या मुक्कामावर घोडे बदलावे लागत त्यापेक्षा जास्त मुक्कामावर कायदे बदलावे लागत. प्रचंड वाढलेले उत्पादन विक्रीसाठी अनेक दूरच्या बाजारपेठेत पाठवावे लागे. अनेक लहान लहान राज्याची ही राजकीय व्यवस्था वाढलेल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी अनुरूप नव्हती. जेथे एक कायदा विशेषत: व्यापारी कायदा, एक मध्यवर्ती चलन व सुलभ दळण–वळणाची साधने अस्तित्वात आहेत असा एकसंध प्रदेश निर्माण करणे ही नव्या औद्योगिक समाजाची गरज होती. जर्मन भाषेच्या प्रदेशातील ३०० पेक्षा अधिक राज्याचे एकत्रीकरण करून एक जर्मन राष्ट्र Das Vaterland बिस्मार्कने घडविले. इटाली, स्पेनमध्येही लहान राज्याच्या एकत्रीकरणाने नवी राष्ट्रे उदयास आली. राष्ट्रभावना वा राष्ट्रीय अस्मिता नव्याने निर्माण करण्यासाठी जुन्या इतिहासातले नायक शोधून त्याना नवा रग देण्यात आला. राष्ट्रीयतेचे वा राष्ट्रीय अस्मितेचे पोवाडे कवीनी प्रत्येक राष्ट्रात रचले असले तरी आज अस्तित्वात असलेली राष्ट्रीय अस्मिता ही अगदी अलीकडील म्हणजे गेल्या ३०० वर्षातील निर्मिती आहे याचे कारण म्हणजे प्रगत उत्पादन व विकसित बाजारपेठ याना आवश्यक असलेली एकसंध राष्ट्राची गरज गेल्या ३०० वर्षात निर्माण झाली. याच कारणामुळे ही राष्ट्रभावना मूलत. सकुचित स्वार्थ व दुराभिमान यावर अवलंबून होती व दोन महायुद्धाना काही अशी कारणीभूत झाली भारतातही राष्ट्रीय अस्मितेचा इतिहास १००–१२५ वर्षांचाच आहे शेतीप्रधान कालखडातही मोठी एकसंध साम्राज्ये होती, परंतु लोकाच्या निष्ठा त्या प्रदेशाच्या राजाना वाहिलेल्या असत सबंध युरोप पादाक्रांत करणाऱ्या नेपोलियनची सेना नेपोलियनसाठी लढत असे, फ्रान्ससाठी नसे, असे इतिहासकार सागतात

उत्पादनवेग जसा वाढला त्याप्रमाणे राष्ट्रीय बाजारपेठही अपुरी पडू लागली. आंतरराष्ट्रीय पेठेची, करविषयक तरतुदीची, आतरराष्ट्रीय चलनपद्धतीची गरज भासू लागली. सर्व देशाचे एक राष्ट्र बनणे शक्य नसल्याने ही गरज अमेरिकेच्या पुढाकाराने International Monetary Fund, World Bank या सस्थानी व GATT या अग्रीमेंटने भरून काढली, परतु हा विषय निराळा. येथे बाजारपेठाचा उदय व राष्ट्रभावनेचा उदय ही औद्योगिक कालखडाची लक्षणे आहेत हे नमूद करणे एवढेच सबद्ध आहे

## ४. विभक्त कुटुंबपद्धती– Nuclear Family

एकत्र कुटुबातील सर्व घटक एकत्र काम करीत. कारखान्यात काम करण्यासाठी लोकाचे लोंढे खेड्यातून शहरात आले जमिनीवर राबणारे काही घटक व दूरच्या शहरात कारखान्यात राबणारे काही घटक याचे एकत्र कुटुब शक्य नव्हते व औद्योगिक समाजास अनुरूपही नव्हते. आई, वडील व मुले याना सीमित अशा विभक्त Nuclear कुटुबाचे जमिनीशी नाते नव्हते व त्यामुळे ते अधिक

सचारी ( Mobile ) होते. या कालानुरूप कुटुंबपद्धतीचा प्रसार औद्योगीकरणाबरोबर वेगाने झाला, ही एकच नैसर्गिक कुटुंबपद्धती आहे असा भ्रम निर्माण झाला. एकत्र कुटुंबातील इतर कर्तव्ये साहजिकच इतरत्र वाटली गेली. मुलाच्या शिक्षणाचे व त्याना सुसस्कृत करण्याचे काम शाळाच्याकडे सोपविले गेले. आजारी व अपगासाठी सार्वजनिक इस्पितळे आली. कुटुबातील वृद्धाची वृद्धाश्रमात रवानगी झाली. या सर्व सस्थाना शासनाने मदत केली. कारण औद्योगिक समाजास अनुरूप अशी विभक्त कुटुबव्यवस्था रूढ करणे आवश्यक होते.

### ५. ऊर्जेचा अनिर्बंध वापर

शेतीप्रधान कालखडात ऊर्जेचा वापर मित व Renewable Source मधून असे. औद्योगिक कालखडात कोळसा व खनिज तेल ही शक्तीशाली इधने अल्पमोलात मिळाली औद्योगिक समाजास मिळालेली ही अत्यत महत्त्वाची गुप्त मदत ( Hidden Subsidy ) होय असे तज्ज्ञ म्हणतात. शेतीप्रधान कालखडातील ऊर्जेचा वापर म्हणजे बँकेतील मुद्दलावरील व्याजात ससार चालविण्यासारखे होते. औद्योगिक कालखडातील इधनाचा वापर म्हणजे मुद्दलच खाऊन टाकण्याचा प्रकार होता. केवळ ऊर्जाच नव्हे, तर सर्वच नैसर्गिक साधनसामुग्रीची उधळपट्टी हा या कालखडाचा विशेष होय.

### ६. व्यक्तित्वाची घडण

औद्योगिक समाजात वाढलेल्या मानवाची जडणघडण आणि शेतीप्रधान समाजात वाढलेल्या मानवाची जडणघडण यात बरेच अतर निर्माण झाले. या दोघाच्या जाणिवा, त्याचे सज्ञाविश्व सर्वस्वी निराळे होते. औद्योगिक मानवाचा निसर्गाशी सबध त्यामानाने कमी आला व जो सबध आला तो निसर्गावर विजय किंवा बळजबरी करण्याच्या सदर्भात आला त्याच्या सज्ञाविश्वात पक्षांचा किलबिलाट, कोबडयाचे आरवणे, निसर्गाची अनेक रूपे कधी आलीच नाहीत. जाणिवातील फरकामुळे त्याचा मनोव्यापार, वास्तवाविषयीच्या त्याच्या कल्पना, धर्म व विज्ञान याविषयीच्या श्रद्धा निराळ्या झाल्या. वैवाहिक सबधाचे एक उदाहरण देता येईल शेतीप्रधान समाजात नियोजित वधू हातापायाने धट्टीकट्टी आहे किंवा नाही, आजारपणात तिला शुश्रुषा करता येते की नाही, हे पाहिले जात असे. कपडे शिवण्यासाठी चागली दृष्टी असणे, १५–२० जणाचा स्वैपाक राधण्याची चतुराई असणे महत्त्वाचे होते. औद्योगिक कुटुबात अनेक कर्तव्ये बाहेर गेल्यावर हे गुणविशेष असबद्ध झाले. प्रेम, भावनाचे सुसवादित्व, मैत्रीपूर्ण बौद्धिक सहचर्य असे नवीन गुणविशेष प्रथमच विवाहात जाणवू लागले Romantic Love या भावनेचा उदय या काळात झाला. अशा अनेक निराळ्या कल्पनामुळे औद्योगिक मानवाची जडणघडण निराळी झाली

औद्योगिक क्रातीनतरच्या समाजाची महत्त्वाची लक्षणे वर पाहिली औद्योगिक कालखडात उत्पादनाचा वेग एकदोन नव्हे तर अनेक पटीने वाढला याचे कारण स्वस्त, कोळसा व खनिज तेल याची गुप्त मदत ( Hidden Subsidy ) व त्याचा अनिर्बंध वापर हेही आपण पाहिले तथापी उत्पादनवेगाचे हे एकमेव कारण होते असे म्हणता येणार नाही या कालखडात उत्पादनप्रक्रियेत काही महत्त्वाची सूत्रे अमलात आणली गेली व त्यामुळे उत्पादनास प्रचड गती मिळाली. ही सूत्रे पुढे येणाऱ्या तिसऱ्या लाटेत व कायापालटात निरर्थक, कालबाह्य व अडगळीची ठरणार आहेत. या सूत्राचा पुढील परिच्छेदात विचार केला आहे.

### १. परिमाणांचे निश्चितीकरण – Standardization

शेतीप्रधान समाजात उत्पादन मर्यादित होते व बाजारपेठाची वाढ झाली नव्हती. एका प्रदेशातील उत्पादन दुसऱ्या प्रदेशात अपवादानेच जात असे. त्यामुळे प्रत्येक भागात लाबी, रुदी व वजनाची निरनिराळी परिमाणे अस्तित्वात होती व ती ढोबळ स्वरूपाची होती. एका भागातील शेर दुसऱ्या प्रदेशातील पावशेराबरोबर असे. विहीर ३०–४० हात खोल असे सागितले जाई व राहण्याची जागा खणात मोजली जाई. दुसरे घर हाकेच्या अतरावर असे. औद्योगिक कालखडात हा ढोबळपणा चालणे शक्य नव्हते. औद्योगिक क्रातीची लाट जशी निरनिराळ्या देशात पसरू लागली तशी त्या देशात परिमाणाची निश्चिती करण्यात आली. बहुतेक देशात निरनिराळ्या भागात निरनिराळी नाणी प्रचलित होती. ती नाणी त्या भागातील राजेरजवाड्यानी वा व्यापारी पेढ्यानी प्रसृत केली होती. भारतात एकाच वेळी मोगली रुपया, सुरती शिक्का, सोन्याचा होन, हाली रुपया अशी अनेक नाणी प्रचारात होती. युरोपातही असाच प्रकार होता. औद्योगिक कालखडात हे सर्व वद होऊन मध्यवर्ती बँकेतर्फे निश्चित नोटा व नाणी प्रसृत करण्यात आली. निश्चितीकरणाची ही प्रक्रिया एवढ्यापुरतीच मर्यादित नव्हती निश्चित बाजारभाव, निश्चित मापाचे तयार कपडे, पादत्राणे अस्तित्वात आले. सर्व परिभाषेप्रमाणे बुद्धिमत्तेच्या कसोट्याचेही निश्चितीकरण झाले. टेलर याच्या मताप्रमाणे कोणत्याही कामाच्या एका पायरीसाठी एकच निश्चित पद्धत असते, एकच निश्चित औजार (साधन) असते व त्यासाठी एकच निश्चित कालावधी लागतो. टेलर हे व्यवस्थापनशास्त्रातले एक मोठे तज्ज्ञ होते.

### २. तज्ज्ञप्रवृत्ती – Specialization

औद्योगिक कालखंडाच्या सुरवातीच्या काळात अँडम स्मिथ नावाचे एक विचारवत लेखक होऊन गेले. त्यानी आपल्या एका ग्रथात एका छोट्या कारखान्यास दिलेल्या भेटीचे वर्णन आहे त्याकाळी एक कामगार दिवसाकाठी ५०–६० पिना बनवीत असे. अर्थात पिनेस टोक करणे, पॉलिश करणे, पॅकिंग करणे ही सर्व कामे तो स्वत च करत असे. स्मिथने वर्णन केलेल्या लहान फॅक्टरीमध्ये पिन बनविण्याच्या दहा पायऱ्या होत्या वायरमधून ठराविक लाबीचे तुकडे कापणे, एका बाजूस टोक करणे, दुसऱ्या बाजूस डोके करणे, पॉलिश करणे वगैरे, वगैरे कामाच्या या प्रत्येक पायरीसाठी तज्ज्ञ कामगार असे व तो दिवसभर तेवढेच काम करीत असे अशा तऱ्हेने १० कामगार दर दिवशी ४८००० किंवा दरमाणशी ४८०० पिना तयार करीत असत पहिल्या प्रकारापेक्षा हे उत्पादन कितीतरी पटीने अधिक होते. फोर्ड कपनीच्या मोटारीच्या कारखान्यात एक कामगार अनेक वर्षे एकच काम करीत होता ते म्हणजे फिरत्या बेल्टवरून समोर आलेल्या मोटारीच्या सागाड्यावर चाक बसविणे चाकाचे नट पिळण्याचे काम दुसरा कामगार करी

पिनाची ही वरील गोष्ट पुढील ३०० वर्षांत निरनिराळ्या तऱ्हेच्या अनेक कारखान्यात थोड्याफार फरकाने परत परत दिसून आली.

### ३. साखळी पद्धत – Synchronization

एका कामाच्या अनेक पायऱ्या करून प्रत्येक पायरीसाठी तज्ञ कामगार नेमल्याने उत्पादन वाढले हे खरे, पण या पद्धतीने प्रत्येकाचे काम परस्परावलंबी ( interdependant ) झाले. साखळीतील एक दुवा तुटल्यास साखळी निरुपयोगी होते. तसेच एक कामगार उशिरा आल्यास वा गैरहजर राहिल्यास साखळीतील इतर कामगारांची कामे अडतात. शेतीप्रधान कालखंडात उत्पादन प्रक्रियेमध्ये परस्परावलंबित्व एवढ्या प्रमाणावर नव्हते त्यामुळे औद्योगिक कालखंडात वक्तशीरपणाला एक आगळेच महत्त्व आले, जे पूर्वी कधीही नव्हते. औद्योगिक क्रांतीच्या सुरवातीचे काळात खेड्यातून कारखान्यात कामावर आलेला कामगार अनियमित असे, कारण त्याला वक्तशीरपणाच्या महत्त्वाचे व कामाच्या परस्परावलंबित्वाचे नीट आकलनही होत नसे. हे शिक्षण लहानपणापासून देणे आवश्यक आहे हे लक्षात आल्यावर, शाळांतील अभ्यासक्रमात एक महत्त्वाचा फरक करण्यात आला. इतर विषयांबरोबर वक्तशीरपणा, आज्ञाधारकपणा व कंटाळवाणे साचेबंद काम ( Rote work ) करण्याची सवय याचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात आला.

### ४. निर्मितीचे मोठे प्रमाण – Maximization

कोणत्याही कारखान्यातील उत्पादनात दोन प्रकारचा खर्च अंतर्भूत असतो. उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा खर्च एक प्रकारचा व ऑफिसमधील पत्रव्यवहाराचा खर्च, कारखान्याच्या जागेचा खर्च, यंत्रसामुग्रीचा खर्च दुसऱ्या प्रकारचा. पहिल्या प्रकारचा खर्च उत्पादित नगांच्या संख्येप्रमाणे कमी वा अधिक होतो, तर दुसऱ्या प्रकारचा खर्च उत्पादित नगांच्या संख्येवर अवलंबून नसतो. विक्रीची किंमत ठरविताना दुसऱ्या प्रकारचा खर्च हा उत्पादित नगांच्या संख्येत वाटला जातो. त्यामुळे उत्पादित नगांची संख्या जेवढी जास्त, त्या प्रमाणे नगाच्या किंमतीत घट होते. थोडक्यात वस्तू मोठ्या प्रमाणात बनविणे अधिक फायदेशीर होते.

स्वस्त कोळसा व खनिज तेल यांच्या गुप्त मदती ( hidden subsidy ) बरोबर वर उल्लेखिलेल्या काही तंत्रांचा वापर केल्यामुळे उत्पादन अनेक पटीने वाढले. पण औद्योगिक क्रांतीने केवळ उत्पादन प्रक्रिया व विक्री यांच्यातच आमूलाग्र फरक घडविला असे नाही या क्रांतीने मानवी व्यक्तिमत्वातही तेवढाच मूलगामी फरक घडविला. औद्योगिक कालखंडातील मानवाची जडणघडण, त्याच्या जाणिवा व प्रेरणा या आधीच्या कालखंडातील मानवापेक्षा निराळ्या झाल्या.

## मानवी व्यक्तिमत्त्वातील बदल

बाजारपेठाचा विस्तार ज्या प्रमाणात होत गेला, त्या प्रमाणात बाजारपेठाच्या परिघाबाहेर राहणारा खेड्यातील स्वावलंबी समाज हळूहळू बाजारपेठेच्या भोवऱ्यात ओढला गेला. त्याच्या शेतातील पिकाच्या किंमती हजारो मैलांवर झालेल्या घटनांचे संदर्भात ठरू लागल्या. शेतमालाच्या किंमती दूरवरच्या दुसऱ्या देशात दुष्काळ आहे का अमाप पीक आले आहे, याप्रमाणे खालीवर होऊ लागल्या. कापसाच्या किंमती कापूस पिकविण्याच्या खर्चाच्या संदर्भातच नव्हे तर कृत्रिम धाग्याच्या निर्मितीच्या खर्चाप्रमाणे बदलू लागल्या. १९ व्या शतकात युरोपात पामच्या तेलावर प्रक्रिया करून मार्गारीन वा कृत्रिम लोणी बनविले गेले, व ते खूप लोकप्रिय झाले पामच्या तेलाला प्रचंड मागणी निर्माण झाली आणि त्यामुळे पामची झाडे असलेल्या आफ्रिकेतील काही भागातील समाजजीवन उध्वस्त झाले असे इतिहासकार सांगतात. अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर मोटारगाड्यांचे उत्पादन सुरू झाले व त्यांच्या टायरसाठी रबराला अचानक मोठी मागणी आली. दक्षिण अमेरिकेत रबराची नवी लागवड करण्यासाठी सक्तीने गुलामांना पाठविले व ४००० टन रबरासाठी ३०,००० गुलाम मृत्युमुखी पडले. थोडक्यात गावाच्या परिघाबाहेर असलेली बाजारपेठ सर्व अर्थाने गावाच्या मध्यभागी आली. वैयक्तिक जीवनातही हाच फरक घडून आला.

या कालखंडातील मानव विभक्त कुटुंबात जन्मला त्याचे आईवडील कारखान्यात किंवा ऑफिसात काम करीत होते. त्याचे शिक्षण व संस्कार फॅक्टरीसदृश शाळेत झाले आईवडील वा इतर वृद्धांचा सहवास त्याला फारसा लाभला नाही. या कालखंडात अस्तित्वात आलेल्या अनेक सुखसोयींची प्रतिमा लहानपणापासून त्याच्या मनावर उमटली. एअर कंडीशनर्स, रेफ्रिजरेटर्स, शक्तिशाली मोटारगाड्या, दळणवळणाच्या सुविधा व पंचतारांकित सुखसोयी यांचे अस्तित्व व उपलब्धता त्याला दिसत होती. पैशाची वाढलेली उपयुक्तता त्याला पूर्णपणे पटली. आधीच्या कालखंडात या सोयी उपलब्ध नसल्याने पैशाची उपयुक्तता काहीशी तात्त्विक होती, आता ती व्यावहारिक झाली. जीवनातील सुखसोयीच नव्हे, तर आरोग्य, शुद्ध हवा, पाणी यासारख्या एकेकाळच्या निसर्गाच्या देणग्यासाठीही आता पैसे मोजावे लागतात हे लक्षात आले. पैसे असतील तर हृदयावरील नाजूक शस्त्रक्रिया शक्य होतात. नाहीतर मृत्युशिवाय पर्याय नसतो. त्याला उमजले की बाजारात विकत घेता येत नाही असे आता काहीच शिल्लक राहिलेले नाही व तसेच बाजारात ज्याला मागणी नाही ते कवडीमोल आहे चोखंदळ तज्ञांच्या मान्यतेपेक्षा बाजारातील यशस्वी विक्री हा महत्त्वाचा निकष आहे. बाजारातील यशस्वी विक्री म्हणजे ढोबळ अभिरूचीच्या लोकांनी बहुमताने दिलेली दाद.

अशा परिस्थितीत वाढलेल्या प्रातिनिधिक मानवात पैसा आणि उपभोगाच्या वस्तू यांचा अमर्याद हव्यास निर्माण न झाला तरच नवल १८४८ साली कम्युनिस्ट मॅनिफेस्टोमध्ये कार्ल मार्क्सने निवाडा दिला की सबंध इतिहासात पैशासाठी एवढी हपापलेली, बाजारू वृत्तीची, अपमतलबी आणि सांस्कृतिक दृष्ट्या दिवाळखोर अशी मानवाची अवस्था यापूर्वी कधीही झाली नव्हती मार्क्सचे हे मत १५० वर्षांपूर्वीचे आहे, तरीही ते समर्पक वाटते; पण मार्क्सच्या मताप्रमाणे या दुरावस्थेचे कारण भांडवलशाही अर्थव्यवस्था हे होते. उत्पादनसाधनांची वैयक्तिक मालकी संपवून सामाजिक मालकी प्रस्थापित करणे हा त्यावरील उपाय होय. आल्विन टॉफ्लर यांचे मते या दुरावस्थेचे खरे कारण भांडवलशाही नसून उत्पादक आणि

उपभोक्ता यांच्यामधील दरी व त्यामुळे निर्माण झालेली बाजारपेठ हे आहे.

## दुसऱ्या कायापालटाचे मूल्यमापन

या दुसऱ्या कायापालटाचे फलित काय असा प्रश्न मनापुढे येतो पण एका मोठ्या कालखंडाचे मूल्यमापन आपण कोणत्या निकषावर करणार ? या कालखंडात मानवाने भौतिकशास्त्रात असामान्य प्रगती केली. मानव चंद्रावर जाऊन पोचला व लवकरच इतर ग्रहांवरही पोचेल. त्याचवेळी सर्व जगाचा एकाच क्षणात नाश करता येईल, एवढी अण्वस्त्रे आज कोठारात जमा आहेत. अतिहव्यासामुळे वातावरण व समुद्राचे मोठे भाग दूषित झाले आहेत. वातावरणात तीव्र फरक अपेक्षित आहेत. श्रीमंत देश व गरीब देश यांच्यातील अंतर वाढत आहे. एकाच देशातील श्रीमंत वर्ग व गरीब वर्ग यांच्यातील दरी खोल होत आहे. उत्तुंग हवेल्यांशेजारी नरकासमान झोपडपट्ट्या आहेत. त्यात दारिद्र, दुःख, गुन्हेगारी आहे व शेजारी अमाप समृद्धी आहे, चैनीच्या वस्तूंचा अमर्याद सोस असणारा, सहसंवेदना हरवून बसलेला उथळ निलाजरेपणा आहे. व्यक्तीव्यक्तीतील संबंधांना आलेले बाजारू स्वरुप, यश व अपयश मोजण्याचे सर्वमान्य ठोकळेबाज निकष, पैशाला आलेली अमर्याद शक्ती, कायम बोथट झालेली सामाजिक सहसंवेदना अशी औद्योगिक कालखंडाची अनेक वैशिष्ठे डोळ्यासमोर येतात व मन चक्रावून जाते. तथापि सुधारलेले आरोग्यमान, वाढलेली आयुर्मर्यादा, अंधश्रद्धांचे निराकरण ही वैशिष्टेही डोळ्यासमोर येतात. सामाजिक व धार्मिक सहिष्णुता, कायद्यासमोर सर्वांची समानता व साहित्य, संगीत आणि इतर कलांचा दर्जा व जिवंतपणा हेही मूल्यमापनाचे निकष नाहीत काय ? या सव निकषांवर तपासले तर औद्योगिक कालखंड निश्चितच प्रगतीशील ठरेल. शिवाय आधीचा शेतीप्रधान कालखंड म्हणजे रामराज्य होते असे समजणेही स्वप्नरंजनाचा प्रकार होईल. त्या कालखंडातही भयानक अत्याचार, दारिद्र व जीतघेणी विषमता अस्तित्त्वात होती. अंधश्रद्धा, अपसमज व धार्मिक असहिष्णुतेने कमाल पातळी गाठली होती. युरोपात कॅथालिक पंथाच्या असहिष्णुतेमुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले. इस्लाम धर्माच्या प्रसाराचा इतिहासही तेवढाच क्रौर्यमय आहे. प्लेग, देवी व इतर सांसर्गिक रोगामुळे हजारोंनी अपमृत्यू होत असत. बालमृत्यूचे प्रमाण आजच्यापेक्षा दसपटीने अधिक होते.

कदाचित कोणत्याही एका मोठ्या कालखंडाचे एकमेव असे मूल्यमापन करण्याचा प्रयत्नच चुकीचा आहे. औद्योगिक क्रांतीची एक अशी कारणमीमांसा नाही. तसेच या क्रांतीचे एकमेव असे मूल्यमापन नाही. जेवढ्या व्यक्ती तेवढे निकष व जेवढे निकष तेवढी मूल्यमापने. भारताच्या संदर्भात औद्योगिक क्रांती काही मोठ्या शहरात अस्तित्वात आली आहे व इतर भागात शेतीप्रधान समाज सर्व लक्षणास रूढ आहे.

# तिसरी लाट वा तिसरा कायापालट

दुसऱ्या कायापालटाचे मूल्यमापन कसेही केले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे. औद्योगिक समाजव्यवस्थेचा खेळ आता संपत आला आहे व एका नवीन क्रांतीची व समाजरचनेची नांदी पडद्यामागून स्पष्टपणे ऐकू येत आहे. किंबहुना अमेरिकेत व जपानमध्ये ही तिसरी लाट गेल्या दहा वर्षांपासून दिसू लागली आहे. औद्योगिक क्रांतीवर आधारित समाजरचना आता फार वेळ तग धरणार नाही असे म्हणण्यास दोन प्रमुख कारणे आहेत. (१) कोसळत आलेला ऊर्जाआधार व (२) निसर्गातील समतोल राखण्यात आलेले अपयश.

### (१) कोसळणारा ऊर्जाआधार –

खनिजतेलाचे साठे परिमित आहेत व ते आणखी काही वर्षे पुरतील. नवीन साठे सापडले तरी ते पूर्वीइतके स्वस्त राहणार नाहीत. याला अनेक अर्थशास्त्रीय कारणे आहेत. त्यामानाने स्वस्त कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असला तरी कोळशाचे वापरास काही नैसर्गिक मर्यादा आहेत, व तो खनिज तेलाची जागा घेऊ शकणार नाही. औद्योगिक कालखंडातील यंत्रशास्त्र स्वस्त कोळसा व खनिजतेलाच्या गुप्त मदतीवर आधारित होते. हा आधार संपल्यावर ऊर्जेची उधळपट्टी करणारे यंत्रशास्त्र डिनोसारप्रमाणे कालबाह्य होईल. ज्या प्रगत देशांत ' तिसरी लाट ' आली आहे ते देश धुराड्यावर आधारित जुने तंत्रज्ञान आशियातील अप्रगत देशात आनंदाने निर्यात करीत आहेत.

### २. निसर्गातील समतोल राखण्यात आलेले अपयश

औद्योगिक कालखंडात इंधनाचा वापर प्रचंड प्रमाणावर वाढला. किंबहुना सर्वच नैसर्गिक साधनसामग्रीची उधळण हे या कालखंडाचे वैशिष्ठ होते. कोळसा व खनिजतेल जाळण्यामुळे कार्बन डायऑक्साईड ( $CO_2$ ) मोठ्या प्रमामावर वातावरणात सोडला जातो. हिरव्या वनस्पती व झाडे वातावरणातील $CO_2$ व पाणी शोषून घेतात व सूर्यप्रकाशाच्या सहाय्याने carbohydrates तयार करतात. या प्रक्रियेस Photosynthesis असे म्हणतात. अशा रीतीने वातावरणातील $CO_2$ चे अस्तित्व योग्य प्रमाणात राखले जाते. तथापि या प्रक्रियेसही काही सीमा आहेत. इंधनाचे अनिर्बंध ज्वलन व त्यामुळे होणारी $CO_2$ ची अमर्याद निर्मिती व मोठ्या प्रमाणावरील



जंगलाचा सहार यामुळे सर्व $CO_2$ चे Carbohydrates मध्ये रुपांतर होऊ शकत नाही. वातावरणातील $CO_2$ चे प्रमाण १९०० साली सुमारे ०.०२९% होते तर १९४० साली ते ०.०३२% एवढे झाले व अशीच वाढ अपेक्षित आहे. वातावरणातील $CO_2$ चे प्रमाण जरी थोडेसे वाढले तरी त्यामुळे पृथ्वीवरील तपमानात मोठे फरक होतात. याचे कारण म्हणजे हवेची वाढणारी घनता व Green house effect होय या वाढणाऱ्या तपमानामुळे दोनीही ध्रुवावरील बर्फ वितळतो व समुद्राची पातळी वाढते. इंधनाचा वापर असाच राहिला तर यत्या काही शतकात समुद्रकाठची अनेक शहरे समुद्राखाली जातील असा तज्ज्ञाचा इशारा आहे. निसर्गातील समतोल हा अत्यत नाजूक असतो व औद्योगिक कालखडात त्यावर अनेक आघात होत आहेत हे दाखविण्यासाठी हे एक उदाहरण होते हाच प्रकार किरणोत्सर्गी waste, वातावरणात वाढणारे $So_2$, अमोनिया वगैरे वायू या बाबतीतही आहे.

या व इतर काही कारणामुळे औद्योगिक कालखड सपुष्टात येऊन नवीन यत्रशास्त्रावर आधारित नवीन समाजरचना अस्तित्वात येईल किंबहुना काही देशात आलेली आहे त्याचा उहापोह हा स्वतत्र लेखाचा विषय आहे. तसेच भारतात हा कालखड येण्यास बराच अवधी आहे. त्यामुळे या नव्या कालखडाची वैशिष्ठे केवळ सूत्ररूपाने पुढे दिली आहेत.

## १. नवीन यंत्रशास्त्र व नवा ऊर्जाआधार

नवीन यत्रशास्त्र electronics वर आधारित असेल व ऊर्जेचा मित व्यय करणारे असेल ही ऊर्जा मुख्यत: सौरशक्ती, पवनशक्ती, लाटाची शक्ती, भूगर्भातील उष्णता यापासून घेतली जाईल. हे Renewable sources राहतील. औद्योगिक कालखडातील यत्रानी मानवाचे स्नायुबल वाढविले. नवी यत्रे मानवाचे बुद्धिबल वाढवतील.

## २. विखुरणारे उत्पादनक्षेत्र

कोळसा व खनिजतेल शक्तिशाली इंधने असल्यामुळे औद्योगिक प्रक्रियेचे कारखान्यात केद्रीकरण झाले व कारखान्याची शहरे निर्माण झाली सूर्यप्रकाश व नवे ऊर्जास्त्रोत विखुरलेले असल्यामुळे उत्पादनक्षेत्र परत घरोघरी विखुरले जाईल. घरी ठेवलेल्या कॉम्प्युटरच्या टर्मिनलवरून ऑफिसचे काम घरी बसून करता येईल.

## ३. निसर्गाशी सुसंवादित्व

नवीन यत्रशास्त्र नैसर्गिक साधनसामुग्री काटकसरीने वापरणारे व निसर्गाशी अधिक सवादी राहील.

## ४. बदलत्या उद्योगसमूहांचे महत्त्व

औद्योगिक कालखडात पोलादाची निर्मिती, सिमेंटची निर्मिती, जहाजबांधणी, रेल्वेमार्ग, कोळशाच्या खाणी, मोटारीची निर्मिती हे महत्त्वाचे उद्योग होत या उद्योगाना अनन्यसाधारण महत्त्व होते हे उद्योग मागासलेले, आतबट्ट्याचे व अप्रगत तत्रज्ञानावर आधारलेले आहेत असे तिसऱ्या लाटेखालील देशात दिसून आले अमेरिका व युरोपातील प्रगत देशानी हे उद्योग अप्रगत देशात 'निर्यात' केले व नवीन उद्योगाची कास धरली. जे नवीन उद्योगसमूह महत्त्वाचे ठरणार आहेत त्याची क्षेत्रे पुढीलप्रमाणे असतील– अ) electronics ब) अतरिक्षामध्ये नवी निर्मिती क) सागरतळावरील खनिजाच्या गोळयाचा शोध (ड) सूक्ष्मजीवाकडून नवीन औषधाची व रसायनांची निर्मिती,

## ५. पांढरपेशा वर्गाचे प्राबल्य

औद्योगिक कालखडात कामगारवर्ग निर्माण झाला. कामगाराचा गणवेश निळा असे, म्हणून त्यास Blue Coller worker असे म्हणतात. याउलट ऑफिसात काम करणारे, स्वतत्र व्यवसाय करणारे, यत्राची सामान्य देखभाल करणारे लोक white coller worker किंवा पांढरपेशे म्हणून सबोधिले जातात येणाऱ्या युगात निळचा वेषधारी कामगाराची बरीच कामे यत्रमानव (ROBOT) करील. यामुळे प्रत्यक्ष काम करणाऱ्यात पाढरपेशा वर्गाचे प्रमाण व महत्त्व वाढेल.

□

(आल्विन टॉफलर यांच्या Third Wave वर आधारित)

---

## गडकरी शताब्दी

पान ८ वरून

बदलणारी दुष्ट व्यक्ती ही काय दररोज दिसणारी हृदये आहेत. हे आहेत कल्पनेचे स्फुल्लिंग. कधी तरी कोणत्या तरी हृदयात या स्फुल्लिंगाने लहान ज्योत पेटली तरी माझ्या लेखणीचे सार्थक आहे. माझ्या प्रत्यक्ष आयुष्याशी सबध फार थोडा.

'मग प्रत्यक्ष जीवनातील वागणे याला काहीच अर्थ नाही का ?' 'बोले तैसा चाले' असे तळीरामाबद्दल लिहून मी कोटी साधली असली तरी टिळक–आगरकर ही तशी आचरणारी माणसे पाहून ही नक्षत्राची शर्यत हे मीच लिहिले आहे मला एवढच वाटल की मधल्या दीर्घकाळानतर माझे फक्त वाङ्मय नव्या पिढीपुढे आले असते आणि जीवनातील त्रुटीवर पडदा टाकला असता तर महाधन्य वाटले असते.'

गडकऱ्याचे स्वगत सपले आणि आमची 'मीडिअम' मोहनिद्रेतून जागी झाली. गडकऱ्याचे हे मनोगत सशोधक टीकाकाराना मान्य होईल का ? कठीण दिसते. हा करिअरचा प्रश्न आहे. आजच्या हयात लेखकानी यापासून धडा घ्यावा चरित्रलेखन सोईचे व्हावे म्हणून डायऱ्या, पत्रे कोणी लिहीत असेल तर सावधगिरीने शब्द वापरले पाहिजेत पुढील पिढीतील सशोधक टीकाकार' त्याचा अन्वयार्थ कसा लावतील याची आज काय कल्पना येणार

□

रंगभूमी

# अंतर्मुख करणारे दळवींचे–'पुढचं पाऊल'

वि. भा. देशपांडे

जयवंत दळवी हे कथाकार, कादबरीकार, विनोदकार आणि नाटककार म्हणून सर्वपरिचित आहेत. अलिकडच्या काळात त्यांनी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला आहे. त्यांच्या 'महानदा' कादबरीवर त्याच नावाचा चित्रपट मध्यंतरी येऊन गेला. तो चित्रपट आला आणि गेला. त्याची दखल घेण्याजोगे त्यात विशेष काही नव्हते; पण दळवी आता 'पुढच पाऊल' चित्रपटाच्या निमित्ताने कथा–पटकथा–संवाद अशी तिहेरी जबाबदारी घेऊन उतरले आहेत. त्यांचा लेखनक्रम आणि लेखक म्हणून मिळत गेलेली मान्यता, विविध माध्यमांच्या त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा हा प्रवास महत्त्वाचे सूचन करणारा आहे लक्षवेधी आहे.

आपल्यापैकी अनेकांना दळवींचे 'पर्याय' नाटक आठवत असेल. ते नाटक ध्यानात राहण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातला विषय आणि दळवींनी व्यक्त केलेला, सूचित केलेला पर्याय. त्यावरच चित्रपटाचा सारा डोलारा उभा आहे. नाटक आणि चित्रपट यातून हा विषय व्यक्त होत असताना या दोन माध्यमातल्या फरकाचे, ताकदीचे भान लेखकाला आहे असे सतत जाणवते. केवळ नाटकाचे चित्रीकरण असे चित्रपटाचे स्वरूप राहिलेले नाही. चित्रपटाचे परिणाम देऊन पटकथेची माडणी झालेली आहे

हुडाबळी हा विषय आपल्या समाजजीवनात आणि साहित्यादी कलाना नवा नाही अलिकडच्या काही नाटकातून (अग्नि-दिव्य–पर्याय) तसेच काही मराठी चित्रपटातूनही मांडला गेला आहे. त्यामुळे विषयाचे नाविन्य तसे नाही. ज्यावेळी एखादा लेखक एखाद्या समाजप्रश्नाला–समस्येला आपल्या लेखणीने भिडण्याचा यत्न करतो तेव्हा तो त्या प्रश्नाच्या सदर्भात कोणता जीवन दृष्टिकोन स्वीकारतो ते महत्त्वाचे असते तो केवळ चित्रण किंवा दर्शन घडवून थाबतो का? प्रश्नातल्या कोणत्या अंगाने उभा राहतो? त्यावर काही भाष्य करतो का? दिशा सूचित करतो का? असे अनेक प्रश्न मनी उभे राहतात. यातले लेखक जे स्वीकारतो किंवा ज्या पद्धतीने व्यक्त होतो त्यावरून त्याच्या लेखनाची प्रतवारी ठरते मूल्यमापन करता येते.

दळवी 'पुढचं पाऊल' चित्रपटात केवळ 'हुंडाबळी' समस्येचे चित्रण–दर्शन करून थाबत नाहीत. ते त्या 'पुढचं' काही सांगू इच्छितात. ते म्हणजे 'हुडाबळी' घेणारी जी माणसे आहेत, कुटुबे आहेत त्याना शिक्षा व्हायला हवी. ती शिक्षा म्हणजे सामाजिक बहिष्काराची. एखाद्या कुटुबात जेव्हा अशी घटना घडते तेव्हा त्याच्या शेजारचे लोक आणि समाजातील अन्य लोक अशा वेळी कोणती भूमिका स्वीकारतात? त्यांनी कोणती भूमिका स्वीकारावी? ती भूमिका कृतीशील असावी का? असे प्रश्न त्यात निर्माण होऊ शकतात. त्याच बरोबरीने आणखी प्रश्न निर्माण होतात ते म्हणजे न्याय किंवा पोलीस याच्या हाती हे प्रकरण सोपविण्याऐवजी समाज आपल्या हाती कायदा–निर्णय घेऊ लागला तर काय होईल?

या प्रश्नाच्या आणि त्या अनुषंगिक निर्माण होणाऱ्या गोष्टीच्या सदर्भात दळवींची भूमिका तपासून पाहायला हवी. दळवी ज्या मुलीची–कुटुबाची कथा सागत आहेत त्या व्यक्ती निमित्त आहेत, त्यातला प्रश्न–समस्या केंद्रवर्ती आहे. केवळ त्या समस्येभोवतीच ते रिंगण घालीत नाहीत, तर माणूस लोभापोटी – स्वार्थापोटी आपले माणूसपण का गमावतो? आपल्या लोभासाठी तो दुसऱ्याचा प्राण सहजपणाने कसा घेऊ शकतो? त्याच्यातले पशुत्व हे कसे कुरघोडी करते, या दिशेकडे दळवी आपल्याला नेऊ इच्छितात.

पण या दिशेकडे नेऊन ते थांबत नाहीत. तर त्याही पलिकडच्या कृतीशील विचाराचा भाग ठामपणे मांडतात. आपण आपल्या भवतालच्या जगात पाहतो की, 'हुडाबळी' ही नित्याची गोष्ट झाली आहे. असे सलग चार–दोन दिवसही जात नाहीत की, या सदर्भातली बातमी आपण वाचत नाही. आपण आपल्या नातेवाईकांच्या बातम्या ऐकतो, कधी त्यातला तपशील पाहतो–अनुभवतो, कधी खटल्याच्या रूपाने विस्ताराने वाचतो आणि हळहळून, व्यथित होऊन गप्प राहतो. फक्त काही क्षणच.त्यानंतर पुन्हा व्यावहारिक कोरडेपण किंवा अलिप्तपण आपल्यामध्ये असतेच–ते काम करीत राहते. त्याच घटनेबद्दल काही महिन्यानंतर–वर्षांनंतर त्या खटल्यातला आरोपी पुराव्याच्या अभावी सुटलेला असतो. किंवा त्याला किरकोळीत शिक्षा झालेली असते. ती वार्ता वाचून–ऐकून पुन्हा आपला संताप उफाळून येतो. काही काळ गेल्यानंतर पुन्हा आपले रितेपण, कोरडेपण असतेच. आपण तडफडतो; पण 'बघ्याची' भूमिका घेण्यापलिकडे काहीच करू शकत नाही.

मला वाटते याच बिंदूवर दळवींचे म्हणणे वेगळे वाटायला लागते. कारण हुंडाबळीचा तपशील, त्यातले अत्याचार, भीषणता हे सारेच दाखवतात. पण त्यावर आपली समाज म्हणून काही भूमिका आहे की नाही? तर निश्चितच आहे. वास्तविक सामाजिक बहिष्कार किंवा जाहीर विटंबना हे उपाय काही नवे नाहीत. त्यांचे जुनेपण परिचित आहे. पण ते किती प्रभावी आणि आवश्यक आहेत याची महती पुन्हा नव्याने पटू लागली आहे जो अपराध आपल्याला माहीत आहे, जाणवतो आहे, तो करणारा माणूस जर कायद्याच्या चलाखीने निसटू पहात असेल तर आपण स्वस्थचित्ते ते सारे सहन करायचे का? खरे तर आपली ही बघ्याची भूमिका (स्त्री विटबनेच्या संदर्भातली) महाभारतापासून आहे. द्रौपदीची विटंबना ही प्रातिनिधिक घटना मानली, तर पहाण्यापलिकडे आणि त्याला तात्त्विक मुलामा देण्यापलिकडे आपण काय केले? जो माणूस लग्न हे निमित्त करून पैसा–दागिने आदी गोष्टी मिळविण्यासाठी त्या मुलीचा प्राण घेतो, अनेक निष्पाप तरुणींना जगणे असह्य करून

टाकतो त्याला जर कायद्याने जन्मठेप-फाशी होणार नसेल तर बहिष्कार आणि विटंबना हा प्रभावी उपाय आहे.

दळवी जो 'पर्याय' सुचवू पाहताहेत किंवा 'पुढचं पाऊल' टाकू इच्छितात त्याचा अर्थ गांभीर्याने समजावून घेतला पाहिजे. केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी किंवा गल्लाभरू गोष्टीचा मार्ग हाताळण्यासाठी हा पर्याय वापरीत नाहीत. एका सामाजिक जाणिवेतून, विषय गांभीर्याच्या मनःपूर्वकतेतून ते काही मांडू इच्छितात. त्याचे हे सांगणे नाटकापेक्षा चित्रपटात अधिक प्रभावी झालेले आहे. अर्थात माध्यमाचा ताकदीचा फरक गृहीत धरूनच ते झालेले आहे. कितीतरी गोष्टी केवळ चित्रपट माध्यमामुळे ते आपल्यापर्यंत पोहोचवू शकले. विशेषतः ज्या गोष्टी नाटकात कथन, निवेदन वर्णन या स्तरांवर राहतात, त्या चित्रपटात दृश्यात्मकतेमुळे वेगळ्या परिणामाने उभ्या राहतात. कलाक्षेत्रात लेखकाने समस्येच्या सोडवणुकीचा मार्ग दाखवावा किंवा मूळ प्रश्नाची उत्तरे द्यावीत असे कोणीच अपेक्षित नाही. पण जर एखादा लेखक अशा ज्वलंत समस्येबाबत काही मार्ग दाखवू इच्छित असेल तर त्याचे स्वागत व्हायला हवे. या समस्येवरचे हे एकमेव उत्तर आहे असे लेखक किंवा अन्य कोणाचेही म्हणणे असणार नाही, असूही नये.

प्रस्तुत लेखनात चित्रपटाचे तांत्रिक अंगाने परीक्षण करण्याचा मानस नव्हताच आणि नाही, पण शेवटी असे म्हणता येईल की, चित्रपटाचा उत्तरार्ध पाहिल्यानंतर मूळ समस्येविषयी अनेक प्रश्नोपप्रश्न उभे करण्याची ताकद त्यामध्ये आहे. आपल्याला अस्वस्थ करणारा, अंतर्मुख करणारा हा चित्रपट आहे. मराठी चित्रपटाच्या संदर्भात एवढे घडले तरी मोलाचे आहे !

¤

## संगीत अमृतसिद्धीचे पुनरागमन

चालू पिढीतील लोकांना जुन्या संगीत नाटकाचे प्रयोग रंगभूमीवर पहाणं हा अलिकडे दुर्मिळ प्रकार होऊ लागलाय. खाडिलकर, देवल, गडकरी आदींच्या काही नाटकांचे प्रयोग होतात; पण शिक्काकटयार, ब्रह्मकुमारी, राक्षसी महत्त्वाकांक्षा आदी जुन्या नाटकांचा रसास्वाद आता रंगभूमीवर घेणे अशक्य झाल्याने, वाचनालयातून ते पुस्तक महत्प्रयासाने मिळवून केवळ साहित्यिक रसास्वाद हाच एकमेव मार्ग आता शिल्लक आहे

पण अगदी जुने, काळाच्या पडद्याआड गेलेले श्री. वसंत शांताराम देसाई लिखित आणि मास्टर कृष्णरावांच्या संगीताने नटलेले संगीत अमृतसिद्धी हे संगीत नाटक बालगंधर्व संगीत रसिक मंडळी, पुणे यांनी १६ एप्रिल १९८६ रोजी भरत नाट्य मंदिरात सादर केले. पुण्याच्या भारत गायन समाजाच्या अमृतमहोत्सवानिमित्त ही अमृतसिद्धी नाट्यरसिकांना मिळाली. मीराबाईंचे नाव पुढे आले म्हणजे डोळ्यापुढे येतात तिची कृष्णभक्तीवरील भजने पण मीरेच्या वैवाहिक जीवनावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. अलिकडच्या काळात मीरा मधुरा या आपल्या नाटकातसुद्धा वसंतराव कानेटकरांनी असा प्रकाश टाकला आहे. संगीत उत्तम असूनही या नाटकास फारच मर्यादित प्रतिसाद मिळाला. वसंत शांताराम देसाई यांचे 'अमृतसिद्धी' रंगभूमीवर आले त्यावेळी त्या नाटकास कितपत प्रतिसाद मिळाला होता, हे आता कळायला मार्ग नाही. पण इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर या नाटकाचे पुनरुज्जीवन करून बालगंधर्व रसिक मंडळाने एका जुन्या नाटकास न्याय दिला आहे. मीरेची कृष्णभक्ती, तिच्या पतीचा विरोध, वसंतपूजनाचे दिवशीच या मुद्यावर झालेला दोघांमधील बेबनाव इ. प्रसंग लेखकाने सामर्थ्याने उभे केले आहेत. वास्तविक रजपूत घराण्यामधील पारंपरिक प्रथेप्रमाणे वसंतपूजनाचे वेळी नूतनविवाहित पती-पत्नींनी एकत्र पूजा करावयाची असते. पण नेमक्या याच दिवशी दोघांच्यात संघर्ष उत्पन्न होतो सून पतीच्या मनाप्रमाणे वागली नाही तर तिने सरळ माहेरी निघून जावे, अशी टोकाची भूमिका मीरेची सासू घेते. मीरेच्या आईपुढे फार मोठा पेच उभा रहातो.

दर्जेदार संगीत हे तर या नाटकाचे वैशिष्ट्य आहेच, पण प्रभावी व्यक्तीचित्रण हीसुद्धा एक फार मोठी जमेची बाजू आहे. राणा, मदनगोपाल राजगुरु इ. पुरुष पात्रे तर मीरा, मैनावती, चंद्रावती, विद्यावती ही स्त्री पात्रे प्रभावी व्यक्तीचित्रणामुळे नाट्यप्रयोगाच्या यशस्वितेत महत्त्वपूर्ण सहभागी होतात. संस्थेने ड्रेपरीवरही बरेच पैसे खर्च करून नाट्यप्रयोग आणखीच उठावदार केला आहे. अमृतसिद्धी व मीरा मधुरा या विषयसाम्य असलेल्या नाटकांच्या संगीतात कालपरत्वे फरक आहे. कै. मास्टर कृष्णरावांच्या स्वररचनेतील कौशल्याबद्दल तर बोलणेच नको पद म्हणणारे पात्र, त्याची मनःस्थिती, पदाचा प्रसंग या सर्व घटकांचा त्यात साकल्याने विचार केलेला आढळतो. काही जुन्या पदांच्या चाली बदलून ती पदे सादर केली गेली हे खटकले. जुन्या चाली अत्यंत मधुर होत्या आधुनिकीकरणाचे नावाखाली क्लिष्टता येऊ नये आणि आधुनिकीकरण हे नेपथ्य, प्रकाशयोजना इ. तांत्रिक क्षेत्रात आणले जावे. संगीताचे स्वरूप मूळचेच ठेवणे नाटकाच्या हिताचे आहे कारण तेच त्या नाटकाबद्दलची प्रेक्षकांची पार्श्वभूमी आहे

अमृतसिद्धी प्रमाणेच इतर जुनी नाटके रंगभूमीवर पुनरुज्जीवनाची वाट पहात आहेत. भरत नाट्य मंदिरसारख्या संस्थेसच हे शक्य आहे. असे एखादे जुने नाटक पुन्हा रंगभूमीवर आले रे आले की दूरदर्शन व आकाशवाणीने सतर्क राहून ध्वनिमुद्रण व चित्रीकरण करून ठेवले पाहिजे अशा प्रकारचे प्रयत्न सातत्याने करण्यासाठी राज्य शासनाने, ललित कला अ‍ॅकॅडमीने संस्थेस आर्थिक सहाय्य केले पाहिजे. जुन्या नाटकाचे नुसते वाचनसुद्धा त्याच्यातील साहित्यिक सुप्त शक्तीची प्रचीती आणून देण्यास समर्थ आहे. रविवार सकाळ नाट्य वाचन समितीस या संदर्भात खूपच मोठे कार्यक्षेत्र खुले आहे

प्रयोगाचे वेळी लक्षात आलेल्या गोष्टीवरून असे सुचवावेसे वाटते की सर्वच कलाकार ( राजगुरू सोडून ) बारीक आवाजाचे (Low Volume) आहेत. त्यामुळे दोन ऑर्गन, व्हायोलिन, सारंगी इ. साथीतील वाद्यामुळे कलाकाराचे आवाज प्रेक्षकांपर्यंत येत नाहीत. विंगमध्ये ऑर्गनऐवजी हातपेटी ठेऊन आवाज थोडा कमी करता येईल. व्हायोलिनचा आवाज कमी करणे आवश्यक आहे राजगुरूचे काम करणाऱ्या कलाकाराचा आवाज मात्र पहाडी असल्याने, त्याने जुन्या पिढीतील गायक नट कै. श्रीपादराव नेवरेकर यांची आठवण करून दिली. हे किरकोळ दोष वगळता प्रयोग सुंदर झाला. सर्वच कलाकारांचे रंगभूमीवरील वावरणं, हालचाली यात सहजता आहे. पाठांतर, दिग्दर्शन इ गोष्टींसाठी भरपूर परिश्रम केल्याने प्रेक्षकांच्या पसंतीस प्रयोग पुरेपूर उतरला.

—नीलकंठ वासुदेव देशपांडे

# विलक्षण वेधक 'खामोश'

विधू विनोद चोप्रा हे तसं सर्वसामान्य प्रेक्षकाना फारस परिचित नसलेलं नाव. याचं कारण म्हणजे या दिग्दर्शकाचा फक्त एकच चित्रपट यापूर्वी पडद्यावर आला होता. तोही बऱ्याच वर्षांपूर्वी. 'सजा–ए–मौत'. चित्रपट चालला नव्हता आणि दूरदर्शनवर त्याचं प्रक्षेपण झाल्यामुळंच तो लोकापर्यंत पोचला होता. 'सजा–ए–मौत'ची कथा तशी ठिसूळ होती. पण तरीही विनोद चोप्राची हाताळणी तेव्हाही लक्षात राहिली होती. एकच चित्रपट नावावर — तोही पडेल — असताना विनोद चोप्राला हृषिकेश मुखर्जीसारखे दिग्दर्शक अतिशय चांगला दिग्दर्शक का म्हणतात हे त्याचा दुसरा चित्रपट 'खामोश' पाहिल्यावर लक्षात येत.

विनोद चोप्राला रहस्यपटाचं आकर्षण असाव. त्याच्या पहिल्या 'सजा–ए–मौत' मध्येही रहस्याचाच आधार होता, आणि 'खामोश' ही थरारक असा रहस्यपटच आहे पण 'सजा–'च्या तुलनेत 'खामोश' पटकथा अधिक बांधीव आहे. कोणताही प्रसंग अनावश्यक वाटत नाही. या यशामुळं आणि अर्थातच विनोद चोप्राच्या अप्रतिम दिग्दर्शनीय कौशल्यामुळ 'खामोश' विलक्षण प्रभावी आणि वेधक ठरला आहे.

चित्रपटाची कथा घडते पहेलगामला. 'आखरी खून' या चित्रपटाचं शूटिंग तिथं चालू आहे. शबाना ( शबाना आजमी ), अमोल ( अमोल पालेकर ), सोनी (सोनी राझदान) हे कलाकार त्यात भाग घेत असतात. सोनीचा खून होतो असा प्रसग दुसऱ्या दिवशी चित्रित करायचा असतो. पण सोनी सकाळपासून बेपत्ता असते आणि नंतर ज्या ठिकाणी प्रसंग चित्रित व्हायचा असतो तिथच ती गळफास लावलेल्या अवस्थेत आढळते.

चित्रपटाचा निर्माता दयाल (अजित बच्चन) 'शकुंतला' नावाचा चित्रपट निर्माण करणार असतो. त्यात भूमिका मिळवण्यासाठी सोनी प्रयत्न करत असते. पण तिच्या मृत्यूच्या रात्रीच तिचं दयालशी भांडण होत आणि ती भूमिका तिच्या हातातून निसटते. यामुळं आलेल्या वैफल्यामुळच तिन आत्महत्या केली असावी असा निष्कर्ष निघून केस फाईल होते.

पण थोड्या दिवसानी या मृत्यूचा तपास करायला एक व्यक्ती तिथ येऊन पोचते. तो सी. आय. डी. इन्स्पेक्टर असल्याचा सगळ्याचा समज असतो. पण प्रत्यक्षात तो निघतो आर्मीतला कॅप्टन. हा कॅप्टन (नसीरुद्दिन शाह) सोनीचा भाऊ असतो. सोनीच्या मृत्यूच्या रात्रीच तिन पाठवलेलं पत्र त्याच्याकडे असत आणि त्यावरून ती आत्महत्या करणं शक्य नाही अशी त्याची खात्री असते.

कॅप्टन युनिट राहिलेल असत त्याच हॉटेलमध्ये उतरतो, आणि त्याला अनेक गोष्टी समजतात. शकुंतलाची भूमिका आपल्या मुलीला मिनूला मिळावी म्हणून मिसेस बहाल (सुषमा सेठ) प्रयत्न करत असतात. सोनी हीच मिनूची प्रतिस्पर्धी असल्यानं तिला दूर करण्यासाठी त्या कोणत्याही थराला जाऊ शकतील अशी कॅप्टनची खात्री झालेली असते. मृत्यूच्या रात्री दयालशी सोनीच झालेलं भांडण आणि याचा बदला घेईन असं दयालन म्हटलेलं खूपजणानी ऐकलेलं असतं दयालचा भाऊ कुकू (पकज कपूर) सोनीवर प्रेम करत असतो. पण ती त्याला दाद देत नसल्याने तो दुखावलेला असतो. हॉटेलमधल्या एका वेटरचीही वागणूक संशयास्पद असते.

या सगळ्यामुळं कॅप्टन चक्रावून जातो. शबाना त्याला मदत करू पहाते. पण तिलाही हे कोडं उलगडत नाही आणि हे एवढ्यावरच थांबत नाही. या प्रकरणात ज्या लोकाना निश्चितपणे थोडीफार का होईना माहिती आहे असा कॅप्टन आणि पोलिसाचा समज असतो त्यांचेही खून होऊ लागतात.

सशयित म्हणून पोलीस ज्याला पकडतात त्यानंही खून केलेले नव्हते असं दिसून येतं. खरा खुनी वेगळाच असतो तो कसा सापडतो हे पहाणं खामोश मध्ये पुरेस रोचक झालेलं आहे खुनामागचं जळजळीत रहस्य शेवटपर्यंत गुप्त ठेवण्यात लेखक–दिग्दर्शकाला यश आलं आहे. मुळात हिंदी चित्रपटात रहस्यकथांना प्राधान्य खूप कमी असत त्यातून जे रहस्यपट बनतात ते बहुतेकदा सुमार दर्जाचे असतात. 'खामोश' मात्र आपल्या वेगळेपणान उठून दिसतो

आधी म्हटल्याप्रमाणे 'खामोश'ची पटकथा अतिशय बंदिस्त आहे आणि तिला दिग्दर्शकाच्या कौशल्याचा स्पर्श लाभलाय. थोड्या अवधीत खूप काही सांगण्याचं कसब विनोद चोप्राकड आहे. त्यामुळं चित्रपटात पात्र खूप असूनही चित्रपटाचा पसारा वाढलेला नाही. पुन्हा यातल्या सगळ्या पात्रांची स्वभाववैशिष्ट्य नेमकेपणान स्पष्ट झालीयेत. एखादच वाक्य किंवा चेहऱ्यावरच्या एखाद्याच एक्स्प्रेशनमधून त्या पात्राची व्यक्तीरेखा, त्याचे इतरांशी संबध आपल्या डोळ्यासमोर उभे रहातात. एखाद्या चित्रपटाचं आऊटडोअर शूटिंग सुरू असताना युनिटमध्ये असणारे संबंध, ताणतणाव, अभावितपणे घडणारे विनोद, हे सगळ दिग्दर्शकान अतिशय सुरेख रीतीनं टिपलय.

चित्रपटाची तांत्रिक अंगं उच्च दर्जाची आहेत. विशेष उल्लेख करावा लागेल तो छायाचित्रणाचा. विनोद प्रधानच्या कॅमेऱ्याचा 'खामोश'च्या वेधकतेत फार मोठा वाटा आहे. पहेलगामचं सौंदर्य जस कॅमेऱ्यामुळ जिवंत होत त्याचप्रमाणं ओढोन पडणाऱ्या खुनामुळं निर्माण झालेल गूढ, उदास वातावरण, खुनातली भीषणताही, कॅमेरा छान टिपतो.

चित्रपटाला सगीत वनराज भाटियाचं आहे. अर्थात सगीत म्हणण्यापेक्षा पार्श्वसंगीत म्हटलेलंच योग्य ठरेल. कारण चित्रपटात एकही गाणं नाही. अनेक दिवसांनतर आलेला हा गीतविरहित चित्रपट. इथं गाण्याना खरोखरच वाव नव्हता. तरीही चित्रपटाच्या शूटिंगचा फायदा घेऊन एक–दोन गाणी घुसडण्याचा मोह विनोद चोप्रानं टाळला हे कौतुकास्पदच.

'खामोश'ला रूढ अर्थानं नायक–नायिका नाहीत नसीरुद्दीन आणि शबानाच्या भूमिका थोड्या अधिक ठसठशीत असल्या तरी सगळ्याच पात्राना महत्त्वपूर्ण भूमिका आहेत आणि त्या सार्यानीच समजून केल्या आहेत. एक प्रकारे सगळ्या कलाकारांचा 'टीम एफर्ट' इथं दिसतो. अजित बच्चन, सुषमा सेठ, सोनी राझदान सगळेच आपापल्या भूमिकात फिट् बसतात. सदाशिव अमरापूरकरही दिग्दर्शकाच्या छोट्याशा भूमिकेत

चमकतो. अमोल पालेकरची भूमिका असलेला चित्रपट खूप दिवसानी पडद्यावर आला आहे शबाना आझमी समजस शबानाची भूमिका छान करते. ह्या सगळ्याचीच कामं चागली असली तरी भाव खाऊन जातो नसीरूद्दिन शाह. अतिशय कमी बोलणारा, पण बहिणीच्या खुन्याला शोधून काढण्यासाठी जिवापाड प्रयत्न करणारा, त्यातल्या गूढामुळ अस्वस्थ झालेला कॅप्टन त्यानं मस्त रगवला आहे. कलाकाराच्या बाबतीत एकच गोष्ट खटकते. 'खामोश' मध्ये चित्रपटकलाकार म्हणून काम करणाऱ्याना त्याच्या वास्तव जीवनातलीच नाव दिली आहेत. (शबाना आजमी, अमोल पालेकर, सोनी वगैरे.) ह्यामाग काही विशिष्ट कारण असेल अस वाटत नाही. त्यामुळे ही गोष्ट टाळली असती तर बर झाल असतं.

पण एकूण 'खामोश' हा त्याच्या अप्रतिम हाताळणीमुळं, चागल्या तात्रिक अगामुळं आणि कलाकाराच्या सरस कामगिरीमुळ एक आवर्जून पाहण्यासारखा चित्रपट आहे. विशेषतः रहस्यपटांची आवड असणाऱ्यानी तर हा चुकवून चालायचच नाही.

—सीमा कुलकर्णी

## सांस्कृतिक नागपूर

पृष्ठ ४ वरून

कुलकर्णी यांनी ह्या कुस्तीला निराळेच परिमाण दिले. ते म्हणाले,' जीवनाचा प्रत्यय, अन्वय आणि आविष्कार साधण्यासाठी मजपाशी एक अनन्य, अपवादात्मक व उदंड शक्ती आहे, असा विश्वास मराठी सरस्वती पुत्र बाळगतील तर त्याच्यातील हीनगड पाहता पाहता निघून जाईल.' आता एवढेच पुरेसे न वाटून द. भि नी समेलनाच्या समारोपाच्या भाषणात सागितले, 'संपूर्ण समाजाचे स्पंदन आपल्या उरात दडवून सवेदन व उदात्त भावनेने साहित्यिकानी साहित्य निर्मिती करावी. वर्ण, लिंग, भाषा, प्रात याच्या पलिकडे जाऊन विश्वव्यापी आणि विश्वोत्तीर्ण साहित्य निर्माण व्हावे.' आता काय बोलता? चागले कडाडून भाडण करण्याकरिता शेजाऱ्याकडे जावे तर शेजारी विष्णुभक्त निघावा आणि त्याने आपल्याला लोटागण घालून वैश्विक प्रेमाची शिकवण द्यावी या परती निराशा ती कोणती? मराठी साहित्यात समस्त कुलकर्ण्यांना ऐनवेळी अवसानघात करण्याची सवयच आहे! वाळीत टाकणाऱ्या समस्त ब्रह्मवृंदाकडे दुर्लक्ष करून एका कुलकर्ण्याने ज्ञानेश्वरी लिहून साहित्याला एक वैश्विक परिमाण प्राप्त करून दिले आणि दुसरे कुलकर्णी हे असे! मधल्या मधे बुलढाणा ह्या ठिकाणी जमलेल्या साहित्यिकांची मोठीच पचाईत झाली. त्याना सपूर्ण समेलनात मोकळेपणाने हसताही येईना! त्याना आपला चेहरा सतत गंभीर ठेवावा लागला! कारण यशवत मनोहरानी सागितले होते ना 'कलावतांना, साहित्यिकाला, समीक्षकाला जीवन कळावे लागते आणि जीवन ज्याला कळले त्याने फार गभीर, उग्र असावे लागते' असो.

— शरच्चंद्र

## सांस्कृतिक डोंबिवली

पृष्ठ ५ वरून

कालिकासाठी ही योजना राबविता येत नाही ह्याची खत श्री. फडके ह्यानी मजकडे व्यक्त केली.

'माध्यम' चा ससार देणगीदार, जाहिरातदार आणि विनामोबदला लेखन करणाऱ्या लेखकाच्या सहाय्यावर चालतो. इतर माणसे आपल्या उत्पन्नापैकी काही पैसा अक्कलखाती खर्च करतात, फडके—जोशी 'अकखाती' खर्च करतात. 'जेव्हा वाचक, सपादक इ. कडून शाबासकी मिळते तेव्हा केल्या श्रमाचे, गमावलेल्या पैशाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. पण मुबई—पुण्यातील अनेक नामवताकडे नियमितपणे अक पाठवूनसुद्धा ते साधी पोच देत नाहीत. त्याचे मात्र फार फार वाईट वाटते त्याशिवाय खरी उद्वेगजनक गोष्ट म्हणजे दूरदर्शनकडे नियमितपणे दहा अक विविध निर्मिति आणि 'प्रेक्षक सशोधन अधिकारी' ह्यांच्याकडे पाठविले जातात पण सर्वश्री आकाशानंद, अरुण काकतकर ह्यांच्याशिवाय कोणीही दखल घेत नाही' असे उद्गार श्री. फडके ह्यानी काढले. अर्थात् असा निराशाजनक अनुभव असला तरी उत्साहात खड पडण्याचे तूर्त तरी कारण दिसत नाही. कारण त्यानी मोठ्या कौतुकाने आणि उल्हासाने आपल्या भावी योजना सागितल्या. त्यात 'आरोग्य विशेषाक', 'दूरदर्शनवरील उत्कृष्ट जाहिरात स्पर्धा' आहे त्याचप्रमाणे 'दूरदर्शनवरील नाटके' ह्या विषयावर अनेक नामवत, अनुभवी लेखकाच्या लेखाच्या सहाय्याने एक परिसवाद घेण्याचे ठरत आहे. आपल्या समाजात अशा धडपड्या व्यक्तीची धडपड पाहून जाहिराती देणारे, लेख देणारे आणि वर्गणी देणारे आहेत तोपर्यंत अशा उपक्रमाना मरण नाही आणि समाजात चैतन्य नाही असे म्हणावयास वाव नाही. 'माध्यम' ला आणि तसेच उपक्रम करणाऱ्या अनेकांना लागलेले वेड वाढत जावो ही इच्छा.

¤

सयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करणाऱ्या गावात डोंबिवलीचा क्रम वरचा होता. अशा ह्या शहरात सर्व पक्ष, सस्था एकत्र येऊन रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केल्याचे दिसत नाही. त्यामुळे सागता समारंभाचा प्रश्नच उद्भवत नाही. आपले त्यात काही चुकले आहे, चुकते आहे ह्याची खबरबातही कोणाला नाही. रौप्य महोत्सवी वर्ष आले आणि गेले अशीच अवस्था ह्या नगरीची आहे.

¤

एप्रिल महिना सुरू झाला की कधी एकदा परीक्षा सपतात असे होते कारण वेध लागतात अनेक उपक्रमाचे. त्यात पुस्तक जत्रा, व्याख्यानमाला इ चा प्रामुख्याने समावेश असतो साहित्य सभा डोंबिवलीने आपली तिसरी वसत व्याख्यानमाला आयोजित केली आणि यशस्वीरीत्या पार पाडली. सगीत, विज्ञान, नाट्य इ. क्षेत्रातील नामवताची व्याख्याने किंवा मुलाखती आयोजित करून श्रोत्याना तृप्त करून सोडायचे ही भूमिका व इच्छा. ह्या वर्षी सुप्रसिद्ध गीतकार व सगीतकार श्री. यशवत देव याच्याशी गप्पागोष्टी केल्या सौ. उषा मेहता ह्यानी. विषय होता 'स्वरसाधनेचे अर्धशतक' दुसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व साहित्यिक डॉ. जयत नारळीकराची '२१ व्या शतकातील विज्ञान, साहित्य व अध्यात्म' ह्या विषयावर मुलाखत घेतली त्याच्याच सौभाग्यवतींनी, सौ. मगला नारळीकरानी. तिसरा दिवस गाजविला श्री. अरविंद देशपाडे व सौ सुलभा देशपाडे ह्या मराठी रगभूमी, हिंदी चित्रपट, दूरदर्शनवरील कलावत दाम्पत्याने. त्याच्याशी गप्पा केल्या श्री. श. ना. नवरे व श्री. खोपकर ह्यानी. हे तिन्ही कार्यक्रम क्राती डिपार्टमेंटल स्टोअर्स, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली आणि लायन्स क्लब ऑफ डोंबिवली ह्याच्या सौजन्याने, म्हणजेच आर्थिक सहाय्याने घडून आले. श्रोत्यानी आपल्या प्रचड उपस्थितीने हे कार्यक्रम यशस्वी केले, आवडल्याचे दाखवून दिले.

—चंद्रशेखर राजे

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

# आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा कर्णधार
# गडाफी

'आम्हाला विरोध करणाऱ्या प्रत्येक देशात
आम्ही क्रांती घडवून आणू. जे आम्हाला
मैत्रीचा हात देतात त्या देशात आम्ही
तेलाची निर्यात करू. जे आम्हाला शत्रू
मानतात त्या देशात आम्ही क्रांतीची निर्यात करू.'
हे शब्द आहेत लीबियाच्या नेत्याचे, मुअम्मर
एल्. गडाफी यांचे. साऱ्या जगाबरोबर
भांडायला निघालेल्या या माणसाचा देश आहे
मुठीएवढा. लीबियाची लोकसंख्या आहे केवळ
अठ्ठावीस लाख-भारतातील एखाद्या मध्यम
वस्तीच्या शहरासारखी-पण या माणसाच्या
वल्गना मात्र असतात आपण साऱ्या जगाचे सम्राट आहोत
अशा थाटाच्या. . . '

**माणूस पुढील अंकात....**

**लेखक : डॉ. श्रीकांत मुंदरगी**